सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# 'मुंबई-बंगळुरू वंदे भारत स्लीपर'चा मुहूर्त ठरला!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबई ते बंगळुरू प्रवास आता सोपा होणार आहे. दोन्ही शहरांदरम्यान वंदे भारत स्लीपर ट्रेनला सुरूवात होणार आहे. यंदा ऑगस्ट महिन्यातच या वंदे भारत स्लीपर ट्रेनचा शुभारंभ होणार असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. केएसआर बंगळुरू ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या स्थानकांदरम्यान हे सेवा सुरू होणार आहे. यामुळे मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.



अनेक वर्षांपासून मुंबई ते बंगळुरू प्रवासासाठी केवळ उद्यान एक्सप्रेसचा पर्याय उपलब्ध होता. या ट्रेनने बंगळुरूपर्यंत पोहोचायला २४ तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. पण वंदे भारतमुळे हा वेळ फक्त १५ तासांवर येणार आहे. रात्री उशीरा ही ट्रेन स्थानकावरून रवाना होईल आणि दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत दाखल होईल. त्यामुळे एका रात्रीत मुंबई ते बंगळुरू प्रवास शक्य होणार आहे. सोलापूर आणि कालाबुर्गी मार्गे ही ट्रेन धावणार आहे.

यावेळी बोलतना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशातल्या पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या यशाबद्दल सांगितलं. कोलकाता मधील हावडा ते गुवाहटीमधील कामाख्यादरम्यान ही ट्रेन सुरू झाली होती. या स्लीपर ट्रेनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. या ट्रेनमुळे प्रवास वेगवान आमि आरामदायी झाला आहे. या नंतर वंदे भारत स्लीपर ट्रेनची सुरूवात जुलै ते ऑगस्टदरम्यान होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, रेल्वे प्रशासन मुंबई ते बंगळुरूदरम्यान एका तिसऱ्या मार्गाचीही सुरूवात करण्याचा विचार करत आहे. हुबळी आणि पुणे मार्गावरून बंगुळूरू ते मुंबई सुपर फास्ट ट्रेन सुरू करण्याची योजना आहे. या ट्रेनमध्ये एलएचबी कोच उपलब्ध असतील. या सुपर फास्ट ट्रेनने सुद्धा रातोरात मुंबईहून बंगळुरूला पोहोचता येणार आहे.

चेन्नईस्थित इंटिग्रल कोच फॅक्टरी (आयसीएफ) तंत्रज्ञानाचा वापर करून बीईएमएलने ही वंदे भारत ट्रेन विकसित केली आहे. नवीन केशरी आणि राखाडी रंगाची ही ट्रेन केएसआर बेंगळुरू आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई दरम्यान धावणार आहे. ही देशातील अशी दुसरी ट्रेन असेल. जानेवारी २०२६ मध्ये सुरू झालेली पहिली वंदे भारत स्लीपर हावडा ते कामाख्या दरम्यान धावते. यामुळे दोन्ही शहरांदरम्यानचा प्रवासाचा वेळ सहा तासांपर्यंत कमी झाला आहे.

वंदे भारत स्लीपर ट्रेनचे उत्पादन वाढवण्यात आले असून डिसेंबर २०२६ पर्यंत अशा १२ गाड्या सुरू होण्याची अपेक्षा आहे. या ट्रेनच्या प्रत्येक बाजूला सहा रेक असतील.

# यवतमाळमध्ये भोंदू बाबाला अटक

**तभा वृत्तसेवा**

**यवतमाळ :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून अघोरी पूजा, भोंदूबाबा यांची प्रकरणे सातत्याने समोर येत आहे. आरोपींवर कठोर कारवाई देखील होत आहे. तरीदेखील असे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. या घटना थांबण्याचं नाव दिसत नाही. आता यवतमाळमध्ये अघोरी पूजेचा प्रकार समोर आला आहे. गुप्तधनाच्या शोधासाठी चक्क अघोरी पूजा केली जाणार होती. त्यासाठी महिलांचे फोटो, केस अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू वापरण्यात येणार होते. पण ही पूजा सुरु होण्याआधीच पोलिसांनी आरोपींच्या नांग्या ठेचल्य आहेत. आरोपींकडे मिळालेले साहित्य पाहन पोलीसही चक्रावले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी सहा जणांच्या टोळीला अटक केली आहे.

खरंतर शिवारात मोटार पंप चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे पोलीस रात्रीच्या सुमारास दररोज गस्तीवर असतात. अशाप्रकारे शनिवारी मध्यरात्री गस्तीवर असताना वरुड ते कारेगाव या मार्गावर एक वाहन संशयास्पद स्थितीत दिसलं. पोलिसांनी गाडी थांबवली. गाडीतील सर्व जणांची चौकशी केली आणि गाडी तपासली असता त्या गाडीत अघोरी पूजेशी संबंधित विविध साहित्य आढळलं.

पोलिसांना संबंधित वाहनात कुदळ, अगरबत्ती, ज्वारीचे पीठ, काळ्या बाहुल्या, त्रिशूळ, रुद्राक्ष माळ, लिंहू, केस, सुया, ताबीज, रंगेबीरंगे धागे इत्यादी वस्तूंचा समावेश होता. पोलिसांनी सहा जणांची कसून चौकशी केली.

यावेळी त्यांनी आपण जमिनीतून गुप्त धन काढण्यासाठी आल्याची कबुली दिली. पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली. आरोपींवर महाराष्ट्र नरबळीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींमध्ये ६ पैकी पाच जण हे वाशिम जिल्ह्याचे आहेत तर १ जण यवतमाळच्या आर्वी तालुक्यातील आहे.

विशेष म्हणजे आरोपींकडे काही महिलांचे फोटो आणि केसही सापडले आहेत. पंचधातूचे बीर कंगण, ज्याचा उपयोग अघोरी पूजेसाठी केला जातो तेही सापडलं आहे. आरोपींपैकी विरेंद्र गायकवाड हा आरोपी अघोरी पूजा करणारा पुजारी असल्याचं समोर आलं आहे.

# बारावीचा निकाल कधी जाहीर होणार ?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल कधी जाहीर होणार ? हा प्रश्न अनेकांना सतावत आहे. मोठ्या प्रमाणात तर्कवितर्क सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर सूत्रांनी अतिशय महत्त्वाची माहिती दिली आहे. यंदा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल शुक्रवार १५ मे २०२६ किंवा त्याआधी जाहीर होईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे. डिजीलॉकरच्या अधिकृत वेबसाईटवर CLASS 12TH RESULT 2026 COMING SOON असा संदेश दिसू लागला आहे. निकालाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्यामुळे डिजीलॉकरच्या अधिकृत वेबसाईटवर बारावीचा निकाल लवकरच असा संकेत देणारा संदेश दिसू लागल्याचे मत अनेकजण व्यक्त रत आहेत. पण सूत्रांनी बारावीचा निकाल शुक्रवार १५ मे २०२६ किंवा त्याआधी जाहीर होईल, असे सांगितले. तर काही मीडिया रिपोर्टनुसार बारावीचा निकाला २५ मे च्या आधी जाहीर होईल. अद्याप मंडळाने बारावीच्या निकालाच्या अधिकृत तारखेची घोषणा केलेली नाही. पण येऊ लागलेल्या रिपोर्टमुळे बारावीची परीक्षा दिलेल्यांची धाकधूक वाढण्यास सुरुवात झाली आहे. बारावीचा निकाल ऑनलाईन तपासण्यासाठीच्या निवडक वेबसाईट : ारहीर्शिीश्रीं. पळल.ळप , हीलीर्शिीश्रीं.ाज्ञलश्र.ीस , ीर्शिीश्रीी.वळसळश्रेलज्ञशी.सीं.ळप , ारहर्हीललेरीव.ळप बारावीचा निकाल बघण्यासाठी आधी ही तयारी करा विद्यार्थ्यांनी बारावीचा निकाल बघण्यासाठी सोबत हॉल तिकिटातील सर्व माहिती ठेवावी. ऑनलाईन निकाल बघण्यासाठी हॉल तिकिटावरील सीट नंबर अर्थात आसन क्रमांक किंवा बैठक क्रमांक तसेच अर्जावर नोंदवलेले आईचे नाव व्यवस्थित टाईप करावे लागेल. महाराष्ट्र बोर्ड एकाच वेळी विज्ञान, कला, वाणिज्य आणि व्यावसायिक शाखांचे निकाल जाहीर करणार आहे. मागील वर्षी विज्ञान शाखेचा निकाल सर्वाधिक ९७.३५% लागला होता. यावर्षीही निकालाचा टक्का वाढण्याची शक्यता आहे.)

## महाराष्ट्रावर सूर्य कोपला!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई : महाराष्ट्रावर सध्या सूर्य कोपल्याचे चित्र आहे. राज्यातील अनेक शहरे उष्णतेच्या तडाख्याने अक्षरशः होरपळून निघत आहेत. विदर्भ व मराठवाड्यासह अनेक शहरांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे दुपारपूर्वीच रस्ते सामसूम झाल्याचे दिसून येत आहे. परभणीत उष्माघाताने एका व्यक्तीचा बळी गेला आहे. तर अकोल्यात पारा तब्बल ४६ अंशांवर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. या वाढत्या तापमानामुळे काही ठिकाणी शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. गत काही दिवसांपासून राज्यातील शहरांच्या तापमानात भयंकर वाढ होताना दिसून येत आहे. विशेषतः अकोल्यातील तापमानात मोठी वाढ झाली आहे. या वाढत्या तापमानामुळे अकोला हे जगातील सर्वाधिक तापमान असणाऱ्या शहरांपैकी एक ठरत आहे. गत २१ एप्रिल रोजी अकोल्यात ४३.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. त्यानंतर २२ एप्रिल रोजी ४३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. ४५.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. दिवसागणिक वाढणाऱ्या या तापमानामुळे नागरीक पुरते हैरान झालेत.**

# होर्मुझ मधून बारूदी सुरुंग काढायला लागू शकतात सहा महिने : अमेरिका

**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन :** पश्चिम आशियातील संघर्षादरम्यान इराणने होर्मुज सामुद्रधुनीत बारूदी सुरुंगांची पेरणी करून हा मार्ग अत्यंत धोकादायक बनवला आहे. स्वतः इराणी सैन्यालाही या सुरुंग नेमक्या कुठे-कुठे टाकल्या आहेत, याची पूर्ण माहिती नाही. या सुरंगा आता अमेरिकन सैन्य आपल्या विशेष जहाजांच्या मदतीने हटवण्याच्या मोहिमेत उतरले आहे. पेंटागॉनने सांगितले की, हे काम पूर्ण होण्यासाठी सहा महिन्यांपर्यंत कालावधी लागू शकतो. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे प्रयत्न तिप्पट वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत.



अमेरिकन संसदेच्या खालच्या सभागृहातील प्रतिनिधी सभेच्या सशस्त्र सेवा समितीसमोर नुकत्याच झालेल्या गोपनीय सादरीकरणात पेंटागॉन अधिकाऱ्यांनी या सुरुंगा हटवण्यासाठी सहा महिन्यांचा अंदाज व्यक्त केला. संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी या आकड्याची पुष्टी करण्यास नकार दिला, मात्र तो फेटाळलाही नाही. त्यांनी सांगितले की, योग्य कालमर्यादेत या सुरंगा हटवण्याच्या क्षमतेवर सैन्याला पूर्ण विश्र्वास आहे. ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वीच सांगितले होते की, अमेरिकन माइनस्वीपर जहाजे आधीपासूनच सामुद्रधुनी साफ करत आहेत. त्यांनी ही कारवाई तिप्पट प्रमाणात वाढवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, सामुद्रधुनीत बारूदी सुरुंग टाकणाऱ्या कोणत्याही बोटीवर हल्ला करण्याचे स्वतंत्र आदेशही नौदलाला दिले आहेत.

बारूदी सुरुंग हटवणे हे अत्यंत कष्टसाध्य काम आहे. अमेरिकन सैन्याचे माजी अधिकारी आणि या विषयातील तज्ज्ञांच्या मते, हे काम सामान्यतः संघर्ष संपल्यानंतरच सुरू केले जाते आणि त्याला बराच वेळ लागतो. त्यांच्या मते, बारूदी सुरुंगांचा शोध घेणे म्हणजे बागेत एकेक करून तण उपटण्यासारखे आहे. तर सुरंगा हटवणे म्हणजे गवत कापण्यासारखे काम आहे. तथापि, प्रत्येक सुरंग हटवणे नेहमीच आवश्यक नसते, असेही त्यांनी सांगितले. आजही काही भाग असे आहेत, जे दुसऱ्या महायुद्धातील आणि काही ठिकाणी पहिल्या महायुद्धातील स्फोटक अवशेषांपासून पूर्णपणे मुक्त झालेले नाहीत, कारण हे काम खूप खर्चिक आणि वेळखाऊ आहे.

अमेरिकेच्या एका संरक्षण अधिकाऱ्याने माध्यमांना सांगितले की, पश्र्चिम आशियात सध्या अमेरिकन नौदलाकडे दोन किनारी युद्धनौका आहेत, ज्या बारूदी सुरंगांचा शोध घेऊ शकतात. जपानमध्ये तैनात असलेल्या दोन अमेरिकन 'ॲव्हेंजर' श्रेणीतील सुरंग हटवणाऱ्या जहाजांनाही पश्र्चिम आशियाकडे रवाना करण्यात आले आहे. सध्या अमेरिकन सैन्य होर्मुजमध्ये आपली युद्धनौका वापरत आहे की नाही, याबाबत मात्र कोणताही स्पष्ट संकेत मिळालेला नाही.

# आता पाकिस्तानला चर्चेसाठी जायचं कशाला...?

## भर कार्यक्रमात झालेल्या अटॅकनंतर ट्रम्प गरजले

**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला असून या घटनेने संपूर्ण जगात खळबळ उडाली आहे. वॉशिंग्टनमधील एका कार्यक्रमात ट्रम्प यांच्यावर गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यातून ट्रम्प सुदैवाने बचावले असून, त्यांनी इराणबाबत आपली भूमिका अधिक आक्रमक केली आहे. या गोळीबाराने मी थांबणार नाही, इराणविरोधातील युद्ध जिंकण्याच्या निर्धारावर मी ठाम आहे, असे ट्रम्प यांनी सांगितले.



वॉशिंग्टन येथील हिल्टन हॉटेलमध्ये व्हाईट हाऊस कॉरेस्पोंडंट्स असोसिएशनच्या वतीने वार्षिक डिनरचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सुरू असतानाच अचानक गोळीबार झाला. सुरक्षा यंत्रणांनी क्षणाचाही विलंब न लावता ट्रम्प यांना सुरक्षित स्थानी हलवले. या हल्लयामुळे कार्यक्रम तात्काळ रद्द करण्यात आला. ट्रम्प यांना कोणतीही दुखापत झालेली नाही, मात्र सुरक्षेचा प्रश्र्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.तपास यंत्रणांनी याप्रकरणी ३१ वर्षीय कोल थॉमस या तरुणाला अटक केली आहे. आरोपी अनेक घातक शस्त्रे घेऊन सुरक्षा चेकपॉईंटच्या दिशेने धावत आला होता. त्याने एका सीक्रेट सर्व्हिस एजंटवर गोळी झाडली, मात्र बुलेटप्रूफ जॅकेटमुळे त्या एजंटचा जीव वाचला. आरोपी हा एकटाच या कटात सामील असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

या हल्ल्याचा इराण युद्धाशी काही संबंध आहे का? असा प्रश्र्न पत्रकारांनी विचारला असता ट्रम्प म्हणाले, मला तसे वाटत नाही, पण काहीही नाकारता येत नाही. मात्र, या हल्लयामुळे इराणमध्ये युद्ध जिंकण्यापासून मला कोणीही रोखू शकणार नाही. आम्ही आमचे काम सुरूच ठेवू आणि ते यशस्वी करून दाखवू.

हल्लयाच्या पार्श्र्वभूमीवर ट्रम्प यांनी आपल्या अधिकाऱ्यांचा नियोजित पाकिस्तान दौरा तडकाफडकी रद्द केला आहे. हे अधिकारी इराणसोबत शांतता चर्चेसाठी इस्लामाबादेत जाणार होते. आता १८ तासांचा प्रवास करून तिथे जाऊन चर्चा करण्यात काही अर्थ नाही. सर्व सूत्रे आमच्या हातात आहेत, इराणला चर्चा करायची असेल तर ते आम्हाला कधीही कॉल करू शकतात, अशा शब्दांत ट्रम्प यांनी भूमिका मांडली.

# पूर्व ते पश्चिम द्रुतगती महामार्गांना जोडणार मेट्रो!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबईत मेट्रोचे जाळे विस्तारत आहे. नुक्तीच मेट्रो लाइन ९ आणि २बी ची सुरूवात झाली. मेट्रो ९ला प्रवाशांचा उदंड प्रतिसाद लाभत असला तरी मेट्रो २बी वर प्रवाशांची संख्या सध्या कमीच आहे. आता यानंतर मुंबईत मेट्रो लाइन ६ला च्या कामांना देखील वेग मिळाला आहे.




या मेट्रोचे बहुतांश काम पूर्ण झाले असले तरी पश्र्चिम आणि मध्य रेल्वेवरील काम प्रलंबित होतं. पण आता या कामालाही चालना मिळाली असून रविवारी, रेल्वे रुळांवर स्टील गर्डर उभारण्याचं काम पूर्ण झालं आहे.

मेट्रो लाइन ६ (पिंक लाइन) अंधेरीतील स्वामी समर्थ नगर आणि पूर्व द्रुतगती महामार्गावर विक्रोळीपर्यंत धावणार आहे. रविवारी पश्र्चिम रेल्वेचे रुळ ओलांडून ही मार्गिका पुढे जाणार आहे. मुंबई मेट्रो ६ १५.३१ किमी लांब आहे. स्वामी समर्थ नगरपासून जोगेश्र्वरी, पश्र्चिम द्रुतगती महामार्ग आणि पवईवरून विक्रोळीपर्यंत पोहोचेल. पिंक लाइन पूर्व आणि पश्र्चिम द्रुतगती महामार्गांना जोडणार आहे. ही मार्गिका पूर्णपणे उन्नत असेल.

२५ एप्रिल रोजी रात्री १०.१५ ते २६ एप्रिल रोजी सकाळी ८.१५ वाजेपर्यंत सुमारे १० तास काम पूर्ण करण्यात आलं. इतर सर्व कामे आता पूर्ण झाल्यामुळे लाइन पूर्ण करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल. गर्डरचं काम करण्यासाठी जोगेश्र्वरी ते राम मंदिर स्थानकांदरम्यान ६ व्या मार्गावर आणि दहिसर येथे ब्लॉक हाती घेतले होते. ब्लॉक कालावधीत काही उपनगरी सेवा रद्द करण्यात आल्या होत्या.

मुंबई मेट्रो पिंक लाइन ही चार मेट्रो मार्गांसाठी इंटरचेंजेस असलेली एक महत्त्वपूर्ण लाइन आहे. या मार्गिकेवरून यलो लाइन-२ ए च्या बांगूर नगर स्थानक, रेड लाइन-७ च्या जेव्हीएलआर स्थानक, एक्का लाइन-३ च्या आरे डेपो मेट्रो स्थानक आणि ग्रीन लाइन-४ च्या गांधी नगर स्थानकांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी इंटरचेंजेस उपलब्ध असतील. या मार्गावर १३ स्थानके आहेत आणि बहुतेक मार्गिका जोगेश्र्वरी-विक्रोळी लिंक रोडच्या मध्यभागावरून जात आहे. अंधेरी येथे महाकाली नगर-जवळील एका ठिकाणी, २.५ किमी लांब लिंक रोडचा मार्ग पिंक लाइनशी थेट जोडण्यात आला आहे. महापालिकेच्या सहकार्याने अतिरिक्त वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रोड मेडियनवर एका पियरवर मेट्रो आणि लिंक रोडचा मार्ग आहे.

या मेट्रो मार्गिकेवर एकूण १३ स्थानकं असतील. लोखंडवाला जवळील स्वामी समर्थ नगर, आदर्श नगर, जोगेश्र्वरी पश्र्चिम, जोगेश्र्वरी-विक्रोळी लिंक रोड (गतडठ), श्याम नगर, महाकाली केव्स, सीप्ज विलेज, साकी विहार रोड, रामबाग, पवई लेक, आयआयटी-पवई, कांजुर मार्ग पश्र्चिम आणि विक्रोळी (पूर्व द्रुतगती महामार्ग) या स्थानकांचा समावेश आहे.

# दिल्ली विमानतळावर स्विस एअर विमानाच्या इंजिनाला आग, ६ प्रवासी जखमी

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** दिल्लीतील आयजीआय विमानतळावर स्विस एअरच्या एलएक्स १४७ या विमानाच्या टेकऑफदरम्यान विमानाच्या इंजिनमध्ये अचानक बिघाड होऊन आग लागल्याची घटना घडली. या घटनेत किमान ६ प्रवासी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, वैमानिक आणि ग्राउंड स्टाफच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली.




सूत्रांच्या माहितीनुसार, स्विस एअरचे हे विमान दिल्लीहून आपल्या गंतव्यस्थानी रवाना होण्याच्या तयारीत होते. विमान धावपट्टीवर वेग घेत असतानाच त्याच्या एका इंजिनमधून असामान्य आवाज येऊ लागला आणि क्षणार्धात त्यातून आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. स्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने तात्काळ टेकऑफ थांबवला आणि एअर ट्रॅफिक कंट्रोलला माहिती दिली. त्यानंतर विमानतळावरील अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा त्वरित सक्रिय झाल्या. काही मिनिटांतच आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आणि विमान सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. या दरम्यान विमानातील प्रवाशांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. अपघातात ६ प्रवासी किरकोळ जखमी झाल्याचे सांगितले जात असून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्व जखमींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत.

विमानतळ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, विमानातील सर्व प्रवासी आणि क्रू सदस्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. सुरक्षेचे सर्व निकष पाळून संपूर्ण बचावकार्य पार पाडण्यात आले.

घटनेनंतर काही काळ धावपट्टीवरील कामकाज प्रभावित झाले होते, मात्र नंतर परिस्थिती पूर्ववत करण्यात आली. या घटनेनंतर विमान कंपनी आणि संबंधित यंत्रणांनी चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक तपासात इंजिनमधील तांत्रिक बिघाडामुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.या घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी तज्ज्ञांची टीम विमानाच्या ब्लॅक बॉक्ससह इतर तांत्रिक बाबींची तपासणी करत आहे. घटना घडली तेव्हा विमानाच्या आतील भागात अचानक धूर पसरल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, क्रू सदस्यांनी प्रसंगावधान राखत सर्व प्रवाशांना शांत ठेवले आणि सुरक्षित बाहेर काढण्यात मदत केली.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यक्रमात गोळीबार; एक जण जखमी

**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन:** अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे व्हाइट हाऊसच्या पत्रकारांसोबत (करस्पॉन्डंट्स डिनर) एका हॉटेलमध्ये डिनरसाठी पोहोचले असताना गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. गोळीबाराचा आवाज होताच डोनाल्ड ट्रम्प यांना सुरक्षारक्षकांकडून तात्काळ हॉटेलमधून बाहेर नेण्यात आलं. हल्लेखोराकडून सात ते आठ गोळ्या झाडण्यात आल्याचे तिथं उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोनाल्ड ट्रम्प हे व्हाइट हाऊसच्या पत्रकारांसोबत एका हॉटेलमध्ये डिनर करण्यासाठी पोहोचले होते. मात्र काही वेळानंतर तिथं अचानक गोंधळ उडाला. एका हल्लेखोराकडून सात ते आठ गोळ्या झाडण्यात आल्या. त्यातील एक गोळी सुरक्षेसाठी तैनात असलेल्या एका कर्मचाऱ्याच्या बुलेटप्रुफ जॅकेटवर लागली. सदर कर्मचाऱ्याची प्रकृती सध्या स्थिर असून त्याच्यावर उपचार सुरू असल्याचं सांगण्यात आलं आहे.

गोळीबार करणाऱ्या संशियत आरोपीला सुरक्षारक्षकांकडून ताब्यात घेण्यात आलं असून सध्या त्याची चौकशी केली जात आहे. या हल्लयाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. हा कार्यक्रम अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी संबंधित होता आणि सर्वांना एकत्र आणणं हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाआधी सुरक्षेच्या धोक्याबाबत आमच्या टीमकडे कोणतीही माहिती नव्हती. मात्र कार्यक्रम सुरू असताना एका अज्ञात व्यक्तीने शस्त्रांसह सुरक्षारक्षकांवर हल्ला केला. त्याला आपल्या सुरक्षा यंत्रणेनं वेळीच रोखलं. एका सुरक्षा अधिकाऱ्याला गोळी लागली असून बुलेटप्रुफ जॅकेट परिधान केलं असल्याने त्या अधिकाऱ्याचा जीव वाचला आहे.

मी या अधिकाऱ्याशी बोललो असून सध्या त्याची प्रक्रिया स्थिर आहे. अशी माहिती ट्रम्प यांच्याकडून देण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## मंथन

# वास्तवाचे भान

डॉ. विवेक राजे/ ९८८१२४२२२४






हजारो वर्षे संघर्ष करूनही हिंदू समाज आपल्याच इतिहासातून काहीही शिकण्यास आज तयार नाही. हिंदू समाजाला आज इतिहासाचे भान आणि वास्तवाची जाण दोन्ही उरलेली नाही हे दुःखाने नमूद करावेसे वाटते. क्षात्रतेजाची सोडून दिलेली उपासना आणि नेभळट अहिंसेची मांडणी अंगवळणी पडल्यामुळे असेल, पण हिंदू समाज पुन्हा पुन्हा त्याच त्याच चुका करताना दिसतो आहे. नाशिक येथील एका बहुराष्ट्रीय कंपनीत उघडकीस आलेल्या घटनेने, स्वस्थ बसणाऱ्या हिंदू समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. हिंदू समाजापुढे नजिकच्या भविष्यात काय असणार आहे, याची एक झलक म्हणजे नाशिक येथे उघडकीस आलेले हे प्रकरण होय. नाशिकमधील निदा खान आणि तिच्या गँगने केलेले कृत्य केवळ एक गुन्हेगारी कृत्य नसून धर्मांध व जिहादी मुस्लिम मानसिकतेचे प्रकटीकरण आहे. या घटनेच्या आधारे हिंदू समाजाने आज काही गोष्टींचे भान राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

हिंदू समाजाला आज इतिहासाचे भान आणि वास्तवाची जाण दोन्ही उरलेली नाही हे दुःखाने नमूद करावेसे वाटते. क्षात्रतेजाची सोडून दिलेली उपासना आणि नेभळट अहिंसेची मांडणी अंगवळणी पडल्यामुळे असेल, पण हिंदू समाज पुन्हा पुन्हा त्याच त्याच चुका करताना दिसतो आहे. नाशिक येथील एका बहुराष्ट्रीय कंपनीत उघडकीस आलेल्या घटनेने, स्वस्थ बसणाऱ्या हिंदू समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. हिंदू समाजापुढे नजिकच्या भविष्यात काय असणार आहे, याची एक झलक म्हणजे नाशिक येथे उघडकीस आलेले हे प्रकरण होय.

**१. इस्लामला सह-अस्तित्व मान्य नाही :-** १९४७ मध्ये देश स्वतंत्र होतानाच या देशाची धर्माच्या आधारे फाळणी झाली. अतिशय भयंकर असा हिंसाचार झाला. हिंदू-मुस्लिम दोन्ही समाजांचे नुकसान झाले. तेव्हा देखील गांधीजींसहीत सर्व हिंदू समाज फाळणीच्या विरोधात होता. स्वतंत्र जमिनीचा तुकडा इस्लामला हवा होता. तो पाकिस्तानच्या रूपाने देण्यात आला. फाळणीनंतर, या देशातील हिंदू समाजाने मुस्लिम समाजाला अत्यंत उदारतेने आणि प्रेमाने स्वीकारले. हे स्वीकारणे हिंदू 'सांस्कृतिक उदारतेवर'वर आधारित होते. परंतु, इस्लामला मुळातूनच सह-अस्तित्व मान्य नाही, नव्हते आणि भविष्यात देखील नसेल हे हिंदूंनी प्रकर्षाने लक्षात घेतले पाहिजे. कुराणातील सुरा :५ ; आयात : ५४, स्पष्टपणे सांगते की, बंधुभाव, आदर, करुणा या भावना केवळ मोमीनांसाठीच असतात. सश्रद्धाने अश्रद्धांबरोबर म्हणजे हिंदूंबरोबर सामान्य व्यवहार ठेवणे हे अल्लाच्या आज्ञेचे उल्लंघन ठरते. त्यामुळे इस्लामला मुसलमानां व्यतिरिक्त इतर धर्मीयांबरोबर सहजीवन/ सहअस्तित्व मान्य नाही याचे योग्य ते भान हिंदू समाजाला राहिलेले नाही.?

**२. हिंदूंची नोकरी केंद्रित जीवन पद्धती:-** जीवन आनंदाने जगण्यासाठी उत्तम व्यवहाराद्वारे पैसे मिळवणे, या तत्त्वज्ञानाला हिंदू समाजाने आज तिलांजलीच दिलेली आहे.? परिणामतः हिंदू समाजातील एका मोठ्या समुहाचे जीवनच नोकरी केंद्रित झाले आहे. एक विचित्र, वेगवान, पैशाला अतिमहत्त्व देणाऱ्या जीवनपद्धतीत आज बहुसंख्य हिंदू समाज अडकलेला दिसतो. दिखाऊ, खर्चिक जीवनशैलीसाठी पैसा आणि त्या पैशांसाठी काय वाट्टेल ते करायला तरुण-तरुणी आज तयार आहेत. जेथे तीन-चार तास रोज प्रवासात घालवावे लागतात, अशा मेट्रो सिटींमध्येच राहणे आज तरुण- तरुणी केवळ फुगलेल्या पगाराच्या आकड्यांसाठी पसंत करताना दिसतात. परिणामतः अनेक कुटुंबांमध्ये नवरा-बायको यांच्या परस्परांबरोबर घालविण्याच्या तासांमधे मोठी घट झालेली आहे. नोकरी आणि त्यातून मिळणारा पैसा हेच यांच्या जीवनाच्या केंद्रस्थानी आलेले आहे. या मानसिकतेचा उपयोग करून कर्मचाऱ्यांना न झेपणारी अशी 'टार्गेट्स', जीवनाचा विचका करणारे कामाचे तास, रात्रपाळी, या सगळ्या गोष्टी आज नोकऱ्यांमध्ये अपरिहार्य झालेल्या आहेत. यातून मग वाढत्या पगारासाठी वाढती स्पर्धा व त्यामागोमाग येणारी नोकरीची असुरक्षितता, हा उद्योगक्षेत्राचा स्थायीभाव झाला आहे. हिंदू पद्धतीचे जीवन जगताच येऊ नये अशा सामाजिक स्थितीला आज जवळजवळ सगळाच समाज पोहोचलेला दिसतो आहे. परिणामी स्वत्वाचा विसर पडून किमान नैतिकता, धर्माभिमान, हिंदू जीवनमूल्ये आचरणात असावी याचेही आज भान सुटलेले दिसते.

**३. कंत्राटी एचआर आणि तत्सम कार्य :-** अनेक कामे आज अनेक उद्योग 'आऊट सोर्स' म्हणजे दुसऱ्या उद्योगांकडून करून घेतात. आपल्या उद्योगात मानव संसाधनांचा वाढलेला खर्च कमी करण्यासाठी हे करण्यात येते. आपल्या वस्तू आणि सेवांची उत्पादन किंमत कमीत कमी ठेवण्याचा हा प्रयत्न असतो. परंतु या प्रयत्नात अनेक महत्त्वाची कामे देखील आता आऊटसोर्स केली जाताना दिसतात. नेमणुका, प्रशिक्षण, किंवा मानव संसाधनांशी संबंधित अशी अनेक कामे आज आऊटसोर्स केली जातात. कार्यस्थळी कुणीतरी एखादाच माणूस 'एचआर' म्हणून नेमलेला असतो. तो स्वतःच कामाच्या दबावाखाली असल्याने अनेक कामांना आणि प्रश्नांना न्याय देऊ शकत नाही. त्यात अमेरिकन विविधता आणि समानता बहुधर्मिक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे त्या-त्या देशातील उद्योगांनी स्वीकारावी म्हणून विविध प्रकारे बाध्य केले जाते. यातून प्रत्येक युनिटच्या पातळीवरील संस्कृतीला बाधा आणण्यात येते आणि स्थानिक संस्कृतीच उद्ध्वस्त केली जाते. या कंत्राटी पद्धतीचा परिणाम म्हणजे उद्योगांच्या स्थानिक शाखांवरची स्थानिक एचआरची पकड ढिली होते, निगराणी संपुष्टात येते.

**४. परिणामशून्य झालेले औद्योगिक कायदे :-** जागतिकीकरणाला अनुरूप अशी औद्योगिक कायद्यांची चौकट निर्माण करण्याच्या नादात अनेक बदल केले गेले. या बदलांचा एक परिणाम म्हणजे कर्मचाऱ्यांना पूर्वी कायद्याद्वारे मिळणारी सुरक्षितता संपुष्टात आलेली आहे. कोणत्याही समाजात जेव्हा एखादी व्यवस्था ढासळते तेव्हा त्यामुळे निर्माण झालेली पोकळी कोणती तरी औपचारिक/ अनौपचारिक अशी व्यवस्था भरून काढते. हा नियम सर्व आस्थापना, समाज, उद्योग, व्यक्ती यांना लागू आहे. त्यामुळे जसे औद्योगिक कायदे सैल होत गेले तसतसे वेगळ्या औपचारिक वा अनौपचारिक प्रथा, नियमांच्या द्वारे ती पोकळी भरली जाऊ लागली. कर्मचाऱ्यांना असलेल्या कायदेशीर, औपचारिक सुरक्षिततेच्या जागी निर्माण झालेली पोकळी आता अनौपचारिक व्यवस्थेद्वारे भरली जाऊ लागली. अनौपचारिक व्यवस्था ही अनेकदा समाजापासून लपवून ठेवली जात असते. मग यात अनेक अनैतिक गोष्टींचा शिरकाव होत असतो. आपल्या देशात बहुधर्मीय व्यवस्था आहे आणि त्यातही इस्लामला अल्पसंख्यक म्हणून झुकते माप दिले जाते. मुस्लिम समाज या स्थितीचा आपल्या धर्मप्रसारासाठी संपूर्ण उपयोग करतो, हे आता उघड सत्य आहे. जर अमेरिकन संकल्पना आमच्या देशात राबवायच्या असतील आणि त्यासाठी पूर्वीची चौकट मोडून काढली जाणार असेल, तर त्या जागी आमच्या देशाच्या सामाजिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थितीला साजेशी अशी भारतीय चौकट निर्माण करण्याचे भान भारतीय समाजाला उरलेले नाही असेच खेदाने म्हणावे लागते.

**५. पाश्चात्त्य 'स्त्रीवादाचा' अतिरिक्त प्रभाव :-** आज अतिआधुनिक बनण्याच्या नादात आम्ही स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री स्वावलंबित्व यांचा पुरस्कार करीत आहोत. या पाश्चात्त्य स्त्रीवादाचा स्वीकार केल्याने आज हिंदू मूल्यव्यवस्थेत आंतरबाह्य बदल घडत आहेत. स्त्रियांना पाश्चात्त्य धर्तीचे शिक्षण, व्यवसाय, राहणी, स्वावलंबित्वाचे संस्कार केले जाताना आपण आपल्या कुटुंबाला, समाजाला, धर्मीयांना उत्तरदायी आहोत हे संस्कार मात्र सुटून जाताना दिसतात. मात्र, इस्लामची मूल्यव्यवस्था संपूर्णपणे वेगळी आहे. उच्चशिक्षण, अभियांत्रिकी वा व्यवस्थापन यासारख्या व्यावसायिक पदव्या मुसलमान समाजाची मानसिकता बदलू शकत नाही. त्यांच्यासाठी छल-कपट करून, जुलूम जबरदस्तीने धर्मांतर करणे हे पहिल्या क्रमांकाचे जीवनमूल्य आहे. या प्रकरणातील सर्वांत भयावह सत्य हे आहे की, आपल्या धर्माच्या विस्तारासाठी मुसलमान कोणत्याही थराला जाऊ शकतात. मग त्यात स्वतःचे करीअर, कुटुंब किंवा सामाजिक शांतता पणाला लागली तरी त्यांना पर्वा नसते.

**६. पालकत्वाची नसलेली जाणीव :-** हिंदूंच्या बाबतीत एक अभिमानाची बाब म्हणजे आमची कुटुंब व्यवस्था होय. आज ही कुटुंब व्यवस्था अस्तित्वात असूनही परिणामकारक मात्र राहिलेली नाही. याला कारण म्हणजे, मुलांना जन्माला घालणाऱ्या जोडप्यांना पालकत्व ही अतिशय कठीण आणि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, याची जाणीवच उरलेली नाही. पालकत्वात पाल्याची अहर्निश काळजी घेणे, काळजी वाहणे हे अध्याहृत आहे. काळजी घेणारे पालक पाल्याचे निरीक्षण करीत असतात. पाल्यातल्या अत्यंत बारीक बदलांची नोंद घेतात. सातत्याने संवाद साधत असतात. काहीही विपरीत वाटल्यास संवादा दरम्यान त्याविषयी माहिती घेऊन, पाल्यांना उपदेश करतात, सावध करतात. तसेच नेहमी त्यांच्या पाठीशी उभे आहोत हा विश्वास देखील देत असतात. आवश्यक ते स्वातंत्र्य देतानाच गरजेच्या वेळी पाल्यांवर बंधने देखील घालीत असतात. आज या बाबतीत हिंदू कुटुंबे कुठेतरी कमी पडताना दिसत आहेत.

आपल्या कुटुंबाचे, संस्कृतीचे आणि पुढील पिढीचे संरक्षण करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.? यासाठी आपल्या पुढच्या पिढ्यांना जागृत करीत या छुप्या युद्धाची जाणीव करून देतांना, इस्लाम आणि लिब्रांडूंच्या 'अल-तकियाचे' भान हिंदू समाजाने राखलेच पाहिजे.

---

## दखल

# भारताच्या सागरी क्षेत्राची आगेकूच

## विक्रमी ९१५.१७ दशलक्ष टन मालवाहतूक




**भारतातील प्रमुख बंदरांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये विक्रमी ९१५.१७ दशलक्ष टन मालवाहतूक करीत वार्षिक उद्दिष्ट ओलांडले आणि ७.०६ टक्के मजबूत वाढ नोंदवली. सुधारित कार्यक्षमता, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि व्हिजन २०४७ अंतर्गत भारताला जागतिक सागरी केंद्र म्हणून स्थान देण्याच्या केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळेच हे उल्लेखनीय यश मिळाले आहे.**

भारताच्या सागरी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी करताना, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या अंतर्गत प्रमुख बंदरांनी एकत्रितपणे ९१५.१७ दशलक्ष टन (एमटी) मालवाहतूक आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये केली आहे. या कामगिरीमुळे ९०४ मेट्रिक टन वार्षिक उद्दिष्ट गाठण्यात यश आले आहे. हे वर्ष-दर-वर्ष ७.०६ टक्क्यांची वाढ दर्शवते, ज्यामुळे सागरी क्षेत्राची मजबूत पुनर्प्राप्ती, वर्धित कार्यक्षमता आणि शाश्वत वाढीच्या मार्गाची पुष्टी होते. भारत सरकारने बंदरांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यासाठी, लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि 'सागरी अमृत काळ व्हिजन २०४७' अंतर्गत अग्रगण्य सागरी राष्ट्र म्हणून भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी केलेल्या परिवर्तनात्मक सुधारणा आणि धोरणात्मक गुंतवणुकीमुळेच हे यश प्राप्त झाले आहे.

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, 'आमच्या प्रमुख बंदरांद्वारे ९१५ दशलक्ष टनांहून अधिक विक्रमी कार्गो हाताळणी ही भारताच्या सागरी क्षेत्राला बळकट करण्याच्या सरकारच्या अतूट वचनबद्धतेचा पुरावा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने व मार्गदर्शनाने आम्ही बंदरांमध्ये जागतिक स्तरावरील पायाभूत सुविधांची निर्मिती करीत आहोत. तसेच आर्थिक, व्यापार व उद्योग क्षेत्रात सुधारणा करत आहोत. भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेला पाठबळ देण्यासाठी अखंड लॉजिस्टिक्समुळे सागरी अमृतकाळ व्हिजन २०४७ अंतर्गत भारताला जागतिक 'सागरी पॉवरहाऊस' म्हणून स्थान देण्याच्या आमच्या संकल्पाला यामुळे बळकटी मिळणार आहे.'

देशातील प्रमुख बंदरांनी विक्रमी मालवाहतूक करीत उत्तम कामगिरी बजावली आहे. दीनदयाल बंदर प्राधिकरण १६०.११ मेट्रिक टन, त्यानंतर पारादीप बंदर प्राधिकरण १५६.४५ मेट्रिक टन आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) १०२.०१ मेट्रिक टन इत्यादी बंदरांनी अव्वल कामगिरी करीत आर्थिक विकासाला बळकटी दिली आहे. तसेच विशाखापट्टणम बंदर प्राधिकरण, मुंबई बंदर प्राधिकरण, चेन्नई बंदर प्राधिकरण आणि न्यू मंगलोर बंदर प्राधिकरणासह इतर महत्त्वाच्या बंदरांनीही एकूण कार्गो थ्रूपुटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत मजबूत कामगिरी नोंदवली. विकास दराच्या बाबतीत, मुरगाव बंदर प्राधिकरणाने सर्वाधिक १५.९१ टक्के वाढ नोंदवली, त्यानंतर कोलकाता डॉक सिस्टीम १४.२८ टक्के आणि जेएनपीए १०.७४ टक्के वाढ नोंदविली, जी सुधारित कार्यक्षमता आणि वाढती मालवाहू परिमाण दर्शवते.

'कार्गो हँडलिंग' अर्थात माल हाताळणीतील सातत्यपूर्ण वाढ ही बंदरांच्या पायाभूत सुविधांची क्षमतावृद्धी आणि आधुनिकीकरण, बळकट झालेली बहुविध वाहतूक जोडणी आणि अखंड अंतर्गत भागांशी जोडणी, डिजिटल आणि स्मार्ट पोर्ट उपक्रमांचा अवलंब, कोळसा, खनिज तेल, कंटेनर्स, खते आणि पेट्रोलियम पदार्थ (पीओएल) यांसारख्या प्रमुख वस्तूंच्या हाताळणीत झालेली वाढ, तसेच बंदरांवरील जलद प्रक्रिया आणि व्यवसाय सुलभतेमुळे झाली आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय बंदर-आधारित विकास, लॉजिस्टिक्सचे एकत्रीकरण आणि शाश्वतता यांवर लक्ष केंद्रित करून एक व्यापक सागरी धोरण पुढे नेत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील विक्रमी कामगिरी वाढता व्यापार आत्मविश्वास आणि ऑपरेशनल कार्यक्षमता आणि क्षमता वापर वाढविण्याच्या उद्देशाने धोरणात्मक उपायांची प्रभावीता दर्शवते. शाश्वत धोरणात्मक गती आणि पायाभूत गुंतवणुकीमुळे, भारतातील प्रमुख बंदरे नवीन टप्पे गाठण्यासाठी आणि देशाच्या आर्थिक वाढीसाठी आणि जागतिक व्यापार नेतृत्वामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी सुस्थितीत आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील विक्रमी कामगिरी ही व्यापारातील वाढता आत्मविश्वास तसेच कार्यान्वयन कार्यक्षमता अर्थात परिचालन दक्षता आणि क्षमता-वापर वाढवण्याच्या उद्देशाने आखलेल्या धोरणात्मक उपायांची परिणामकारकता दर्शवते. धोरणात्मक गतीचे सातत्य आणि पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीच्या जोरावर, भारतातील प्रमुख बंदरे यशाचे नवनवीन टप्पे गाठण्यासाठी, तसेच देशाच्या आर्थिक विकासात आणि जागतिक व्यापार क्षेत्रातील नेतृत्वात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी सुसज्ज आहेत.


(ऑर्गनायझरवरून साभार)

---

## राष्ट्ररक्षा

# जागतिक ऊर्जासंकटात भारताची रणनीती

ब्रिगेडियर हेमंत महाजन
९०९६७०१२५३




युद्धाच्या पारंपरिक सीमा आता पुसट झाल्या आहेत. बुटांचा आवाज किंवा रणगाड्यांची गर्जना आता केवळ संरक्षणाचे निदर्शक राहिलेले नाहीत; त्याऐवजी, पॉवर ग्रीडचे (वीज वाहिनी) जाळे आणि इंधनाच्या पंपांवरची स्थिरता हे राष्ट्राच्या सामर्थ्याचे मोजमाप ठरत आहे. ऊर्जा ही केवळ एक जनसुविधा नसून ती राष्ट्रीय संरक्षणाची आघाडी (फ्रंटलाईन) बनली आहे. भारतासारख्या देशासाठी, ऊर्जा सुरक्षा ही आता राष्ट्रीय अस्तित्व, आर्थिक सार्वभौमत्व आणि लष्करी सज्जतेचा समानार्थी शब्द बनली आहे.

### ऊर्जा सुरक्षेची व्याख्या

२० व्या शतकात, ऊर्जा सुरक्षेकडे केवळ 'पुरवठा' या मर्यादित दृष्टिकोनातून पाहिले जात असे. २०२६ मध्ये ही व्याख्या बदलली असून ती बहुआयामी बनली आहे. आधुनिक ऊर्जा सुरक्षेमध्ये उपलब्धता, परवडणारी किंमत (अफोर्डेबिलिटी), शाश्वतता आणि लवचिकता (रेझिलियन्स) यांचा समावेश असणे अनिवार्य आहे.

### ऊर्जा 'ट्रायलेम्मा' व पाचवा आयाम

जागतिक स्तरावर सध्या 'ऊर्जा ट्रायलेम्मा' (एनर्जी ट्रायलेम्मा) यावर चर्चा सुरू आहे, ज्यात ऊर्जा सुरक्षा (विश्वासार्ह पुरवठा), ऊर्जा समानता (सामान्यांना परवडणारे दर) आणि पर्यावरणीय शाश्वतता (कार्बन उत्सर्जन कमी करणे) यांचा समतोल साधला जातो. मात्र, २०२६ च्या संकटामुळे यात पाचवा महत्त्वाचा आयाम जोडला गेला आहे आणि तो म्हणजे लवचिकता (रेझिलियन्स). एखादा सायबर हल्ला, लष्करी हल्ला किंवा अचानक आलेली भौगोलिक-राजकीय बंदी यांसारख्या धक्क्यांना पचविण्याची आणि त्यातून सावरून पुन्हा उभे राहण्याची राष्ट्राच्या ऊर्जा प्रणालीची क्षमता म्हणजे लवचिकता होय.

### 'चोकपॉईंट व्हल्नेरेबिलिटी' सिद्धांत

आधुनिक ऊर्जा सुरक्षा ही भूगोलावर अवलंबून आहे. 'चोकपॉईंट व्हल्नेरेबिलिटी थिअरी'नुसार, जगातील ज्या अरुंद समुद्री मार्गांतून ऊर्जेची वाहतूक होते, त्यावर ज्या देशाचे नियंत्रण असते, तो संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला ओलीस धरू शकतो.

हॉर्मुझची सामुद्रधुनी ही भारताची 'स्ट्रॅटेजिक अकिलीस हील' (सर्वांत कमकुवत दुवा) आहे, कारण भारताची सुमारे ५० टक्के एलएनजी आणि २०-२५ टक्के तेल आयात येथूनच होते. परंतु, आता मलाक्काची सामुद्रधुनी, बाब अल-मंदेब आणि सुएझ कालवा हे देखील तितकेच महत्त्वाचे बनले आहेत. आज २०२६ मध्ये, आपण या धोक्याचे विदारक वास्तव पाहत आहोत: टँकर्स अडकून पडले आहेत, एलपीजीचा तुटवडा निर्माण झाला आहे आणि सरकारला आपत्कालीन केरोसीन वाटप करावे लागत आहे. भारताची ऊर्जेची जीवनवाहिनी जगातील सर्वांत अशांत संघर्ष क्षेत्रांतून जाते.

### बहु-क्षेत्रीय युद्धातील आघाडी

भारतीय राष्ट्रीय पॉवर ग्रीड आता केवळ औद्योगिक विकासाचा कणा राहिलेली नाही; ती चीन आणि पाकिस्तानसारख्या शेजारील देशांशी सुरू असलेल्या 'मल्टी-डोमेन' युद्धातील पहिली आघाडी बनली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' मधील धड्यांनी हे सिद्ध केले आहे की, सीमेवरील संरक्षणा इतकेच पॉवर ग्रीडचे डिजिटल संरक्षण (सायबर डिफेन्स) करणे महत्त्वाचे आहे.




### ऑपरेशन सिंदूर

**ऊर्जा-कार्यक्षम युद्धाचे मॉडेल :** ऑपरेशन सिंदूरने भारताच्या युद्धनीतीत मोठा बदल घडवून आणला. १९७१ च्या युद्धाप्रमाणे यात मोठ्या प्रमाणावर इंधन लागणाऱ्या लष्करी हालचालींऐवजी अचूक हल्ले (प्रिसिजन स्ट्राईक्स) क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्सवर भर देण्यात आला.

**कमी इंधन भार:** मोठ्या मोठ्या शस्त्रांच्या, सैन्याच्या विविध आक्रमक दलांच्या हालचाली कमी केल्यामुळे इंधनावरील अवलंबित्व कमी झाले.

**वीज शक्तीकडे कल:** डिझेलवर आधारित हालचालींऐवजी आता सायबर युद्ध, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित कमांड सिस्टम आणि ड्रोनच्या थव्यांसाठी विजेवर अवलंबित्व वाढले आहे.

**धोरणात्मक बोध:** भविष्यातील युद्धे कमी इंधन लागणारी पण जास्त 'ग्रीड-डिपेंडंट' (विजेवर अवलंबून) असतील. जर ग्रीड निकामी झाली, तर आधुनिक लष्कर अंध आणि अर्धांगवायू झाल्यासारखे होईल.

### भारत : सुरक्षेची दुहेरी बाजू

भारत आज जगातील तिसरा सर्वांत मोठा ऊर्जा उपभोक्ता आहे. आपली ऊर्जा स्थिती विरोधाभासाने भरलेली आहे: आपण विजेच्या बाबतीत (कोळशामुळे) सुरक्षित आहोत, परंतु हायड्रोकार्बन्सच्या (तेल आणि वायू) बाबतीत असुरक्षित आहोत.

### असुरक्षिततेचे विश्लेषण

**तेल:** भारताचे तेलाचे आयात अवलंबित्व ८५-९०% आहे. यातील ४०% तेल वाहतूक क्षेत्रात वापरले जाते. पुरवठा विस्कळीत झाल्यास महागाई वाढते आणि लष्करी दळणवळण ठप्प होऊ शकते.

**वायू (गॅस) :** आयात अवलंबित्व ५०% आहे. उद्योगांसाठी वायू महत्त्वाचा असला तरी त्याचा पुरवठा अस्थिर मध्यपूर्वेवर अवलंबून आहे.

**कोळसा:** ७०% वीज कोळशातून येते, जी सुरक्षेसाठी महत्त्वाची आहे. पण पर्यावरण आणि वाहतुकीच्या समस्यांमुळे त्यावर दबाव आहे.

**महत्त्वाची खनिजे (क्रिटिकल मिनरल्स) :** हा परावलंबित्वाचा नवीन टप्पा आहे. हरित ऊर्जेकडे वळताना आपण लिथियम, कोबाल्ट आणि निकेलसाठी १००% आयातीवर अवलंबून आहोत, ज्यावर चीनचे वर्चस्व आहे.

### ऊर्जा पायाभूत सुविधा: युद्धाचे लक्ष्य

२०२६ मध्ये, युद्धाच्या मैदानामध्ये प्रत्येक पॉवर प्लांट, रिफायनरी आणि एलएनजी टर्मिनलचा समावेश होतो. जागतिक संघर्षांनी दाखवून दिले आहे की, ऊर्जा पायाभूत सुविधा हे शत्रूचे पहिले लक्ष्य असते.

भारतासाठी जामनगर रिफायनरी, मुंबई हाय आणि नॅशनल लोड डिस्पॅच सेंटर्स यांसारखी महत्त्वाची ठिकाणे शत्रूच्या निशाण्यावर असू शकतात:

**सायबर हल्ले :** संपूर्ण ब्लॅकआऊट करण्यासाठी ग्रीडचे संतुलन बिघडवणे.

**ड्रोन हल्ले :** डिझेल आणि जेट इंधनाचा पुरवठा रोखण्यासाठी रिफायनरीजवर अचूक हल्ले करणे.

**अंतराळ हस्तक्षेप:** आधुनिक स्मार्ट ग्रीडसाठी आवश्यक असलेल्या उपग्रह समन्वयामध्ये अडथळा निर्माण करणे.

### बलस्थाने व कमकुवतपणा बलस्थाने

**रिफायनिंग हब:** भारत जगातील एक मोठे रिफायनिंग केंद्र आहे, ज्यामुळे आपण कच्चे तेल शुद्ध करून निर्यातही करू शकतो.

**सौर आणि पवन ऊर्जा:** अक्षय ऊर्जेचा विस्तार आपल्याला घरगुती वीज पुरवठा देतो, जो बंद करणे शत्रूला कठीण जाते.

**स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह (एसपीआर) :** संकटाच्या काळासाठी भारताकडे तेलाचा साठा आहे, जरी तो सध्या ६०-६२ दिवसांच्या गरजेपुरता मर्यादित असला तरी तो महत्त्वाचा आहे.

### कमकुवतपणा

वितरण कंपन्यांची (डिस्कॉम) अकार्यक्षमता: हा सर्वांत कमकुवत दुवा आहे. आर्थिक समस्यांमुळे या कंपन्या ग्रीडच्या आधुनिकीकरणात मागे पडतात. साठवणुकीचा अभाव: आपण वीज निर्माण करू शकतो, पण ती साठवण्यासाठी लागणारे बॅटरी तंत्रज्ञान आणि पंप-हायड्रो साठवणूक व्यवस्था अद्याप अपुरी आहे.

**अंतर्गत धोके:** महत्त्वाच्या ऊर्जा प्रकल्पांना (अणू ऊर्जा इ.) होणारा राजकीय विरोध आणि समाजमाध्यमांवरील चुकीच्या अफवा राष्ट्रीय धोरणात अडथळा आणतात.

### प्रादेशिक तुलनात्मक विश्लेषण

पाकिस्तान: येथील ऊर्जा क्षेत्र अत्यंत नाजूक स्थितीत आहे. त्यांच्याकडे जागतिक किमती वाढल्यास इंधन खरेदी करण्याची क्षमता नाही, ज्यामुळे ते अधिक हताश झाले आहेत.

चीन: चीनने मध्य आशियातून पाईपलाईन टाकून आणि हरित ऊर्जेसाठी लागणाऱ्या खनिजांवर मक्तेदारी मिळवून आपली सुरक्षा भक्कम केली आहे.

**आग्नेय आशिया:** हे देश पूर्णपणे एलएनजीवर अवलंबून आहेत, ज्यामुळे जागतिक बाजारात भारताची त्यांच्याशी स्पर्धा असते.

**भविष्यातील वाटचाल:** जगण्याची रणनीती

### अल्पकालीन उपाय

**पुरवठादारांचे वैविध्य:** केवळ मध्यपूर्वेवर अवलंबून न राहता आफ्रिका, अमेरिका आणि रशियाकडून आयात वाढवणे.

**लष्करी इंधन साठा:** सशस्त्र दलांसाठी स्वतंत्र इंधन साठा तयार करणे जो नागरी वापरापासून वेगळा असेल.

### दीर्घकालीन रणनीती

**वाहतुकीचे विद्युतीकरण (ईव्ही) :** इलेक्ट्रिक व्हेईकल (ईव्ही) हे केवळ पर्यावरणासाठी नाही, तर ते धोरणात्मक स्वावलंबनासाठी आहे. डिझेलऐवजी कोळसा किंवा सौर ऊर्जेवर आधारित वीज वापरल्यास तेलाची गरज कमी होईल.

**अणुऊर्जेचा विस्तार:** गॅसवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अणुऊर्जा हा शाश्वत पर्याय आहे.

**ग्रीन हायड्रोजन:** अवजड उद्योग आणि लष्करी वाहतुकीला जीवाश्म इंधनापासून मुक्त करण्यासाठी हायड्रोजन तंत्रज्ञानात गुंतवणूक करणे.

**सागरी सुरक्षा:** भारतीय नौदलाने आता 'ऊर्जा रक्षक' (एनर्जी गार्ड) म्हणून भूमिका बजावणे आवश्यक आहे, जेणेकरून सागरी मार्गातून येणारी जहाजे सुरक्षित राहतील.

### निष्कर्ष: ऊर्जा हेच भवितव्य

२०२६ च्या संकटाने आपल्याला शिकवले आहे की, ऊर्जा सुरक्षा म्हणजे केवळ पुरेसा पुरवठा नव्हे, तर ते संकटात टिकून राहण्याचे सामर्थ्य आहे. नागरी क्षेत्रातील वीजपुरवठा खंडित होणे आणि लष्करी पराभव यातील अंतर आता कमी होत चालले आहे. जो देश आपले दिवे चालू ठेवू शकत नाही, तो आपल्या सीमांचे रक्षण करू शकत नाही.

'जो देश ऊर्जेवर नियंत्रण ठेवतो, तो स्वतःच्या नशिबावर नियंत्रण ठेवतो आणि जो देश ऊर्जा सुरक्षित करतो, तो युद्ध न लढता जिंकतो.'

भारताचा मार्ग हा 'आत्मनिर्भरते'चा असावा. आपण केवळ तेलाचे ग्राहक न राहता ऊर्जा तंत्रज्ञानाचे जागतिक नेतृत्व केले पाहिजे. तरच आपली संरक्षण फळी अभेद्य राहील.

### इन ब्रॅकेट

**२०२६ चे धोरणात्मक बोध:** ग्रीड सुरक्षा हेच राष्ट्रीय संरक्षण आहे. पर्याय शोधणे म्हणजे जुने सोडणे नव्हे: कोळसा टिकवून ठेवूनच सौर ऊर्जेचा विकास करणे आवश्यक आहे.

**साठवणूक हाच खरा मंत्र:** विजेची साठवणूक केल्याशिवाय ऊर्जा संक्रमण यशस्वी होणार नाही.

**मुत्सद्देगिरी हेच इंधन:** रशिया आणि मध्यपूर्वेतील देशांशी असलेले संबंध हे कोणत्याही संरक्षण करारा इतकेच महत्त्वाचे आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### आध्यात्मिक मार्गदर्शनातून जीवनाला नवी दिशा- राज दीदी

**सेलू,/प्रतिनिधी-** आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण



जीवनशैलीत मानसिक स्थैर्य, नैतिक मूल्ये आणि योग्य जीवनदृष्टी यांचा अभाव जाणवत असताना ''नारायण शास्त्र'' हे मानवाला जीवन जगण्याची योग्य दिशा देणारे प्रभावी माध्यम ठरत आहे. या शास्त्रामध्ये सांगितलेल्या तत्त्वांमुळे व्यक्तीच्या विचारसरणीत सकारात्मक बदल होऊन समाजात सुसंवाद निर्माण होण्यास मदत होत असल्याचे मत राजेश्वरी मोदी (राज दीदी) यांनी सेलू येथे व्यक्त केले.

नारायण रेकी सत्संग परिवार सेलू च्या वतीने कुबेर का खजाना हा सत्संगरुपी अध्यात्मिक कार्यक्रम बालाजी मंदिरच्या सिंदूर सभागृहात दि. २८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता.

मानवी जीवनाचे अध्यात्मिक आणि भौतिक स्वरूपाचे विश्लेषण करत असताना राजदीदी पुढे म्हणाल्या की, नारायण शास्त्रातून सत्य, अहिंसा, दया, करुणा यांसारख्या जीवनमूल्यांचे महत्त्व पटवून दिले जाते. त्यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधला जातो. तसेच, जीवनातील कठीण प्रसंगात योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढविण्यासाठीही हे शास्त्र मार्गदर्शक ठरते.

विशेष म्हणजे, केवळ भौतिक प्रगतीवर भर न देता आत्मिक उन्नती आणि परमेश्वराशी नाते दृढ करण्याचा संदेश या शास्त्रातून दिला जातो. त्यामुळे व्यक्तीला जीवनाचा खरा उद्देश समजण्यास मदत होते असेही त्यांनी अधोरेखित केले.

सध्याच्या युगात वाढत्या तणाव, स्पर्धा आणि अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर ''नारायण शास्त्र'' हे मानसिक शांती आणि स्थैर्य मिळविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे.नारायण रेकी सत्संग परिवाराच्या तथा कार्यक्रमाच्या आयोजक कांचन बाहेती, किरण राठी, रूपाली जाजू, शीतल बिहाणी, नीता मालानी, अर्चना काबरा यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला नागरिकांची मोठी गर्दी होती. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

### अवैध वाळू वाहतुकीचे दोन टिप्पर महसूल विभागाने केले जप्त



**पूर्णा,/प्रतिनिधी-** तालुक्यातील पिंपळगाव बाळापूर व लक्ष्मी नगर परिसरात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांवर वाहनावर महसूल विभागाने बुधवारी सकाळी कारवाई करत दोन टिप्पर रंगेहात पकडले. पुर्णा तालुक्यातील गोदावरी व पुर्णा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन करून चोरटी वाहतूक सुरू असल्याच्या असल्याची माहिती मिळताच प्रशिक्षणार्थी तहसीलदार भरत गंगावणे व नायब तहसीलदार प्रशांत थारकर यांनी वाळू तस्करी विरोधात कारवाई करण्यात आली. बुधवारी सकाळी तहसील प्रशासनाचे पिंपळगाव बाळापूर व लक्ष्मी नगर शिवारात सापळा रचत कारवाई केली. यावेळी (एम एच २६/ एच /८९८५) व (एम. एच ४०/ ७६२७) क्रमांकाच्या दोन टिप्पर अनधिकृत वाळू वाहतूक करताना पकडण्यात आले. जप्त करण्यात आलेली दोन्ही वाहने पुर्णा तहसील कार्यालयात जमा करण्यात आली आहे.

### बेकायदा गोवंश तस्करी आणि कत्तल तात्काळ थांबवा :

**परभणी,/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून जिंतूर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बेकायदा गोवंशी कत्तलीचे व तस्करीचे प्रमाण वाढले आहे. पोलिस प्रशासनाने त्या विरोधात तात्काळ कठोर भूमिका घ्यावी, अन्यथा सकल हिंदु समाज त्या विरोधात मोठे आंदोलन उभारेल, असा इशारा एका शिष्टमंडळाने जिंतूर पोलिस प्रशासनास सादर केलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

रात्रीच्या वेळी किंवा पहाटेच्या सुमारास मालवाहू वाहनातून गोवंशाची अत्यंत निर्दयीपणे व दाटीवाटीने बेकायदा वाहतूक केली जात आहे. प्राण्यांना कुरपणे वागविले जात असून वाहतूकीचे कोणतेही परवाने किंवा डॉक्टरांचे प्रमाणपत्र नसतांना राजरोसपणे प्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. तसेच काही ठिकाणी अनाधिकृत कत्तलखानेसुध्दा सुरु असल्याची शंका आहे. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकेल, भारतीय संस्कृतीत गायीला पवित्र मानले जाते, अशा प्रकारे होणाऱ्या तस्करीमुळे भावीकांच्या आणि गोरक्षकांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे या गोवंश तस्करीमागील रॅकेट तात्काळ उघडकीस आणावे, प्रमुख नाक्यावर आणि महामार्गावर कडेकोट बंदोबस्त तैनात करावा, संशयास्पद वाहनांची कसून तपासणी करावी, अवैध कत्तलखान्यांवर तातत्काळ छापे टाकावेत, अशी मागणी सकल हिंदु समाजाच्या एका शिष्टमंडळाने केली आहे.

# शाश्वत शेतीसाठी विद्यापीठाचे नाविन्यपूर्ण उपक्रम; नैसर्गिक शेतीला चालना- कुलगुरू मणि

**परभणी,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानांतर्गत ''शाश्वत शेती समृद्ध शेतकरी'' या संकल्पनेवर आधारित विभागस्तरीय कार्यशाळा दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालयातील दीक्षांत सभागृहात उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी आयुक्तालय, पुणे येथील आत्माचे संचालक तथा निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक माननीय श्री. सुनील बोरकर उपस्थित होते. व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक श्री. महेशकुमार तीर्थकर, परभणीचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. दौलत चव्हाण तसेच लातूर, परभणी, धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यातील कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, प्रगतशील शेतकरी व तज्ज्ञ मंडळी उपस्थित होते.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी नमूद केले की, आजच्या कार्यशाळेत शेतकऱ्यांचा उस्फूर्त सहभाग दिसून आला असून सभागृह पूर्ण क्षमतेने भरले, याबद्दल आयोजक व शेतकरी बांधवांचे त्यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्र हे शेती विकासासाठी देशाला दिशा देणारे राज्य आहे, असे सांगत त्यांनी राज्यातील माननीय मुख्यमंत्री व कृषिमंत्री शेतकऱ्यांना देत असलेल्या सन्मानाचा उल्लेख केला. विद्यापीठ ''शेतकरी देवो भव:'' या भावनेतून कार्य करत असून, प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी ''माझा एक दिवस माझा बळीराजासोबत'' तसेच आठवड्यातून दोन दिवस ''ऑनलाइन शेतकरी-शास्त्रज्ञ कृषि संवाद'' असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. याशिवाय दरवर्षी तीन मोठ्या शेतकरी मेळाव्यांचे आयोजन करून शेतकऱ्यांशी सातत्याने संवाद साधला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची माहिती मिळत आहे. आजच्या कार्यशाळेत प्रात्यक्षिकाधारित



मार्गदर्शनाद्वारे नैसर्गिक शेतीचे ज्ञान वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

राज्यात शाश्वत शेतीसाठी माननीय राज्यपालांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात असून, याच पार्श्वभूमीवर विद्यापीठ व 'पोकरा' () यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. हवामान अनुकूल व शाश्वत शेतीसाठी उपयुक्त नैसर्गिक तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी विद्यापीठ, कृषी विभाग व आत्मा हे सर्व घटक एकत्रितपणे कार्य करत आहेत. नैसर्गिक पिकांसाठी विद्यापीठाकडून पीकनिहाय मानके देण्यात येत असून, यामुळे सेंद्रिय व नैसर्गिक शेतीस चालना मिळत आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होत असून, जनतेलाही शुद्ध व पौष्टिक अन्न उपलब्ध होत आहे, असे त्यांनी नमूद केले.

पुणे येथील आत्माचे संचालक तथा निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक माननीय श्री. सुनील बोरकर यांनी सांगितले की, निसर्गाने सर्व जीवांना जगण्याचा अधिकार दिला आहे आणि निसर्गातील संतुलन राखणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रासायनिक कीटकनाशकांचा अतिरेक टाळून सेंद्रिय पर्यायांचा वापर करावा. त्यांनी गुलाबी बोंड अळीचे उदाहरण देत सांगितले की, तिच्या नियंत्रणासाठी रासायनिक उपायांपेक्षा निंबोळी अर्कासारखे सेंद्रिय उपाय अधिक प्रभावी ठरतात. यामुळे अंडी व अळी दोन्हींचे नियंत्रण होते. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा अभ्यास करून नैसर्गिक व सेंद्रिय तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. अशा कार्यशाळा हे ज्ञानवृद्धीसाठी अत्यंत उपयुक्त व्यासपीठ असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाची प्रस्तावना लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक श्री. महेशकुमार तीर्थकर यांनी केली. सूत्रसंचालन आत्मा, परभणीच्या सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक श्रीमती स्वाती घोडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, परभणी श्री. दौलत चव्हाण यांनी केले.

कार्यशाळेत नैसर्गिक शेतीची संकल्पना, तंत्रज्ञान, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, मृदा व जलसंवर्धन तसेच उत्पादनाच्या विपणन व्यवस्थापनावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. हवामानानुसार पिकांचे नियोजन व शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत सकाळ व दुपार अशा दोन सत्रांमध्ये विविध विषयांवर सखोल चर्चा झाली. प्रात्यक्षिके व पॅनल चर्चेचे आयोजनही करण्यात आले होते. प्रगतशील शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवांचे शेअरिंग करून इतरांना प्रेरित केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यशाळेमुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीच्या आधुनिक पद्धतींची माहिती मिळून त्यांच्या उत्पन्नवाढीस निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान- कांबळे

**सेलू,/प्रतिनिधी :** लोकशाहीचा कणा म्हणजे सामान्य जनता असून लोकशाहीच्या भक्कम भवितव्यासाठी नागरिकांमध्ये गुणवत्ता आणि जागरूकता असणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा आत्मा आहे. मत विकणे म्हणजे स्वतःचा आत्मसन्मान विकणे होय. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीत अत्यंत मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक उत्तम कांबळे (नाशिक) यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने सोमवारी (दि. २०) साई नाट्यगृहात आयोजित स्मृती व्याख्यानमाला श्रोत्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण होते, तर पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी दिपककुमार वाघमारे, तहसीलदार डॉ. शिवाजीराव मगर, पोलिस निरीक्षक दिपक बोरसे, गणेश काटकर, दत्ता तांबे, अशोक कासार तसेच माजी नगराध्यक्ष मारोती चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना उत्तम कांबळे यांनी संविधानाच्या मूलभूत तत्त्वांवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, संविधान हा संघर्षातून निर्माण झालेला दस्तऐवज आहे.

## ना.मेघना साकोरे यांच्या आग्रही भूमिकेमुळे चारठाण्याला मिळणार अप्पर तहसील कार्यालय.

### पालकमंत्री यांच्यानेतृत्वात शिष्टमंडळाने घेतली महसूल मंत्री यांची भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी-** : नामदार मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांच्या आग्रही भूमिकेमुळे चारठाण्याला मिळणार अप्पर तहसील कार्यालय
मिळणार असून पालकमंत्री यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने घेतली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली.

दि.२२ एप्रिल २०२६ बुधवार रोजी चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालयाची मंजुरी मिळविण्यासाठी चारठाणा येथील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री नामदार मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांची भेट घेतली व चारठाणा येथे अप्पर तहसील ची मंजुरी देण्याची विनंती केली.भेटी दरम्यान शिष्टमंडळाने महसुल मंत्री बावनकुळे साहेबांना चारठाणा महसूल मंडळाचे महत्वपूर्ण सामाजिक, भौगोलिक



व निजामकालीन जुने परगणा असलेले महसुली दस्तावेज सादर केले. पालकमंत्री नामदार मेघना दिदी बोर्डीकर साहेब यांनी आग्रही भूमिका घेत चारठाण्याचे भौगोलिक क्षेत्राचे महत्व महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास आणुन दिले.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांनी शिष्टमंडळासोबत सकारात्मक चर्चा केली व जिल्हाधिकारी परभणी व महसूल अप्पर सचिव श्री. विकास खारगे यांना परिपूर्ण प्रस्ताव स्वीकारून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले व चारठाणा येथे लवकरच अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्याचे स्पष्ट संकेत दिले.

यावेळी चारठाणा येथील शिष्टमंडळात भाजपा नेते नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, दिपक भाग्यवंत, संदीप देशमुख, साबेर पठाण यांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ लाभार्थ्यांसाठी नांदेड येथे ३० एप्रिल रोजी कर्जवाटप व स्वयंरोजगार मेळावा होणार

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघु उद्योजक, सुशिक्षित बेरोजगारांना स्वावलंबी बनविण्यासाठी आणि त्यांना स्वतः चा व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने इतर मागास बहूजन कल्याण विभागातंर्गत असलेले इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती आणि वनार्टी यांच्या संयुक्त विद्यामाने परभणी जिल्ह्यातील लाभार्थ्या करीता नांदेड येथील श्री. शंकरराव चव्हाण सभागृह, विष्णुनगर, या सभागृहात दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ''कर्जवाटप व स्वंयरोजगार मेळाव्याचे'' आयोजन करण्यात आले आहे.

सदर मेळाव्यात महाराष्ट्र राज्य



इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या महामंडळाच्या कर्जवाटप व प्रशिक्षण योजनां बाबत ऑनलाईन अर्ज कसा करावा, अर्जा करीता आवश्यक कागदपत्रे कोणती आणि अर्जातील त्रुटी कशा टाळाव्यात याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या योजनेतील पात्र ठरलेल्या/निवड झालेल्या लाभार्थ्यांना सशर्तहेतुपत्र, मंजुरी पत्राचे वाटप, प्रशस्ती पत्र, मेडलचे वाटप, ट्रॅक्टर, वाहने वगैरे वस्तुचे वितरण हे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघुउद्योजक, बेरोजगार तरुणांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याकरीता तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने यासंधीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा असे आव्हान महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जे. झेड. राठोड, यांनी केले आहे.

### परभणी नर्सिंग कॉलेजचा बीएससी नर्सिंग परिक्षेत १०० टक्के निकाल

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील धनेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित परभणी नर्सिंग कॉलेजने बीएससी नर्सिंग परिक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.



आ.डॉ.राहुल पाटील यांच्या धनेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या नर्सींग कॉलेजने मागील काही वर्षापासून परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा सुरू केली आहे. यंदा झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून यात सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे. याबद्दल आमदार डॉ. राहुल पाटील यांनी या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.आरती यांनी देखील महाविद्यालयाच्या यशाचे श्रेय विद्यार्थी आणि प्राध्यापकांना दिले आहे. भविष्यातही अशीच यशस्वी परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला तसेच परभणी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता आणि संचालक डॉ. प्रमोद शिंदे यांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून परभणी मध्ये आरोग्य क्षेत्रात काम करण्यासाठी प्रशिक्षित व कुशल नर्सिंग मनुष्यबळ तयार होणे ही काळाची गरज आहे. या निकालामुळे त्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडत आहे असे मत व्यक्त केले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# बालपणीची मैत्री उतारवयात जगण्याची ऊर्जा देते - हेमंतराव आडळकर

## सेलूतील कै.रा.ब.गिल्डा सभागृहाचे उद्घाटन : देखाव्यातून सभागृहाच्या जुन्या स्मृतींना दिला उजाळा

**सेलू ,/प्रतिनिधी:** बालपणीची मैत्री उतारवयात जगण्याची ऊर्जा देते - हेमंतराव आडळकर : सेलूतील कै.रा.ब.गिल्डा सभागृहाचे उद्घाटन : देखाव्यातून सभागृहाच्या जुन्या स्मृतींना दिला उजाळा देण्यात आल आहे.

उतारवयात बालपणीची मैत्री ही जगण्याची ऊर्जा असते, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष हेमंतराव आडळकर यांनी केले.

येथील नूतन विद्यालयातून १९७२ ला दहावी उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या आर्थिक योगदान, सामुहिक गुरूदक्षिणेतून नूतन विद्यालय शिक्षण संस्थेच्या पुढाकारातून नूतनीकरण झालेल्या कै.रा.ब.गिल्डा सभागृहाचे उद्घाटन शुक्रवार (दि.२४) रोजी १९७२ चे माजी विद्यार्थी माजी नगराध्यक्ष हेमंतराव आडळकर, श्याम मणियार, उद्योजक रामप्रसाद घोडके, प्रा. भगवान टेकाळे, डॉ. सुभाष परतानी, शेतीनिष्ठ शेतकरी पांडुरंग मगर, शरयू मुळावेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम.लोया हे होते. तर व्यासपीठावर सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, महिला मंडळाच्या सचिव ललिता गिल्डा यांची उपस्थिती होती. नूतन विद्यालयाच्या कै. रा.ब.गिल्डा सभागृहाचा नूतनीकरण उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी आडळकर म्हणाले, कै.रा.ब.गिल्डा सभागृहाचे नूतनीकरण व्हावे ही आम्हा सर्व बाल मित्रांची इच्छा होती. आम्हा १९७२ च्या एस.एस.सी बॅचचा रा.ब.गिल्डा सभागृह नूतनीकरणचा संकल्प सिद्धीस गेला. याचा आनंद आहे.

प्रास्ताविक सहसचिव जयप्रकाश बिहाणी यांनी केले. सुत्रसंचलन अशोक लिंबेकर यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक संतोष पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी, विद्यमान प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात नूतन विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

नूतन विद्यालय सेलूचे ऱ्हदय...

सेलू स्वप्नांची तसेच संस्कृती आणि संस्कारांची नगरी आहे. तर नूतन विद्यालय हे सेलूचे ऱ्हदय आहे. नूतनमध्ये विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. इथे केवळ शिक्षणच मिळत नाही तर आयुष्यभर पुरेल एवढी ज्ञान, संस्कारांची शिदोरी मिळते. विद्यार्थ्यांच्या उत्तम शिक्षणाचा पाया मजबूत होतो, असे प्रतिपादन मणियार यांनी केले. प्रा. भगवान टेकाळे यांनी, बालपणीची शाळा आजही आमच्या मनात आहे. नूतनीकरणासाठी आम्ही विद्यार्थ्यांनी सामुहिक गुरूदक्षिणा दिली, अशी भावना व्यक्त केली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, ललिता गिल्डा, डॉ. सुभाष परतानी, रचना गिल्डा यांनीही मनोगत व्यक्त केले.

देखाव्यातून सभागृहाच्या जुन्या स्मृतींना उजाळा..

ज्येष्ठ शिक्षक अशोक लिंबेकर यांच्या संकल्पनेतून कै.रा.ब. गिल्डा सभागृहात संपन्न झालेल्या काही कार्यक्रमांची देखावे प्रातिनिधिक स्वरूपात सादर केली गेली.जुन्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या सात दालनांनी माजी विद्यार्थी, मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले. या सात दालनात नूतन विद्यालय संस्था वर्धापन दिन, माणिक वर्मा संगीत मैफिल, श्यामची आई, गुणवंत विद्यार्थी सत्कार, श्रीरामजी भांगडीया स्मारक व्याख्यानमाला, माजी विद्यार्थी मेळावा, शिक्षकदिन ही देखावे साकारली होती.

१९७२ च्या एस. एस. सी. बॅचचे माजी विद्यार्थी प्रमोदिनी सरदेशपांडे, मुजीब घौरी, पुष्पा सोमाणी, वामनराव मंडलिक, सुशीला झंवर, ज्ञानेश्वर सोळंके, मंगल दुरूकर, सिद्धराम निलवर्ण, राधा कासट, रणजीत तौर, विठ्ठल गायकवाड, अरविंद चितळे, प्रकाश धामणगावकर यांच्या हस्ते सात दालनांचे उद्घाटन झाले. या प्रसंगी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य नंदकिशोर बाहेती, दत्तराव पावडे, राजेश गुप्ता, शालेय समितीचे अध्यक्ष सिताराम मंत्री, डॉ. उत्तम राठोड, प्रा. प्रविण सोनवणे, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, पर्यवेक्षक गणेश माळवे, मुख्याध्यापक निशा पाटील, उल्हास पांडे यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन अनुजा सुभेदार यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजकांच्यावतीने मोठे परिश्रम घेण्यात आलेले दिसून आलेले होते.

विशेष

# नारी ते नारायणी

वैजयंती प्रदीप वडनेरकर

**राष्ट्र सेविका समिती, विदर्भ प्रांत व श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने अमरावती येथे रविवार, २६ एप्रिल रोजी 'नारी ते नारायणी' विकसित भारत २०४७ या विषयावर प्रांतीय परिसंवाद आयोजिला आहे. त्यानिमित्त...**

**'यत्र नार्यन्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता।'**

अशी पुण्यभूमी, आध्यात्मिक शक्तीने युक्त अशी आमची भारत माता. तिच्या कुशीत आजपर्यंत अनेक कर्तृत्ववान, बुद्धिमान, शौर्यवान व प्रखर राष्ट्रभक्त नारीशक्तींनी जन्म घेऊन मां भारतीची कूस धन्य केलेली आहे. अशा पुण्यभूमीत देव-देवताही अवतार घेऊन आपला जन्म सार्थकी लावतात. अशी ही नारीशक्ती या समाजाची अर्धी शक्ती आहे. तिने सक्षम, समर्थ, संस्कारक्षम होऊन प्रकट दिव्यशक्तीतून विविध क्षेत्रांत आपल्या कर्तव्यदक्षतेने व विशेष कार्यपद्धतीने यशस्वीपणे पावले रोवून राष्ट्रविकासाच्या मार्गात आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमटविला आहे.

आज मातृशक्तीचे अभूतपूर्व कार्य, तिच्या अंगातील सप्तशक्तीचा शोध जरी आज लागल्यासारखा वाटत असला, तरी स्त्रीशक्तीचा साक्षात्कार झालेल्या वंदनीय मावशी उपाख्य वंदनीय लक्ष्मीबाई केळकर यांनी मातृशक्तीतील मातृत्व, कर्तृत्व व नेतृत्वाची शक्ती त्यांच्या स्त्रीशक्तीच्या सखोल अभ्यासाच्या चिंतन आणि मननातून जाणून घेतली. देवी अष्टभुजेचा अंश असणारी ही मातृशक्ती पारतंत्र्याच्या काळात अतिशय हतबल, असुरक्षित व आत्मशक्ती विस्मृत झालेली आणि अन्यायाची शिकार बनली होती. तिच्या सत्त्व, स्वाभिमान आणि अंगभूत शक्तीचा अपमान होत होता. पण पारतंत्र्याच्या काळात प्रवाहाच्या विरोधात खंबीरपणे उभे राहून स्त्रीशक्तीचे जागरण व संघटन करण्यासाठी कोणतेही खंबीर नेतृत्व उभे नव्हते. मातृशक्तीला जागृत करून तिचे संघटन करून तिला स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे ध्येय समोर ठेवून आजपासून ९० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापक संचालिका वंदनीय मावशी केळकर; ज्यांच्या हृदयांत फक्त देश, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचेच संस्कार होते; त्यांनी २५ ऑक्टोबर १९३६ रोजी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर नारीशक्तीच्या जगात समिती स्थापन करून एक अभूतपूर्व सीमोल्लंघन घडवून आणले. जे आज अखिल भारतीय स्तरावरच नव्हे, तर वैश्विक स्तरावर आपल्या विशेष कार्यपद्धतीने कार्यरत आहे आणि स्त्रीशक्तीसाठी वरदानसदृश ठरले आहे.

स्त्री स्वसंरक्षणक्षम व्हावी असा उद्देश समोर ठेवून प्रारंभ झालेले हे कार्य. वंदनीय मावशी म्हणत, 'स्व' मध्ये स्वतःचे संरक्षण एवढेच अभिप्रेत नाही, तर 'स्व'मध्ये ज्या ज्या गोष्टी अंतर्भूत आहेत, त्यांचे रक्षण करण्यासाठी स्त्रीने सामर्थ्यशाली बनून सुशीला व सुधीरा बनले पाहिजे. स्वतःचा परिवार, कुळाचार यासोबत स्वराष्ट्राची प्रतिष्ठा याचेही तिला रक्षण करता आले पाहिजे. स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वभाषा यासोबत 'सहा भ'चे सुद्धा संरक्षण



करण्यासाठी प्रत्येक स्त्रीने आपल्या मातृत्वभावाला जागृत करून आपल्या विशाल मातृहृदयातील प्रेम, सेवा, संस्कार आणि समरसतेच्या भावनेतून घर, समाज व राष्ट्रविकासात संघटित शक्तीच्या स्वरूपात योगदान देण्यासाठी तयार असले पाहिजे.

याच विचारातून समितीच्या कार्यपद्धती, आचारविचार व संस्कारांतून राष्ट्र सेविका घडू लागल्या. संघटनेच्या या कार्याला समर्पणाचा एक विलक्षण संस्कार लाभलेला आहे. वंदनीय मावशींच्या काळातच पुणे येथे वंदनीय ताई आपटे व भंडारा येथे मा. नानी कोलते यांनीही विचारातून कार्याला सुरुवात करून मुलींना दंड, लाठी-काठी स्वसंरक्षणाच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यास प्रारंभ केला होता.

वंदनीय मावशी म्हणत की, प्रत्येक घर एक विद्यालय असून त्याची आचार्या म्हणजे त्या घराची मातृशक्ती. जी सृजनशील असून नव्या पिढीची निर्मिती करते, पर्यायाने ती राष्ट्राची आधारशक्ती आहे. कारण वंदनीय मावशींनी मातृशक्तीला समाजरूपी रथाची सारथी म्हटले आहे श्रीकृष्णासारखी. कारण श्रीकृष्णाने गीतेच्या रूपात अर्जुनाला मार्गदर्शन करून जीवनाचा अर्थ, दिशा व ध्येय समजावून सांगितले. त्याचप्रमाणे स्त्रीनेही या समाजरूपी रथाची सारथी बनून व्यक्ती ते समाज आणि राष्ट्र या विकास प्रक्रियेत आपल्या राष्ट्रभक्तिपूर्ण आचारविचार, व्यवहार व संस्कारांतून निःस्वार्थपणे योगदान द्यायचे आहे. 'राष्ट्र सर्वोपरि' हा मंत्र जपत कृती व कार्य करायचे आहे.

८ मार्च आपण जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्ती गौरव दिन म्हणून साजरा करतो. वर्षभरातील तिच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा हा सन्मानाचा दिवस आहे. नारी ही शक्तिरूपिणी, जगतजननी म्हणून कार्यरत असते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी' अशी तिची महती राष्ट्रमाता जिजाऊंनी आपल्या मातृकर्तव्यातून सिद्ध केलेली आहे.

'गृहिणी गृहं उच्यते' ही तिची जबाबदारी! कन्या, भगिनी, पत्नी आणि अनंतकाळची माता अशा विविध भूमिका ती जीवनभर पार पाडत असते. ती कुटुंबव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. घराचा श्वास, प्राण आहे. तिच्या शक्तीच्या आधारावर संपूर्ण घर उभे असते. तिची स्वप्ने, भावना आणि आकांक्षांचे आकाश तिचे घरकूल असते. समर्पणभावातून ते उभे असते. 'नारी ते नारायणी' हा तिचा प्रवास तिच्या सुखी परिघातच घडत असतो. ती माउली असते सुख-दुःख, ऊन-पावसात माया-ममतेची आणि सन्मानाची शाल परिवाराभोवती गुंडाळणारी. एक पथदर्शी दीपस्तंभ बनून जीवनभर कुटुंबाची आधारशक्ती असणारी मातृशक्ती. याच मातृशक्तीसमोर समाज व राष्ट्रोन्नतीच्या विकासाचे विशाल आकाश समितीने आपल्या कार्य-विचार दर्शनातून उलगडून दिले आहे. एक नागरिक व राष्ट्रभक्त म्हणून मातृशक्तीला 'राष्ट्र सर्वोपरि' या यज्ञात स्वतःचे महत्त्वपूर्ण योगदान द्यायचे आहे.

समाजरूपी गरुड पक्षाचे स्त्री व पुरुष हे तुल्यबळ पंख आहेत. म्हणून राष्ट्ररूपी गरुडाला प्रगतीची झेप घेण्यासाठी दोन्हीही समान शक्तीने सक्षम असणे आवश्यक आहे. 'राष्ट्र प्रथम' या संस्कारात जीवनाची जडणघडण होणे आवश्यक आहे. हाच संस्कार समितीमध्ये नित्य शाखा, अभ्यासवर्ग व बैठकीतून केला जातो आणि राष्ट्र सेविका घडवल्या जातात.

आज ९० वर्षांच्या समितीच्या कार्यकाळात याच भावनेतून व संस्कारातून समर्पित व संस्कारित सेविका राष्ट्राच्या विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. राष्ट्रविकासाच्या विविध क्षेत्रांत नारीशक्तीने आपल्या कर्तृत्व, कर्तव्यबुद्धी आणि राष्ट्रभक्तीच्या माध्यमातून अतुलनीय ठसा उमटविला आहे.

श्रीकृष्णाने गीतेच्या दुसऱ्या अध्यायात विविध ठिकाणी असलेल्या आपल्या अस्तित्वाचे वर्णन करताना नारीशक्तीमध्ये त्यांचे अस्तित्व 'सप्तशक्ती'च्या रूपात असल्याचे सांगितले आहे.

**मंगला, नारायणी मा, सप्तशक्तिधारिणी,**
**जगत कारण मातृरूपा, प्रीतिशक्ती प्रदायिनी,**

श्री, कीर्ती, वाक्, स्मृती, मेधा, धृती, क्षमा! अशा या सप्तगुणांनी परिपूर्ण नारीशक्तीने आपल्या जीवनाचे राष्ट्रहितासाठी समर्पण करणे म्हणजेच नारीवंदन. सन्मानातून प्राप्त होणाऱ्या जबाबदाऱ्या व कर्तव्यधर्माचे पालन करणे हे तिचे पहिले कर्तव्य आहे. याचा पहिला परिणाम राष्ट्रोन्नतीवर होत असला, तरी त्याचा प्रमुख आधार म्हणजे कुटुंबव्यवस्था आणि त्यातून घडणारा सुसंस्कारित समाज. म्हणूनच आपण म्हणतो-

**'या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता,**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।'**
**उंच भरारी घे आकाशी,**
**व्यापून टाक अंबर-धरती,**
**कर्तृत्वाची दिव्यशलाका,**
**उजळून टाकील दाही दिशा या।**
**सप्तशक्तीचा उंच झोका,**
**वेध घेईल भविष्याचा,**
**तिमिराकडून तेजाकडे,**
**प्रवास होईल नारीशक्तीचा।**
**सुकन्या तू या मायभूमीची,**
**होऊनी राष्ट्राची आधारशक्ती,**
**संघटित शक्तीतून होशील,**
**माँ भारतीची भाग्यविधाता**
**नारीशक्तीतुनी नारायणी माता,**
**नारीशक्तीतुनी नारायणी माता...**

यवतमाळ, ९५७९६०९९७५

दखल

# भारतातील निरक्षरता

डॉ. चंद्रशेखर जोशी

**भारताला स्वातंत्र्य मिळून पाऊण शतक झाले असून भारताने कृषीपासून अंतराळापर्यंत देदीप्यमान प्रगती केली आहे. भारताची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकावर असून तिसऱ्या क्रमांकावर येण्यासाठी सज्ज आहे. विज्ञान, व्यापार-उद्योग, संशोधन, अंतरिक्ष अशा विविध क्षेत्रांत प्रगती करणाऱ्या भारतात आजही निरक्षरता अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना जन्म देत आहे.**

निरक्षरता ही भारताच्या सामाजिक व शैक्षणिक विकासासमोर उभी असलेली एक गंभीर समस्या आहे. भारतातील निरक्षरता ही एक मोठी सामाजिक-आर्थिक समस्या असून २० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या अजूनही साक्षर नाही. प्रामुख्याने ग्रामीण भाग, महिला आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.



आधुनिक युगात शिक्षणाला जीवनातील प्रगतीचे प्रमुख साधन मानले जाते. व्यक्तीच्या बौद्धिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी शिक्षण अत्यंत आवश्यक असते. तरीही भारतातील अनेक लोक आजही मूलभूत शिक्षणापासून वंचित आहेत. वाचता-लिहिता न येणे किंवा शिक्षणाचा प्राथमिक स्तरही पूर्ण न करणे याला निरक्षरता असे म्हणतात. भारत हा विविधतेने नटलेला विशाल देश आहे. येथे भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमध्ये मोठी विषमता आढळते. या विषमतेचा थेट परिणाम शिक्षणावर व समाज जीवनावर होतो. ग्रामीण भागात शाळांची कमतरता, शिक्षकांची अनुपलब्धता, शैक्षणिक साधनांची मर्यादा आणि दळणवळणाच्या अडचणी यामुळे अनेक मुले शिक्षणापासून दूर राहतात. काही ठिकाणी शाळा दूर अंतरावर असल्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत जाणे कठीण जाते.

**भारतातील निरक्षरतेची प्रमुख तथ्ये**

साक्षरता दर : २०२३-२४ च्या अहवालानुसार, भारताचा एकूण साक्षरता दर सुमारे ८०.९ टक्के आहे, ज्याचा अर्थ सुमारे २० टक्के लोकसंख्या अजूनही निरक्षर आहे.

लिंग असमानता : पुरुषांचा साक्षरता दर (सुमारे ८२ टक्के) महिलांच्या साक्षरता दरापेक्षा (सुमारे ६५ टक्के) लक्षणीयरीत्या जास्त आहे.

ग्रामीण-शहरी दरी : ग्रामीण भागात साक्षरता दर (७७ टक्के) शहरी भागाच्या (९० टक्के) तुलनेत कमी आहे.

सर्वाधिक निरक्षर प्रौढ : जगात सर्वाधिक निरक्षर प्रौढ लोकसंख्या भारतात आहे; विशेषतः ५० वर्षांवरील लोकांमध्ये.

राज्यवार फरक : केरळसारखी राज्ये सर्वोच्च साक्षरता दरावर असताना बिहारसारखी राज्ये सर्वांत मागे आहेत.

**निरक्षरतेची कारणे**

गरिबी : गरिबीचे दुष्टचक्र हे निरक्षरतेचे प्रमुख कारण मानले जाते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना मुलांना शाळेत पाठविणे शक्य होत नाही. त्याऐवजी मुलांना लहान वयातच कामावर पाठविले जाते, ज्यामुळे बालमजुरी वाढते आणि शिक्षण खंडित होते. पालक स्वतः अशिक्षित असल्यास शिक्षणाचे महत्त्व त्यांना पुरेसे जाणवत नाही. परिणामी मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

शैक्षणिक पायाभूत सुविधांचा अभाव : ग्रामीण भागात शाळा, शिक्षक आणि शालेय साहित्याची कमतरता.

सामाजिक आणि सांस्कृतिक घटक : महिला शिक्षणाकडे दुर्लक्ष व महिलांमधील निरक्षरता ही आणखी एक चिंताजनक बाब आहे. काही पारंपरिक समजुती आणि सामाजिक प्रथा यांमुळे मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही. लवकर लग्न, घरगुती जबाबदाऱ्या आणि सुरक्षिततेच्या समस्या यांमुळे अनेक मुली शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे समाजातील स्त्री-पुरुष समानतेवरही परिणाम होतो.

लोकसंख्येची झपाट्याने वाढ : भारतातील लोकसंख्येची वाढ आजही चिंतेचा विषय आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या वेगाने शैक्षणिक सुविधा वाढत नाहीत. त्यामुळे शाळांची, शिक्षकांची, शैक्षणिक साधनांची संख्या मर्यादित राहते.

स्थलांतरित मजुरांची मुले : शेती, उद्योग व व्यापार यातून स्थलांतरित होणाऱ्या मजुरांची मुले शिक्षणाच्या संधीपासून दूर राहतात. त्यामुळे त्यांचे शिक्षण होत नाही व ते निरक्षर राहतात. अलिकडे काही सामाजिक संस्था अशा मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करताना आढळतात. मात्र त्याचे प्रमाण खूप अल्प आहे.

**निरक्षरतेचे परिणाम**

बेरोजगारी व गरिबी : निरक्षरतेचे परिणाम व्यक्ती आणि समाज या दोघांवरही गंभीर स्वरूपाचे असतात. निरक्षर व्यक्तींना योग्य रोजगार मिळणे कठीण जाते व रोजगार मिळाला तरी हलक्या स्वरूपाचा व कमी वेतनाचे काम मिळते आणि गरिबीचे दुष्टचक्र कायम राहते. निरक्षरतेमुळे आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, शासनाच्या योजना आणि नागरिकांचे हक्क यांविषयीची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. लोकशाही प्रक्रियेत जसे मतदान, सामाजिक सहभाग आणि निर्णयक्षमतेमध्येही त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. यामुळे राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला अडथळे निर्माण होतात.

लोकसंख्या नियंत्रणाच्या उपायांकडे दुर्लक्ष : निरक्षरतेमुळे समाजातील आपल्या कुटुंबातील महत्त्वाची भूमिका व महत्त्व लक्षात न आल्याने लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे कुटुंब नियोजनाच्या साधनांचे महत्त्वही त्यांना कळत नाही; यातून लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रणात येत नाही.

अंधश्रद्धा व गैरसमज : समाजात अंधश्रद्धा वाढीला लागण्याचे निरक्षरता हे प्रमुख कारण आहे. आजारपणामध्ये वैद्यकीय उपचार न करता बुवाबाजीच्या चक्रात निरक्षर अडकतात. यातून समाजाचा ऱ्हास होतो.

गुन्हेगारी व सामाजिक असंतोष : निरक्षरतेमुळे उत्पन्नाची कमतरता व कायदेशीर ज्ञानाचा अभाव यातून सामाजिक असंतोष व किरकोळ प्रमाणात गुन्हेगारी वाढण्याची भीती असते.

**भारतातील निरक्षरता कमी करण्यासाठी उपाय**

भारताने निरक्षरता कमी करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले आहेत. सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण, शालेय पोषण आहार योजना, प्रौढ साक्षरता अभियान, डिजिटल शिक्षणाचा प्रसार आणि विविध शैक्षणिक योजना यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. ग्रामीण भागात नवीन शाळा उभारणे, शिक्षक प्रशिक्षण सुधारणे आणि स्थानिक भाषेत शिक्षण उपलब्ध करून देणे या उपाययोजना प्रभावी ठरत आहेत. आजच्या डिजिटल युगात संगणक व तंत्रज्ञान शिक्षणालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ऑनलाईन शिक्षण, ई-लर्निंग आणि मोबाईल शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार अधिक वेगाने होत आहे. यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळू शकते.

निरक्षरतेचे निर्मूलन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक व्यक्तीने यात योगदान देणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून घेणे ही काळाची गरज आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे तसेच राष्ट्रनिर्मितीचे मुख्य साधन आहे. म्हणूनच निरक्षरता दूर करून साक्षर, सुशिक्षित आणि प्रगत भारत घडविणे हे आपले सामूहिक ध्येय असले पाहिजे.

भविष्यातील आव्हाने : निरक्षरतेव्यतिरिक्त भारतीय समाजाला विज्ञान निरक्षरता, आरोग्य निरक्षरता, अर्थिक निरक्षरता, संगणक निरक्षरता व पर्यावरण निरक्षरता यांसारख्या अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागेल.

पुणे/७९७२०७०३५८

## रविवारची पत्रे

### ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा

मराठी संत परंपरेत संत तुकाराम महाराज यांचे स्थान अत्यंत उच्च आहे. त्यांच्या अभंगांप्रमाणेच 'ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा' ही आरती केवळ भक्तिगीत नसून अत्यंत गूढ आणि गहन आध्यात्मिक तत्त्वज्ञानाने समृद्ध अशी रचना आहे. या आरतीतून साध्या, सरळ भाषेत अद्वैत वेदांत, योगशास्त्र आणि भक्तिमार्ग यांचा सुंदर संगम दिसून येतो. आरतीच्या प्रारंभी संत तुकाराम महाराज म्हणतात-

**'पांचाहि तत्त्वाच्या ज्योति प्रकाशिल्या राणा'**

येथे पंचतत्त्वे म्हणजे पृथ्वी, आप (जल), तेज, वायू आणि आकाश. या पंचमहाभूतांपासून संपूर्ण विश्वाची रचना झालेली आहे. पण सद्गुरू हे या तत्त्वांचे केवळ ज्ञाता नसून त्यांच्या मागील मूळ चैतन्यस्वरूप ब्रह्माची अनुभूती देणारे आहेत. सद्गुरू म्हणजे अज्ञानाचा अंधकार दूर करून आत्मज्ञानाचा प्रकाश देणारा दीपस्तंभ. त्यांच्या कृपेने साधकाला भौतिक जगाच्या पलीकडील सत्याचे दर्शन होते.

**'निराकार वस्तु कैसी आकारा आली'**

ही ओळ अत्यंत सूक्ष्म अद्वैत तत्त्व स्पष्ट करते. ब्रह्म हे निराकार, निर्गुण, अव्यक्त आहे. पण भक्ताच्या उद्धारासाठी तेच ब्रह्म सद्गुरूच्या रूपाने साकार होते. हीच उपनिषदांची शिकवण आहे. एकच परमात्मा सर्वत्र व्यापलेला आहे. 'माउली' या शब्दातून सद्गुरूंचे मातृवत प्रेम व्यक्त होते. ते केवळ ज्ञान देत नाहीत तर साधकाला प्रेमाने, करुणेने घडवतात. अर्थात निराकार ब्रह्म आणि साकार गुरू हे वेगळे नसून एकच तत्त्व आहे.

**'सोळा सांधे बहात्तर कोठड्या'**

या ओळींमध्ये मानवी शरीराचे योगशास्त्रीय वर्णन आहे. सोळा सांधे : शरीरातील मुख्य सांधे, बहात्तर कोठड्या - ७२ नाड्या (प्राणवाहिन्या), नवखिडक्या : शरीरातील नवद्वार. हा देह म्हणजे एक 'डोल' म्हणजेच अस्थिर, नश्वर रचना. पण या देहातच मूर्ती म्हणजे आत्मचैतन्य वास करते. यातून स्पष्ट संदेश मिळतो- देह हा अंतिम सत्य नसून आत्मा हेच खरे स्वरूप आहे. देह हे साधन आहे, साध्य नाही.

**'सप्तहि सागराचा वेढा'** : येथे 'सप्तसागर' हे केवळ बाह्य जगाचे प्रतीक नाही तर मनुष्याच्या अंतर्गत दोषांचे द्योतक आहे. हे सात शत्रू असे आहेत- काम (अति इच्छा), क्रोध, असहिष्णुता/रोष, लोभ, मोह, मद (अहंकार), मत्सर. हे सर्व दोष मनुष्याला वेढून टाकतात आणि त्याला दुःखाच्या चक्रात अडकवतात. संसार म्हणजे बाह्य जग नव्हे तर अंतर्गत अस्थिरता.

**'तुका म्हणे बाप माझा कनवाळू आला'**

सद्गुरू हे केवळ शिक्षक नाहीत, ते पित्याप्रमाणे रक्षण करणारे, मातेसारखे प्रेम देणारे, देवासारखे मार्गदर्शन करणारे त्यांची कनवाळू (करुणामय) वृत्ती साधकाला संसारातून मुक्त करते. गुरुकृपेनेच आत्मज्ञान प्राप्त होते, हे या आरतीचे मुख्य तत्त्व असून पुढील गूढ तत्त्वेही या आरतीतून स्पष्ट होतात- सद्गुरू हे पंचमहाभूतांच्या पलीकडील ब्रह्मतत्त्वाचे प्रकाशक आहेत, निराकार ब्रह्म साकार गुरुरूपाने प्रकट होते, देह हा नवद्वारयुक्त, नश्वर पण साधनेसाठी आवश्यक आहे, मनुष्याचे खरे शत्रू बाहेर नसून अंतर्मनात आहेत, संसारातून मुक्ती केवळ सद्गुरूंच्या कृपेनेच संभवते.

'ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा' ही आरती केवळ भक्तिभाव व्यक्त करणारी नाही तर ती अद्वैत वेदांत, योग आणि भक्ती यांचा संगम असलेली आध्यात्मिक साधना आहे. ती साधकाला बाह्य पूजा सोडून अंतर्मुख होण्याचा मार्ग दाखवते. सद्गुरूंच्या चरणी समर्पण केल्याशिवाय आत्मज्ञानाची प्राप्ती होत नाही, हीच या आरतीची खरी शिकवण आहे.

**लक्ष्मीकांत घरोटे**/चंद्रपूर/९८२२६३८१९२

### मनुष्याचा स्वभाव हीच खरी संपत्ती

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे स्वभाव. एखाद्या व्यक्तीची ओळख त्याच्या रूपाने, संपत्तीने किंवा पदाने होत नाही, तर त्याच्या स्वभावाने होते. स्वभाव हा माणसाच्या विचारांमध्ये, बोलण्यात आणि वागण्यात दिसून येतो. चांगला स्वभाव असेल तर माणूस सर्वांच्या मनात स्थान निर्माण करतो, तर वाईट स्वभावामुळे लोक दूर जातात. स्वभावाचे अनेक प्रकार असतात. काही लोक शांत, प्रेमळ, मदत करणारे आणि संयमी असतात. अशा व्यक्ती सर्वांना आवडतात. काही लोक रागीट, हट्टी, मत्सरी किंवा अहंकारी असतात. अशा स्वभावामुळे नाती तुटतात आणि समाजात मान कमी होतो. म्हणून प्रत्येकाने आपल्या स्वभावाचा विचार करणे आवश्यक आहे. स्वभाव हा जन्मतः काही प्रमाणात असला तरी तो संगत, संस्कार, शिक्षण आणि अनुभवांमुळे घडत जातो. घरातील वातावरण, आई-वडिलांचे संस्कार, मित्रपरिवार आणि समाज यांचा स्वभावावर मोठा प्रभाव पडतो. चांगल्या लोकांच्या सहवासात राहिल्यास आपला स्वभावही चांगला बनतो. चांगला स्वभाव जीवनात यश मिळवून देतो. गोड बोलणारा, नम्र आणि प्रामाणिक माणूस सर्वत्र सन्मान मिळवतो. कठीण प्रसंगातही संयम राखणारी व्यक्ती लोकांसाठी आदर्श ठरते. स्वभाव चांगला असेल तर नाती मजबूत राहतात आणि जीवन आनंदी होते.

माझ्या एका मित्राचा चष्म्याचा व्यवसाय आहे. एकदा मी त्या दुकानात गेलो असताना एक ग्राहक त्याच्याकडे आलेला, दोघात कसला तरी वाद झालेला लक्षात येत होते. लक्ष दिल्यावर कळलं की चष्म्याची फिटिंग बरोबर नव्हती. ग्राहकाची तक्रार होती की तो ग्लास त्याने बदलवून द्यायला हवा आणि मित्र त्यासाठी अधिक पैशाची मागणी करत होता .मित्र अत्याधिक चिडका झालेला होता. तो काही केल्या ऐकायलाच तयार नव्हता. मी मध्यस्थी केली आणि ग्लास बदलवून द्यायला सांगितला. त्या दिवसापासून आजपर्यंत त्या मित्राने माझ्याशी बोलणं सोडून दिलं. हा त्याचा स्वभावच तर आहे.

काही लोक अतिशय रागीट स्वभाचे असतात. परंतु त्यांचा राग लवकर निघून जातो आणि काही रागीट लोक वर्षानुवर्षं राग धरून बसतात. हा पण स्वभावाचाच एक प्रकार आहे. या उलट काही लोकांचा रागावर किंवा मनावर इतका जास्त संयम असतो की ते कधीच रागात येत नाहीत काहीही झालं, कितीही नुकसान झालं तरीही ते राग करत नाहीत आणि शांततेने प्रत्येक प्रसंगाला तोंड देतात, हा देखील स्वभावाचा प्रभाव.

फक्त राग आणि शांततेचाच स्वभावाचा प्रकार नाही. काही गोष्टींवर वेळेवर प्रतिक्रिया न करता वेळ निघून गेल्यावर धावपळ करणे हे पण काही लोकांच्या स्वभावात ठासून भरलेले असते. काही लोक मुळात कुठल्याच प्रसंगी काहीच प्रतिक्रिया देत नसतात आणि महिनोन्महिने त्याच गुंठाड्यात गुंतलेले असतात. काही लोक कुठल्याही प्रसंगी फक्त चावट किंवा फक्त खवचट बोलण्यात माहीर असतात. काही लोकांना नको तिथे उगाच बोलायचे, विषयाचे ज्ञान असो वा नसो आपले विचार मात्र नक्की मांडायचे हे त्याच्या स्वभावाचे वैशिष्ट्य. नको तो प्रसंग समोर आला की त्यांच्या मेंदूवरचा त्यांचा ताबा सुटतो आणि त्यांचा मूळ स्वभाव समोर येऊ बघतो. अनेक मानसोपचारांचे म्हणणे आहे की एक साधारण स्वभावी व्यक्ती पण कधी मनावरचा ताबा हरवते आणि हे कोणासोबतही कधीही घडू शकते.

स्वभाव बदलण्याकरिता मनावर ताबा मिळवायला हवा असतो जे सहज काम नाही. स्वभावामुळे मनाचा ताबा सुटतो आणि म्हणूनच याला स्वभाव असे म्हटले आहे. एकंदरीत बघता वाईट स्वभाव बदलणे अशक्य नाही. स्वतःच्या चुका ओळखून, रागावर नियंत्रण ठेवून, इतरांशी प्रेमाने वागून आणि सकारात्मक विचार करून स्वभाव सुधारता येतो. प्रयत्न आणि इच्छाशक्ती असेल तर प्रत्येक जण आपला स्वभाव उत्तम बनवू शकतो. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, रूप क्षणिक असते, पण स्वभाव कायम लक्षात राहतो. म्हणून प्रत्येकाने चांगला स्वभाव जोपासावा, कारण चांगला स्वभाव हीच माणसाची खरी ओळख आणि खरी संपत्ती आहे.

**अनंत कपाळे**/९३७३१०२८९८

### स्त्री शक्ती वंदन विधेयकाच्या निमित्ताने...

गेली अनेक वर्षे स्त्री शक्ती, स्त्री अधिकार, स्त्री सशक्तीकरण यासाठी कार्य करत आहे. म्हणून मला महाराष्ट्र राज्य बालकल्याण समितीच्या सदस्यपदी जाण्याची संधी मिळाली. पण भारताच्या लोकसभेत 'नारी शक्ती वंदन' या अत्यंत महत्त्वाच्या विधेयकाच्या संदर्भात जे घडले, त्याने मनात एक प्रकारची खंत आणि व्यथा निर्माण झाली आहे. मला या विधेयकाच्या विरोधकांच्या विचारांची आणि राष्ट्रविरोधी राजकारणाची चीड येत आहे. महिलांच्या सशक्तीकरणासाठी, त्यांच्या राजकीय सहभागासाठी आणि समान हक्कांसाठी हे विधेयक एक मोठे पाऊल ठरू शकले असते; परंतु ते मंजूर होऊ शकले नाही, ही बाब निश्चितच विचार करायला लावणारी आहे. 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमाच्या संदर्भात निवेदन देण्यासाठी आणि त्याविषयी चर्चा करण्यासाठी भाजपा महिला प्रदेश अध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांची अराजकीय व्यासपीठावर भेट घेतली. त्यावेळी त्यांनी अतिशय स्पष्ट आणि वास्तववादी शब्दांत महिलांचा संघर्ष सांगितला. महिलांसाठी राजकारण हे क्षेत्र अत्यंत आव्हानात्मक असलं, तरी या विधेयकामुळे महिलांना खूप संधी उपलब्ध होणार, याचा जास्त आनंद आहे. त्यांच्या अनुभवातून उमटलेले हे शब्द केवळ त्यांचेच नव्हे, तर देशातील प्रत्येक संघर्ष करणाऱ्या स्त्रीचे प्रतिनिधित्व करतात. त्यांनी एक आशा व्यक्त केली होती की, जर हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले, तर तो प्रत्येक महिलेसाठी अभिमानाचा आणि आनंदाचा ऐतिहासिक क्षण असेल. मात्र ते घडले नाही. त्यामुळे मनात एक प्रश्न उभा राहतो- ज्या महिलांच्या हक्कांविषयी, स्वातंत्र्याविषयी वर्षानुवर्षे बोलले गेले, ते केवळ शब्दांपुरतेच मर्यादित होते का? अनेकदा स्त्री अधिकारांबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या; प्रत्यक्ष कृतीच्या वेळी त्यांची भूमिका स्पष्ट झाली, असेच म्हणावे का? या संपूर्ण प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सशक्तीकरणासाठी घेतलेली भूमिका विशेष महत्त्वाची आहे. 'स्त्री शक्ती वंदन' हे केवळ एक विधेयक नसून देशातील प्रत्येक स्त्रीच्या आत्मसन्मानाशी जोडलेले स्वप्न आहे. त्यामुळे हे विधेयक मंजूर न होणे, ही केवळ राजकीय घटना नसून महिलांना भावनिक पातळीवरही अस्वस्थ करणारे आहे. तरीही, या प्रवासाचा शेवट इथे नाही. इतिहास साक्षी आहे की, जे योग्य आणि न्याय्य आहे, ते शेवटी मार्ग काढतेच. जेव्हा पुन्हा एकदा अधिक ताकदीने हे विधेयक मांडले जाईल, तेव्हा देशातील महिलांना त्यांचा हक्क नक्कीच मिळेल, याबाबत पूर्ण विश्वास आहे. हा संघर्ष केवळ राजकीय पक्षांचा नाही, तर संपूर्ण स्त्रीशक्तीचा आहे आणि ती शक्ती एक दिवस विजय मिळवेल, असा विश्वास आहे.

**नलिनी वायाळ गावडे**/पुणे, ८८८८९८७६७६

### निगरगट्ट राजकारणाची पराकाष्ठा

"मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवा" ही बातमी तरुण भारतच्या २५ एप्रिलच्या अंकात वाचली. सध्याचे कर्तव्यकठोर आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात सगळ्याच विरोधी पक्षांनी त्यांना लक्ष्य करण्याचे कारस्थान केले आहे. त्यांचा गुन्हा काय तर त्यांनी, संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या मर्यादा सांभाळून निवडणुका अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध, गैरप्रकारमुक्त आणि दहशतमुक्त केल्या आणि लोकशाहीच्या या सर्वांत महत्त्वाच्या उत्सवात अधिकाधिक लोकांनी मतदान करावे यासाठी सकारात्मक प्रयत्न केले. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची पहिली फेरी आणि तामिळनाडूमध्ये झालेल्या सर्व जागांवर झालेल्या विक्रमी मतदानामुळे हे निःसंदिग्धपणे सिद्ध झाले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रीय निवडणूक आयोगावर जनतेने दाखवलेल्या गाढ विश्वासाचे हे प्रतीक आहे. अद्याप मतदानाची प्रक्रिया सुरू आहे आणि निवडणूक निकाल तर खूपच लांब आहेत. पण आपल्या पराभवाची चाहूल लागलेल्या विरोधी पक्षांनी आपली चामडी वाचवण्यासाठी आतापासूनच प्रयत्न सुरू केले आहेत.

निवडणूक आचारसंहिता देशभरात लागू करणारे आणि भारतीय लोकशाही स्वच्छ करणारे तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन साहेबांची येथे आठवण येणे स्वाभाविक आहे. वास्तविक ही आचारसंहिता कित्येक दशकांपासून अस्तित्वात होती. पण काँग्रेसच्या सरकारांनी आणि नेत्यांनी ती हेतुपुरस्सर जनतेपासून दडवून ठेवली आणि निवडणुकीत विविध गैरप्रकारांना खतपाणीच घातले. त्याचा सर्वाधिक फायदा काँग्रेसलाच मिळत असल्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी, एक डोळा मिटून, हं, चालू दे असा गैरप्रकार करणाऱ्यांना आशीर्वाद दिला. मात्र डिसेंबर १९९० ते डिसेंबर १९९६ या मुदतीत मुख्य निवडणूक आयुक्त असलेल्या शेषन यांनी निवडणूक प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा केल्या. निवडणुकीत होणाऱ्या गैरप्रकारांना त्यांनी कमालीचा आळा घातला. मतदारांना लालूच दाखवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काळ्या पैशांवर नियंत्रण आणले. अशा सुधारणांमधील काही महत्त्वाच्या सुधारणा अशा.

**मतदार ओळखपत्र** : छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र अनिवार्य केले.

**आचारसंहिता** : निवडणूक आचारसंहितेची कडक अंमलबजावणी केली आणि नियम मोडणाऱ्या उमेदवारांवर कारवाई केली.

**निवडणूक खर्च** : उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर मर्यादा आणली. त्यांना खर्चाचा हिशेब देण्याचा आदेश दिला आणि अंमलातही आणला. त्यांना इलेक्शन किंग म्हणून ओळखले जात असे. त्यांच्या कडक स्वभावामुळे राजकीय नेत्यांमध्ये त्यांचा प्रचंड दरारा होता.

त्यानंतर आलेल्या जवळपास सर्वच निवडणूक आयुक्तांनी शेषन यांनी केलेल्या प्रयत्नांना पुढे नेऊन निवडणुका अधिकाधिक लोकाभिमुख केल्या. सध्याच्या आयुक्तांनी, संवैधानिक अधिकारांतर्गत, एसआयआर प्रक्रिया करून, भारताचे अधिकृत नागरिकत्व नसलेल्या घुसखोरांची नावे मतदारयादीतून वगळली आणि नेमकी हीच कृती विरोधी पक्षांची गले की हड्डी बनली आहे. एसआयआर विरोधात न्यायालयात गेलेल्या विरोधी पक्षांची, अनेकदा सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत कानउघाडणी केल्यानंतरही विरोधी पक्षाची हौस भागली नाही.

ज्ञानेशकुमार यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष, जबाबदार, निःस्पृह, निष्पक्ष आणि कार्यक्षम अधिकाऱ्यावर अत्यंत खालच्या भाषेत टीका करून विरोधी पक्षांनी आपली पातळी दाखवून दिली आहे. काहीही असले तरीही विरोधी पक्षांच्या कटकारस्थानांना, दहशतीला, हिंसाचाराच्या घटनांना जनता बळी पडणार नाही आणि आपल्या मतदानाच्या घटनात्मक अधिकारावर गदाही येऊ देणार नाही. विरोधी पक्षांचा निगरगट्टपणा या निमित्ताने पुन्हा एकदा उघड झाला हेही चांगलेच झाले.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### पायरीवरला राम...!

कुठलीही घाई नव्हती. सारं काही ठरवणारा तोच होता. माझा नि त्याचा ऋणानुबंधही फार पुरातन होता. त्याच्याच पुण्य पावन भूमीत माझा जन्म झाला. त्याचा आदर्श, त्याचे रक्त धमन्यांमधून सहज वाहत होते. सर्व कीर्तनकारांच्या गजरांमधून त्याची नि माझी भेट होत होतीच. कार्तिक महिन्यातल्या दिंडीतही तो असायचा. कुठल्याही संकीर्तनातून सहज मला भेटायचा. जीवनात राम सर्वत्र होता. त्याच्या जन्माच्या कथा लहानपणापासूनच ऐकल्या होत्या. त्याला घर नसल्याची जाणीवही समज आल्यापासून होती. संघर्ष, वनवास, त्याचा या कलियुगातही सोपा नव्हता. आईने सोडलेल्या प्रत्येक उसाशातून मला तो जाणवत होता. धीर गंभीर वडिलांचे त्याच्यासाठी असणारे दुःख हळूहळू माझेही झाले होते. अशातच दोन वेळा त्याची नि माझी भेट झाली होती. दोनही कारसेवा नशिबात होत्या. नाते घट्ट झाले होते. त्याच्या कार्याकरिता माझी निवड ही त्यानेच केली होती. निवांत स्थानापन्न झाला तो स्वगृहात.

मलाही निश्चिंत वाटले. अशातच एका निमित्ताने भेटीस त्याने मला बोलावले. कुठलीही हाल अपेष्टा न होता हा श्रीमंत योग त्यानेच घडवून आणला. हा माझा त्याच्यावर विश्वास होताच. प्रांगणातून निश्चिंतपणे चालत सगळ्यात खालच्या पायरीवरच काही मिनिटांसाठी डोके मी ठेवले. त्याच्या दर्शनाची घाई नव्हती मला. तो माझ्या जवळच होता. खूप साऱ्या डोळ्यांनी मला तो फक्त आज बघायचा होता. योजना त्याचीच होती. अनंत आठवणींनी मला घेरले.

शेकडो लढाया, हजारो बलिदाने, कोठारी बंधू, शरयूला लाल रंग देऊन गेलेले ज्ञात-अज्ञात बंधू, पालघरचे निरपराध साधू, हयात नसलेले आई वडील, या सगळ्यांच्या डोळ्यातून मी त्याला आज पाहणार होतो. म्हणूनच त्याच्या पायरीवर ठेवलेले डोके सहज मला उचलता न आले. अक्षरशः अश्रूंनी ती पायरी मी भिजवून टाकली .

त्या सिंचनातून मग मात्र खूप हलके वाटले. वास्तवतेचे भान आले. मी स्वतःला सावरले. अरुंद गल्लीमध्ये कापडी तंबूत पाहिलेला तो, बालरूपात स्वगृही परतलेला हा, सारे काही तसेच माझ्याजवळ जपून होते. कळले मला की माझ्या डोळ्यातून रामाचे दर्शन आज या सगळ्यांनीही घेतले...

मग मात्र माझ्या डोळ्यातून अश्रू नाही वाहीले...

सर्वांसोबत भारावून मीही दर्शन घेतले... पुढे सरकलो...

जगरहाटी सुरू झाली होती...

पण, त्या पायरीवरचे माझे डोके मी अजूनही नव्हते उचलले...

कारण अश्रू भरल्या डोळ्यांमध्ये राम मला तेथेच होते भेटले...!

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## संत बंकटस्वामी महाराजांनी अनेक वाकड्या, दीन- दुबळ्या व्यक्तींना आधार देऊन पूजनीय केले : रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर

### पहिल्या दिवसाची कथा संपन्न हजारो भाविकांची उपस्थिती



तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | वाकड्या जीवनाला चांगला आधार मिळाला की ते पूजनीय होत. संत बंकटस्वामी महाराजांनी अनेक वाकड्या,दीन- दुबळ्या व्यक्तींना आधार देऊन वारकरी संप्रदायात अधिकारी बनवलं. असे प्रतिपादन श्री ह भ प संजय महाराज पाचपोर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवात भव्य रामकथेत पहिल्या दिवसाच्या कथेत ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महारापीज मेंगडे, श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव,रंजीत महाराज शिंदे, दिनेशांनद शास्त्री यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात भव्य श्रीराम कथेत पहिल्या दिवसाची कथा पुष्पगुंपताना ते बोलत होते पुढे बोलताना.

श्रवण महत्त्वाचा आहे मात्र ते प्रेमाने केले पाहिजे. श्रीराम कथा अत्यंत मनोभावे ऐका उधार होईल.जिवंत राहायचं असले तर पुन्हा पुन्हा जेवण केलं पाहिजे. तसं चांगल जगायचं असेल तर पुन्हा पुन्हा राम कथा ऐकली पाहिजे..चांगल जगणं महत्वाचं.. चांगल्या जगणाऱ्याचा इतिहास घडतो. समाजासाठी काम करून चांगल जगत असेल तर लोक विसरणार नाही. तसं चांगल श्रवण महत्वाचं आहे.

# पारदर्शक कारभाराचे आणखी एक पाऊल: परळी नगर परिषदेचे ठराव आता एका क्लिकवर

## सभेचा इतिवृतांत ऑनलाईन टाकणारी परळी वैजनाथ नगर परिषद ठरली पहिली

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ** | प्रतिनिधी | परळी वैजनाथ नगर परिषदेच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी आता एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नगर परिषदेच्या विविध सभांमध्ये मंजूर होणारे ठराव आता सर्व सन्माननीय नगरसेवक आणि नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत महा यु एल बी ( MahaULB) या संकेत स्थळावर ऑनलाईन पाहता येणार आहेत. यापूर्वी नगर परिषदेचे ठराव पाहण्यासाठी किंवा त्याची माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत होत्या. मात्र, आता डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत ही सर्व माहिती सार्वजनिक करण्यात आली आहे. अधिकृत संकेतस्थळावर इतिवृत्त प्रकाशित करणारी परळी वैजनाथ नगरपरिषद ही पहिली नगरपरिषद ठरली आहे.



राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्ष खैसर राजा खा पठाण, कार्यालयीन अधीक्षक संतोष रोडे, संगणक अभियंता लक्ष्मीकांत देशमुख, सभा व्यवस्थापन प्रमुख सत्यजित पिटके, सहाय्यक विक्रम स्वामी आदींनी या अधिकृत पोर्टलवर वेळोवेळी ऑनलाईन इतिवृत्त प्रसिद्ध व्हावे यासाठी आवश्यक ती संपूर्ण तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यामुळे आता नगर परिषद सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीचे इतिवृत्त ऑनलाइन प्रसिद्ध होणार आहे. या माध्यमातून कामकाजात पारदर्शकता आणली गेली आहे. आता घरबसल्या नगर परिषदेचे निर्णय नागरिकांना पाहता येणार आहेत. सर्व ठराव आता कायमस्वरूपी ऑनलाईन स्वरूपात जतन केले जाणार आहेत.नगर परिषदेच्या या निर्णयामुळे शहरात होणारी विकासकामे, मंजूर निधी आणि प्रशासकीय निर्णय यांची माहिती पारदर्शकपणे जनतेसमोर येणार आहे. परळी वैजनाथ नगर परिषदेच्या कामकाजातील ऑनलाईन इतिवृत्तांमध्ये प्रामुख्याने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेली सर्वसाधारण सभा आणि २० एप्रिल २०२६ रोजी पार पडलेली स्थायी समितीची सभा यांचे सविस्तर इतिवृत्त आणि ठराव पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत. यापुढील सर्व ठराव व इतिवृत्ते लोकप्रतिनिधी व नागरिकांना एका क्लिकवर ऑनलाईन पाहता येणार आहेत.

लोकप्रतिनिधी व नागरिकांनी https://mahaulb.in या संकेतस्थळावर जाऊन 'बीड' जिल्हा निवडावा, त्यानंतर 'परळी वैजनाथ नगर परिषद' निवडून 'सभा कामकाज' या विभागावर क्लिक करावे. तेथे नियम व अटी मान्य केल्यानंतर (I Agree) संबंधित तारखेचे ठराव सर्वसामान्यांना पाहण्यासाठी व अभ्यासासाठी उपलब्ध होतील. नगरपरिषदेने घेतलेले निर्णय, विविध विषयांवरील चर्चा आणि मंजूर झालेले ठराव आता एका क्लिकवर उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना प्रशासकीय घडामोडींची अचूक माहिती मिळणार आहे.या सुविधेचा सर्व नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी लाभ घ्यावा, असे आवाहन नगर परिषद परळी वैजनाथ च्या वतीने करण्यात आले आहे.

कसे पाहाल इतिवृत्त?

१. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित https://mahaulb.in या संकेतस्थळावर जा.

२. आपला जिल्हा आणि नगरपरिषद (ULB) निवडा.

३. उजवीकडील मेनूमध्ये (तीन आडव्या रेषा) 'सभा कामकाज/ठराव' विभागात जा.

४. अटी मान्य (I Agree) केल्यानंतर ६ फेब्रुवारी आणि २० एप्रिल २०२६ च्या सभांचे इतिवृत्त डाऊनलोड करता येईल.

## आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी जेष्ठ नागरिकांनी सक्रीय राहावे- प्राचार्य दामोधर थोरात



तभा. वृत्तसेवा

**केज, प्रतिनिधी** | ज्येष्ठ नागरिक संघ केजचा ( जि.बीड ) वर्धापन दिन १८ एप्रिल २०२६ रोजी केज येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी फेस कॉम दक्षिण विभागाचे अध्यक्ष प्राचार्य दामोधर थोरात यांनी उपस्थित ज्येष्ठांना मार्गदर्शन करताना सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष माननीय राजेसाहेब देशमुख होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केज च्या ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री गदळे जी.बी. यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ नागरिक संघाचे सहसचिव श्री साखरे डी. एस. यांनी केले. ज्येष्ठ नागरिक संघाचे श्री जाधव एल.ए. यांनी उपस्थित आमचे आभार मानले. या कार्यक्रमाला लातूर येथील माजी सचिव प्राध्यापक प्रभाकर कापसे ,बीड जिल्ह्याचे समन्वयक श्री मामडगे जे.डी.. अंबाजोगाई जेष्ठ नागरी संघाचे अध्यक्ष अनंतराव जगतकर, तसेच माजलगाव ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री कांतराव गाजरे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केज तालुका जेष्ठ नागरिक संघाचे कोषाध्यक्ष श्री रामेश्वर जाजू यांनी सहकार्य केले. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मंगळवार पेठ केज येथे पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजींच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली आणि सुरुची भोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# मातंग समाजातील शैक्षणिक अंधार दूर करण्याची ध्येयवेड्या तरुणाची धडपड

## अमोल शेरकरच्या शिक्षण संवाद यात्रेला तालुक्यातून मोठा प्रतिसाद.

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | मातंग समाजातील शैक्षणिक मागासलेपणाला छेद देत,नव्या पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवण्यासाठी एक तरुण झटताना दिसत आहे.हा तरुण म्हणजे अमोल शेरकर.शिव,फुले शाहू,आंबेडकर,अण्णाभाऊ,लहुजीयांच्या प्रेरणेतून ध्येय,जिद्द आणि सामाजिक बांधिलकी जोपासत सध्या त्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने १४ एप्रिल पासून संपूर्ण माजलगाव तालुक्यात शिक्षण संवाद यात्रा राबवत समाजजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य सुरु केले असूनही या यात्रेला तालुक्यातील समाज बांधवांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे.



जयभीम,जय लहूजीचा नारा देत अमोल शेरकर हा सर्व सामान्य कुटुंबातील ध्येयवादी तरुण शिक्षण संवाद यात्रेद्वारे मांगवाड्यांमध्ये पोहोचत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आहे. त्यांच्या मते,समाजाचा खरा विकास हा शिक्षणातूनच शक्य आहे.पारंपरिक कामांच्या चौकटीत अडकून राहिलेल्या समाजाला नव्या विचारांची दिशा देणे,हीच त्यांची धडपड आहे. गावोगावी जाऊन तो पालकांशी संवाद साधत आहे. आज आपण कष्ट करतोय,पण आपल्या मुलांनी तेच आयुष्य जगू नये,हा संदेश तो प्रभावीपणे समाज बांधवांमध्ये मांडत आहे.वीटभट्टी,ऊसतोडणी आणि शेतमजुरीच्या चक्रात अडकलेल्या कुटुंबांना शिक्षणाचे सामर्थ्य समजावून सांगत त्यांनी एक पिढी कष्ट करेल,पण पुढची पिढी शिकेल,हा विचार तो रुजवत आहे.अमोल शेरकर केवळ भाषणांपुरते मर्यादित नाहीत.ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन,स्पर्धा परीक्षा माहिती,तसेच शिक्षणासाठी आवश्यक दिशा देण्याचे कामही करत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मक बदल दिसू लागला आहे.तालुक्यातील गाव वस्त्यावरील त्यांच्या आयोजित कार्यक्रमांना विद्यार्थ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे.समाजात काही यशस्वी अधिकारी,प्राध्यापक आहेत,मात्र त्यांची संख्या अपुरी असल्याची जाणीव अमोल शेरकर याने समाजाला करून देते शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करीत आहेत. त्यामुळेच ते प्रत्येक मांगवाड्यातून किमान एक तरी अधिकारी, इंजिनिअर,वकील घडावा,या ध्येयाने काम करत आहेत.अमोल शेरकर यांची ही धडपड केवळ एका व्यक्तीची नाही,तर संपूर्ण समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा लढा आहे.त्यांच्या या प्रयत्नामुळे मातंग समाजातील शैक्षणिक अंधार दूर होऊन,नव्या उजेडाची पहाट लवकरच दिसेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान मातंग समाजातील अमोल शेरकर यांनी स्वखर्चातून समाजाच्या भल्यासाठी सुरू केलेली संवाद यात्रा शिक्षण क्रांतीस गती देणार असल्याचे चिन्ह असून त्यांच्या या संवाद यात्रेला मोठा प्रतिसाद मिळत आहे.अमोल शेरकर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नगरपरिषदेने घेतलेले ठराव आता सर्वसामान्यांना ऑनलाईन पाहता येणार; नगराध्यक्षा व प्रशासनाचे आभार - अश्विन मोगरकर

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ** | परळी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतील कामकाज इतिवृत्त व ठराव आता परळीकर जनतेला ऑनलाईन वाचायला मिळणार आहेत. भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी वारंवार प्रशासनासोबत याबाबतीत पाठपुरावा केला होता. ऑनलाईन इतिवृत्त व ठराव वाचण्यास ठेवल्याबद्दल परळी नगरपरिषद अध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी व प्रशासनाचे अश्विन मोगरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीचा निकला लागून चार महिने झाले आहेत. नगरपरिषदेचे कामकाज सुरळीतपणे चालू झाले आहे. या चार महिन्यांच्या काळात नप उपाध्यक्ष व सभापती निवडीच्या सभेसह दोन सर्वसाधारण सभा संपन्न झालेल्या आहेत. परळी शहरातील विविध विकासकामे व योजनेचे ठराव या सर्वसाधारण सभेत घेण्यात आले होते. मात्र परळीकरांच्या



हिताचे घेतलेले निर्णय जनतेपर्यंत पोचावेत यासाठी भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी हे इतिवृत्त मिळावे यासाठी पत्र मागणी करत पाठपुरावा केला.

या मागणीला प्रतिसाद देत प्रशासनाने आता सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सर्वसामान्य परळीकर नागरिकांना उपलब्ध व्हावे यासाठी आता नगर परिषद परळी वैजनाथ येथील ठराव (Resolution) https://mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore या वेबसाईटवर क्लिक केल्यावर ऑनलाईन पाहता येणार आहेत. संकेतस्थळावर गेल्यानंतर सुरुवातीला आपला जिल्हा निवड करा त्यानंतर आपली यु एल बी निवडा (आपली नगरपरिषद ) त्यानंतर संकेतस्थळवर जाऊन उजवी कडील तीन आडव्या रेषा वर जा त्यात वेग वेगळे विभाग दिसतील त्यात सभा कामकाज/ ठराव निवडून त्याला I Agree करून ok केल्यावर सर्वसाधारण सभेचे समितीचे इतिवृत्त दिसेल.

परळी वैजनाथ नगरपरिषदेने ऑनलाईन इतिवृत्त व ठराव वाचण्यास ठेवल्याबद्दल परळी नगरपरिषद अध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी व प्रशासनाचे अश्विन मोगरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## भव्यशोभा यात्रेने संत बंकटस्वामी महाराज यांच्या 82 व्या पुण्यतिथी सोहळ्यास थाटात सुरुवात

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी )** | "निनगुर गावात काय वाजत गाजत. संत बंकटस्वामीचा सोहळा गाजत..! या जयघोषात श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी सोहळ्याची मोठ्या थाटात सुरुवात झाली.संत महंतांच्या हस्ते टाळ,विना,मृदंग,पालखी आणि ग्रंथ पुजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज ,श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार,श्री ह भ प प्रशांत महाराज क्षीरसागर,श्री ह भ सत्यवान महाराज लाटे, श्री ह भ प विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी, श्री ह भ प नाना महाराज कदम, सुरेश म जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव, रंजीत महाराज शिंदे,भास्कर महाराज शिंदे, दिनेशांनद महाराज काळे यांच्या सह हजारो भावीक भक्त मंडळी उपस्थीत होतें..

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी सोहळ्यास मोठ्या थाटात सुरुवात झाली.. सकाळी ९ वाजता भव्य शोभा यात्रेला विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिक्षक कॉलनी पासून सुरुवात झाली. टाळ मृदंगाच्या जयघोषात शोभायात्रा कीर्तन मंडप या ठिकाणी पोहचली. यावेळी पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान करून कलशधारी ११०० सुवासिनी महिला , कुमारीका मुली सहभागी झाल्या होत्या.. बंकटस्वामी वारकरी शिक्षण संस्थेतील बालवारकरी याच्या पाऊलीच्या खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले..

## ग्राहक पंचायत महाराष्ट्र मराठवाडा विभाग व जिल्हा कार्यकारणीची बैठक संपन्न

तभा. वृत्तसेवा

**गेवराई ( प्रतिनिधी)** | बीड येथे विभाग सहसंघटक सौ.शैलजा ताई सेलमोहकर यांच्या निवासस्थानी मराठवाडा विभागाची बैठक उत्साहात संपन्न झाली. त्यामध्ये विभागातील विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्य कार्यकारणीचे अध्यक्ष डॉ. विजयजी लाड, सह संघटक सौ. मेधाताई कुलकर्णी, राज्य कार्यकारणी सदस्य श्री हेमंत जी मराठे, विभागाध्यक्ष सतीश जी माने, संघटक प्रा. हेमंत वडणे, सचिव सचिन कवडे, शरद सेलमोहकर आदी उपस्थित होते. त्यानंतर बीड जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांच्या समवेत बैठक उत्साहात घेण्यात आली. त्यामध्ये जिल्ह्यातील प्रश्नाबद्दल चर्चा करण्यात आली. तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेत तरुणाने सहभाग होणे अत्यंत आवश्यक आहे यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे याबाबत चर्चा करण्यात आली. बीड जिल्ह्यात ग्राहक पंचायत चे कार्य मोठ्या प्रमाणात वाढ करणे राज्य कार्यकारणी करून सूचना करण्यात आल्या त्याबाबत सर्वांनी प्रयत्न करण्याची ठरले. या बैठकीत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा अध्यक्ष प्रा. रावसाहेब गर्जे, उपाध्यक्ष अनिल बोर्डे, सहसंघटक गणेश टकले, ॲड नरेंद्र कुलकर्णी, ॲड अरविंद काळे, विष्णू देशमुख आदी उपस्थित होते.

### विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाला ; पुष्प- ८ वे

## सिनेमाकडे प्रबोधनाचे माध्यम म्हणून पाहिले पाहिजे : बापू सर्वगोड

तभा. वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी** | भारतीय सिनेमा हा दादासाहेब फाळके यांच्या पौराणिक कथांपासून ते आजच्या डिजिटल काळातील वास्तववादी आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत विश्वापर्यंत, प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडीनुसार स्वतःला सतत बदलत आला आहे. कोविड नंतरच्या काळामध्ये नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम आणि डिज्नी हॉटस्टार सारख्या ओटीटी माध्यमांनी चित्रपटगृहांचा पर्याय उपलब्ध करून दिला. यामुळे आशयघन आणि धाडसी विषयांना वाव मिळाला. प्रादेशिक चित्रपट आता केवळ स्थानिक राहिले नसून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहे. पॅन-इंडिया सारख्या चित्रपटांनी भाषा आणि भौगोलिक मर्यादा ओलांडून राष्ट्रवाद, इतिहास आणि भव्यता या त्रिवेणी संगमासह प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. आजचा प्रेक्षक वास्तववादी, थरारक आणि सामाजिक संदेश देणाऱ्या कंटेंटला अधिक पसंती देत आहे.



पण आपण सिनेमाचा दुसरा अंग पाहिलं तर सध्या स्वस्त झालेल इंटरनेट प्रचंड घातक बनत आहे. करमणूक गरजेचे आहे परंतु ते प्रमाणात असावे. सिनेमाने आपली धारणा तर मोबाईल ने मोबाईल ने जीवनपद्धती बदलली आहे. सध्या बुद्धीभेद करणारे सिनेमा येत आहेत. तेंव्हा सिनेमाकडे प्रबोधनाचे माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. असे प्रतिपादन मुंबई येथील लेखक, दिग्दर्शक, व चित्रपट प्रशिक्षक बापू सर्वगोड यांनी केले.

## सरस्वती कन्या प्रशालेची विद्यार्थ्यांनी कु.गार्गी गवळी हिची एन.एम.एम.एस. परीक्षेच्या गुणवत्ता यादीत निवड



तभा. वृत्तसेवा

**केज, प्रतिनिधी** | केज येथील माऊली विद्यापीठ अंतर्गत सरस्वती कन्या प्रशालीची विद्यार्थिनी कु. गार्गी तात्या गवळी हिची एन.एम. एम.एस. परीक्षेच्या गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. या निवडीबद्दल कु.गार्गी गवळी सह सरस्वती कन्या प्रशालेच्या सर्व मार्गदर्शक शिक्षक वृंद यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

२०२५-२६ ची एन.एम.एम.एस. परीक्षा ही दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आली होती या परीक्षेचा निकाल हा दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी लागला असून दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी निवड यादी प्रसिद्ध झालेली आहे. या निवड यादीमध्ये सरस्वती कन्या प्रशालेची विद्यार्थिनी कु. गार्गी तात्या गवळी या विद्यार्थिनीची निवड झालेली असुन सरस्वती कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व मार्गदर्शक शिक्षक वृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन कु. गार्गी गवळी या विद्यार्थिनीला लाभल्यामुळे कु.गार्गीला या यशापर्यंत पोहचता आले.असे मत तिचे पालक पत्रकार आयु. त्यातल्या गवळी व्यक्त केले

या यशाबद्दल गार्गी गवळी व तिचे आई-वडील आणि सरस्वती कन्या प्रशालेचे शिक्षक वृंद यांचे आभार मानून त्यांचे अभिनंदन केले आहे.तर कु.गार्गी गवळी हिचे सर्व स्तरातून कौतुक होत असून तिच्या या यशाबद्दल कु.गार्गी गवळीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर मधील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा "निरोप समारंभ" कार्यक्रम संपन्न

तभा. वृत्तसेवा

**बीड** | दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्यामंदिर गोकुळ शिशू वाटिका बीड येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. सर्वप्रथम पंडित दीनदयाल उपाध्याय व भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्यासपीठावर डॉ. सौ .सीमाताई जोशी, जे. बी. कुलकर्णी सर, एस. एन. कुलकर्णी सर, देशमुख सर, श्रीमती. सुनंदाताई कुलकर्णी, दीपक मुळे सर आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी स्नेहलताई गोसावी यांनी "आज मोकळ्या आकाशी चालली घरट्यातली पाखर" हे गीत गायले. यानंतर मोराळे ताई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया खूप भाऊक होऊन मांडल्या. त्यांच्या डोळ्यांमध्ये एक वेगळा उत्साह आनंद तर होताच पण शाळा सोडण्याचे दुःख देखील होते. आपल्या मनातील भावना विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने व्यक्त केल्या. शिक्षकांबद्दल चा आदर त्यांनी लावलेली शिस्त, प्रेम ,संस्कार त्यांच्या बोलण्यातून दिसत होते.

लहानपणापासून त्याच शाळेत वाढल्यामुळे त्यांना शाळेचा खूप लळा होता. शाळा सुरू झाली तेव्हापासूनही ह्या मुलांची बॅच होती. त्यामुळे त्यांना निरोप देणे थोडे अवघड वाटत होते. यानंतर विद्यार्थ्यांना भेट वितरण करण्यात आले त्यामध्ये भारतरत्न नानाजी जी. देशमुख यांचा फोटो व एक पुस्तक देण्यात आले कारण त्यांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे. सुरवसे ताई, क्रांतीताई, पालकर सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालकर सरांनी विद्यार्थ्यां साठी प्रोत्साहन पर दोन कविता ऐकवल्या.

## बॅनरवर माझा फोटो नाही टाकला तरी चालेल पण योजना नागरिकांपर्यंत पोहोचवा

**बीड** | बीडमध्ये ग्रामीण रुग्णालयात महाडायलिस आणि सोनोग्राफी मशिनचं उद्घाटन करण्यात आलं..भाजप आमदार सुरेश धसांनी याचं उद्घाटन केलं..या नवीन सुविधांमुळे हजारो गरजू रुग्णांना दिलासा मिळणारेय...यावेळी धस यांनी कार्यकर्त्यांना आवाहनही केलं की, आयुष्मान भारत असो वा महात्मा फुले जनआरोग्य योजना यांसारख्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती आणि जाहिरातबाजी करा... "माझा फोटो टाका किंवा नका टाकू, पण रुग्णालयातील योजना प्रत्येक गरीब नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत," असेही धस म्हणाले

## संक्षिप्त...

### अभिषेक कोंबडे NMMS शिष्यवृत्तीसाठी पात्र



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील बोथी येथील केशवराव पाटील विद्यालयाचा विद्यार्थी अभिषेक श्रीराम कोंबडे छचचड परीक्षा उत्तीर्ण झाला असून तो शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे. त्यामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.
अभिषेक कोंबडे हा विद्यार्थी इयत्ता आठवी वर्गात शिक्षण घेत असून त्याने डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी यादीत त्याने स्थान मिळविले आहे. ही परीक्षा भारत सरकारच्यावतीने घेण्यात येते. आर्थिक दृष्ट्या दुर्बल इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती योजना असून सदरील परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावी पर्यंत दरवर्षी १२ हजार रुपयाची शिष्यवृत्ती मिळते.
अभिषेक कोंबडे हा हुशार व शांत स्वभावाचा विद्यार्थी असून त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब जाधव , शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील , संस्थाध्यक्षा दीपालीताई जाधव , संस्थेचे संचालक तथा सिद्धी शुगरचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव , बळीराम भिंगोले ,अहमदपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील ,अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील,उत्तमराव देशमुख , प्रशासकीय अधिकारी दीपक भराटे , संस्था कार्यालय प्रमुख माधव सरवदे,शाळेचे मुख्याध्यापक युवराज आलट व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.
भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् (GYAN BHARATAM) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.
केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (NATIONAL DIGITAL REPOSITORY) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने सदरील हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन ती स्विकारेल.
या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

## हाळी हंडरगुळी परिसरात जनावर चोरीचे प्रमाण वाढले

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील हाळी हंडरगुळी परिसरातील वाढवणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत काही दिवसांपासून जनावरे चोरणारी टोळी सक्रिय झाल्याने पशुपालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन दिवसांपूर्वी हाळी शिवारातील शेळ्या चोरीनंतर बुधवारी रात्री उमरगा मन्ना शिवारातून म्हैस चोरीला गेली आहे.तालुक्यातील केसगीरवाडी येथील शेतकरी गुणवंत केसगिरे यांची उमरगा मन्ना शिवारात शेती आहे. त्यांनी शेतातील आखाड्यावर म्हैस बांधली होती.अज्ञात चोरट्यांनी बुधवारी रात्री ही म्हैस (किंमत ४० हजार रुपये) चोरून नेली. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. गुणवंत केसगिरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलिस करीत आहेत.

# तलाठी कार्यालय बंद असल्याने शेतकऱ्यांना त्रास

**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे तलाठी कार्यालय वारंवार बंद राहत असल्याने ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. महसूल विभागाने ग्रामीण भागातील नागरिकांची कामे जलद व्हावीत, वेळ आणि पैसा वाचावा या उद्देशाने तलाठी सजा कार्यालये सुरू केली; मात्र प्रत्यक्षात बाभळगावातील कार्यालय अनेकदा कुलूपबंदच असल्याचे चित्र आहे. सातबारा फेरफार, चतु:सीमा नकाशे, दाखल्यांतील दुरुस्ती, पंचनामे, तसेच जमीन, घर किंवा फ्लॅट खरेदीनंतर नाव नोंदणी, कर्जासाठी बोजा उतरवणे यांसारखी महत्त्वाची कामे करण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागते.
परंतु प्रत्येक वेळी कुलूपच दिसत असल्याने ग्रामस्थांची कामे प्रलंबित राहत असून, वेळ व पैशाचा अपव्यय होत आहे. महाराणा प्रताप नगर व बाभळगाव या दे सज्जांचा कारभार तलाठी हाकता परंतु, दोन्ही सज्जांमध्ये शेतकरी व नागरिकां भेटत नाहीत. शिवाय ते वारंवार फोन बंद ठेव असल्याने नागरिकांना संपर्क साधताही येत नाह अशी तक्रार समोर आली आहे. एवढेच नव्हे, अनेक नागरिकांचे फेरफार, बोजा चढवणे व १८ च्या दुरुस्तीची कामे धूळखात पडली असून, या नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आ तहसीलदारांनी लक्ष घालून तलाठी कार्यालयास ठेवून नागरिकांना सेवा देण्याची व्यवस्था कराव अशी मागणी बाभळगाव ग्रामस्थांतून होत आहे.

## चोरीमुळे शेळ्या-बकऱ्यांच्या पशुपालकांत दहशत !




**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** उदगीर तालुक्यातील हाळी-हंडरगुळी व जळकोट तालुक्यातील घोणसी, तिरुका व बेळसांगवी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून पशुधन चोरीच्या घटनांनी गंभीर स्वरूप धारण केले असून विशेषतः शेळी-बकऱ्यांच्या वाढत्या चोरीमुळे ग्रामीण भागातील पशुपालकांत दहशत निर्माण झाली आहे.
शेतीसोबत शेळीपालन हा येथे प्रमुख जोडधंदा असल्याने अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. मुलांचे शिक्षण, लग्नखर्च आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी शेतकरी वर्षानुवर्षे कष्ट करून शेळ्या-बकरे वाढवतात; मात्र सततच्या चोरीमुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या भागात रस्त्यालगत असलेल्या शेतांमधील पत्र्यांच्या शेडवर चोरट्यांचे विशेष लक्ष असून ते रात्रीच्या वेळी वाहन रस्त्याच्या कडेला उभी करून काही मिनिटांतच शेळ्या-बकरे वाहनात भरून पसार होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्री जागरण करून जनावरांची राखण करावी लागत आहे.
बेळसांगवी येथे दि. २४ मार्च रोजी शेतकरी किशोर सकमाजी तेलंगे यांच्या शेडमधून तब्बल ३० शेळ्यांची चोरी झाली असून यात अंदाजे १ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यानंतर दि. २१ एप्रिल रोजी हाळी शिवारातील मानपाडा यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमधून १० शेळ्या चोरीला गेल्या असून त्यांची किंमत सुमारे ६१ हजार रुपये आहे. तसेच घोणसी येथे मोहम्मद उस्मानसाब शेख यांच्या २ शेळ्या व ३ पिल्ले, तिरुका परिसरात राम सोनबा कराड यांच्या ३ शेळ्या आणि बेळसांगवी येथे रुखमाजी तेलंग यांच्या ३० शेळ्यांची चोरी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. वाढवणा बु पोलीस ठाण्यात या प्रकरणी काही गुन्हे दाखल झाले असले तरी अद्याप चोरट्यांचा ठोस माग काढण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.
सततच्या या घटनांमुळे हाळी-हंडरगुळी परिसरातील शेतकरी आर्थिक संकटात आहेत. पोलीस प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

## मुरुड येथे निवडणूक प्रचाराचा जोर




**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** मागील वर्षी मुरुड बु. ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत गाडे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले असल्याकारणाने ग्रामपंचायत सदस्य ची जागा रिक्त झाली होती. या रिक्त झालेल्या जागेची पोट निवडणूक या ठिकाणी लागली असून याकरिता दोन उमेदवार रिंगणात उतरलेले आहेत. यामध्ये माजी ग्रामपंचायत सदस्य कै. सदस्य सूर्यकांत गाडे यांच्या पत्नी तिलोतमा सूर्यकांत गाडे या मुरुड परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या आहेत,
तर यांना प्रतिस्पर्धी म्हणून समाधान शितोळे हे उभे आहेत. गेली वर्षभर झालं हे ग्रामपंचायत सदस्याचे पद रिक्त होते. मतदान दि. २८ एप्रिल रोजी मुरुड या ठिकाणी होणार आहे. वार्ड क्रमांक चार मध्ये हे निवडणूक लागलेली आहे. सध्या वार्ड क्रमांक चार मध्ये
प्रचाराचा जोर वाढला असून दोन्हीही उमेदवार नागरिकांच्या गाठीभेटी घेत असून विकासासाठी आम्ही काय प्रयत्न करू हे लोकांना सांगून मत मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. दोन्ही ठिकाणी फक्त स्वतः उमेदवार हे प्रचार करताना असताना दिसून येत आहेत. ग्रामपंचायतचा कार्यकाळ हा एक वर्षापुरता राहिलेला आहे. ही निवडणूक मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळामध्ये मुरुड या ठिकाणी होणार आहे.

# कव्हा येथे कलश स्थापना उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील कव्हा येथे शुक्रवारी विठ्ठल-रुक्मिणी, तुळजाभवानी व महादेव मंदीर येथे मनिषा आवसकर, रंजना रुकमे, सोनी गोडभरले, कमल बिर्ले, रानी निलापल्ले व म.नि.प्र.मुरगेंद्र महास्वामीजी यांच्या हस्ते कलश पूजा करून स्थापना करण्यात आली.
हभप केशव महाराज उखळीकर यांच्या किर्तनाने व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास पंचक्रोशितिल भाविक भक्तासह लेकमाता मोठ्या संखेने उपस्थित होत्या. यावेळी प्रा गोविंद घार, प्रा. अशोक पाटील, प्रा. बस्वराज सुलगुडले, बब्रुवान जाधव, नवनाथ बरुरे,शेषेराव रुकमे, शेषेराव जाधव,दत्तुपंत कदम, गोपाळ वांगे,कांताप्पा पाटणकर, शिवाप्पा पारणकर, अरुण घार, संगाप्पा रुकारे, गोविंद रुकमे, दत्ता खंडागळे, संतोष सुलगुडले, बालाजी गुडे, विजय कदम, महादेव साखरे, रमाकांत कदम, वर्षा नकाते, मिना पाटणकर, शिल्पा पाटणकर, शैलेजा पाटणकर, अलका पाटणकर, अलका चामे, वैशाली वलाकटे, शोभा बरुरे, मोहीनी अकनगिरे, शुभांगी मेगशेट्टे उपस्थित होते.

# निलंगा तालुक्यात जनगणनेचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण संपन्न



**तभा वृत्तसेवा**
निलंगा **दि. २६ एप्रिल :** भारताची जनगणना २०२७ च्या अनुषंगाने निलंगा ग्रामीण यामध्ये नियुक्त प्रगनक व सुपरवायझर यांचे पहिल्या टप्प्यातील तीन दिवसाचे प्रशिक्षण महाराष्ट्र महाविद्यालय येथे संपन्न झाले . निलंगा ग्रामीण तालुक्यासाठी एकूण ५७८ एवढे प्रगनक व ९५ एवढे सुपरवायझर यांच्या नियुक्ती करण्यात आल्या असून त्यांचे तीन टप्प्यांमध्ये प्रशिक्षण आयोजित केले असून पहिल्या टप्प्यामध्ये ३०० प्रगणकांना प्रशिक्षण देण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक चार्ज अधिकारी प्रवीण आळंदकर व चार्ज अधिकारी तथा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली. सदर जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही जनगणना संपूर्णपणे ऑनलाइन पद्धतीची असून जनगणना संचलयानामार्फत तयार करण्यात आलेल्या विशिष्ट पवर मोबाईलवरच करण्यात येणार असल्याची माहिती ही सहाय्यक चार्ज अधिकारी प्रवीण आनंदकर यांनी दिली.
सदर जनगणनेची वैशिष्ट्य म्हणजे दिनांक १ मे ते १५ मे या कालावधीत स्व गणना होणार असून सदर पचा वापर करून नागरिक स्वतः देखील जनगणना करू शकणार असल्याची माहिती ही देण्यात आली. प्रत्यक्ष घरगणना ही दिनांक १५ मे ते १४ जून या कालावधीत संपन्न होणार असून त्या पुढील कालावधीमध्ये प्रत्यक्ष जनगणना होणार आहे . पुढील टप्प्याचे प्रशिक्षण हे दिनांक २७, २८ आणि २९ एप्रिल रोजी पार पडणार असल्याची ही माहिती देण्यात आली. सदर प्रशिक्षणास जाणीवपूर्वक गैरहजर असलेल्या प्रगनकाना नोटीस देण्यात येऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती ही चार्ज अधिकारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली

## लातूरकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही : नगरसेवक राजे



**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २६ एप्रिल :** लातूर शहरातील पिवळ्या पाण्याच्या गंभीर प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपण लातूर शहर महानगरपालिकेच्या जल शुद्धीकरण केंद्र येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.
या पाहणी दरम्यान अत्यंत धक्कादायक बाबी समोर आल्या असून पाणीपुरवठा व्यवस्थेतील मोठ्या त्रुटी उघड झाल्या आहेत.त्यामुळे लातूरकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन करणार नाही असा इशारा भाजपचे तरुण नगरसेवक ऋषिकेश राजे यांनी दिला आहे.
गेल्या अनेक दिवसापासून लातूरकरांना पिण्यासाठी पिवळसर पाण्याचा पुरवठा होतो आहे. त्यामुळे नगरसेवक राजे यांनी नुकतीच जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन पाहणी केली..यावेळी त्यांनी केलेल्या पाहणीमध्ये काही त्रुटी आढळल्या. पाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी आवश्यक कि व ढऊङ मोजण्यासाठी कोणतीही सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध नाही. पाण्याच्या तपासणीचे अधिकृत अहवाल उपलब्ध नाहीत, यामुळे गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले.
जल शुद्धीकरण केंद्रावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक नाही, ही अत्यंत गंभीर व निष्काळजी बाब आहे. संपूर्ण परिसरात सिसिटीव्ही कैमेरे बसवलेले नाहीत, त्यामुळे देखरेख व पारदर्शकता पूर्णपणे दिसून येत नाही पाणी शुद्ध करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांचे प्रमाण निश्रि्चत करणारा कोणताही नोंदवही उपलब्ध नाही, जे अत्यंत धोकादायक असून वरील सर्व बाबी पाहता, लातूरकरांच्या आरोग्याशी मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला आहे.ही संपूर्ण यंत्रणा अत्यंत निष्काळजीपणे चालवली जात असल्याचे स्पष्ट होते.
या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, तसेच जल शुद्धीकरण प्रक्रियेत पारदर्शकता व काटेकोरपणा आणण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी आपली ठाम मागणी असून लातूरकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाहीअसा इशाराही नगरसेवक ऋषिकेश राजे यांनी दिला आहे.

# जळकोट तालुका फर्टीलायझर्स असोसिएशन आज पासून कृषी दुकाने बेमुदत बंद




**तभा वृत्तसेवा**
**जळकोट दि. २६ एप्रिल :** तालुक्यातील . महाराष्ट्र राज्य कृषि विक्रेत्यांचा बेमुदत बंद असल्यामुळे जळकोट तालुक्यातील संपूर्ण कृषि सेवा केंद्र दि.२७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद राहणार आहेत.जळकोट तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले .अशी माहिती जळकोट तालुका फर्टीलायझर्स असोसिएशनचे अध्यक्ष सोमेश्वर सोपा उपाध्यक्ष श्रीकृष्ण कोटलवारयांनी माहिती दिली .
खत कंपन्याकडून केले जाणारी लिकींगच्या विरोधात जाचक साथी ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य करण्याच्या विरोधात किरकोळ खत विक्रेत्यावर लावलेल्या जाचक नियम व अटीच्या विरोधात नविन लागु होणारे जाचक बियाणे व किटक नाशक कार्यदा विरोधात दुकानदाराला सिलबंद कृषि निष्ठा विक्री केल्यावर ही शिक्षा होते या अन्यायाच्या विरोधात जळकोट तालुक्यातील पुर्ण कृषि सेवा केंद्र बंदला पुर्ण पाठींबा म्हणून महाराष्ट्र राज्य कृषि विक्रेतेच्या बेमुदत बंदला पुर्ण पाठींबा दिला आहे. म्हणून जळकोट कृषि आसोसियशनंनी दि.२७ एप्रिल २०२६ रोजी पासून बेमुदत बंद पुकारलेला आहे. त्यासाठी हे निवेदन देण्यात आले आहे.

## पोहरेगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
रेणापूर **दि. २६ एप्रिल :**पोहरेगाव येथील विठ्ठल नगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व सन्मान सोहळा उत्साहात सपन्न झाला .
या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन जि.प.सदस्या मनिषाताई गंगासिंह कदम या होत्या तर गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. ज्योतीताई मोरे, उपसरपंच शालीवाहन सरवदे, ग्रामपंचायत सदस्य भगिरथ घाटुळे, रामराव आबा सरवदे,विनायकराव सरवदे,सुभाष वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती
कार्यक्रमाचे आयोजन येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने करण्यात आले होते विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद शाळेचे
या प्रसंगी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या शाळेतील विद्यार्थी अतिशय गुणी,अभ्यासात हुशार व जिज्ञासू असून शिक्षकांच्या परिश्रमातून त्यांची घडण होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले . तसेच शाळेचे शिक्षक,पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.लहूकांत शेवाळे सुनिता वेल्हाळे गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित




**तभा वृत्तसेवा**
रेणापूर **दि. २६ एप्रिल :** येथील श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक लहूकांत शेवाळे व ज्येष्ठ शिक्षिका सुनीता वेल्हाळे यांना गुरुवार दि' २३ एप्रिल रोजी लातुर येथील दयानंद सभागृह येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
प्राध्यापक लहूकांत शेवाळे यांच्या शैक्षणिक चळवळीतील योगदान व शिक्षण क्षेत्रातील अनुभव पाहता त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला तर सुनीता वेल्हाळे यांच्या नवोपक्रमशीलता व कल्पकता यामुळे शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा यानिमित्ताने गौरव करण्यात आला.
या कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावर
ना.बाबासाहेब पाटील( सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य),आ. विक्रमजी काळे, मधुकरजी उन्हाळे( राज्याध्यक्ष, शिक्षक परिषद), दयानंदजी सुरवसे( उपाध्यक्ष, जि.प.लातूर), रामचंद्र तिरुके( गटनेता, जि.प.लातूर), शिवकन्याताई गोडभरले( सभापती, महिला व बालकल्याण जि.प. लातूर) शोभाताई अकनगिरे( नगराध्यक्ष,नगरपंचायत, रेणापूर),भुजंग शिंदे( उपसभापती, पं.स.चाकूर), डॉ. भागीरथी गिरी( प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई) महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे यांच्या हस्ते व मा.देविदासराव कुटवाड,अध्यक्ष रेणुका शिक्षण संस्था,रेणापूर, संचालक अनिताताई भातिकरे,ड. सुनिल कुटवाड, ड.दिपक गोडभरले,ड. नरेश उगिले,प्राचार्य सिध्देश्र्वर मामडगे, मुख्याध्यापक चंचला वलसे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड,प्रा.भरत धायगुडे,गणेश नराळे,सुरेखा बस्तापूरे यांची उपस्थिती होती. यांच्या उपस्थितीत गुरुगौरव पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी श्रीराम प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,स्नेही व शिक्षणप्रेमी नागरीक मोठ्या संख्यनेउपस्थित होते. प्रा.शेवाळे याच्यावर परीसरातील शिक्षण प्रेमी नागरीकाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

# मर्जीतल्या गूत्तेदारांना मिळतात कामे

## भोकर सार्वजनिक बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार

**भा वृतसेवा**
**ोकर, दि. २६ एप्रिल -**

भोकरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा ोंगळ कारभार सूरु असून मर्जीतल्या गूत्तेदारांना ामे वाटप करित असल्याने नियंत्रणाअभावी दरील कामे निकृष्ट पध्दतीने होत आहेत दहा ाखाच्या आतील कामे फक्त कागदोपत्री दाखवून ाम न करताच बिले मंजूर करून शासनाच्या ंधीची विल्हेवाट लावण्यात येत असल्याचे दर्शनास येत आहे. मागील चार वर्षापर्यंत ालेली कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आली. द्या सूरु असलेल्या पिंपळढव ते लगळूद रस्त्याचे ाम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसून निकृष्ट दर्जाचे ाम करित असल्याची ओरड गावकर्‍याकडून ोत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे ाकडे मात्र कमालीचे दूर्लक्ष होत आहे. कार्यकारी भियंता उपअभियंता यांच्या मागील चार वर्षाच्या ार्यकाळात अनेक कामे हलक्या दर्जाची झाली सून मर्जितल्या गूत्तेदारांना हाताशी धरुन इंटरनल न्डर प्रक्रियेत मॅनेज करुन बोगस कामे करण्यात



आली भोकर सार्वजनिक विभागात शासन नियमाचे पालन न करता सि.सि.रोड बांधकाम ड्रेनेज बांधकाम खड्डे बूजविणे हि कामे अंदाजपत्रकानूसार

कामे न करता थातूर मातूर कामे करण्यात आली व बिले उचलण्यात आली दहा लाखाच्या आतील अनेक कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्ष काम न करताच बिले मंजूर करुन ती उचलण्यात आल्याची माहिती आहे. झालेल्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून संबधित अधिकारी व गूत्तेदार यांच्या संमतीने शासनाच्या कोट्यावधीच्या निधीची विल्हेवाट लावण्यात आली सर्व कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्याची मागणी होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उपअभियंता यांनी मर्जीतील गूत्तेदारांना हाताशी धरुन बोगस व निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली. दरम्यानच्या कार्यकाळात सार्वजनिक बांधकाम विभागात भोकर मध्ये किती कामे करण्यात आली व ती कामे किती रक्कमेची होती याची चौकशी करावी तसेच कामाचा दर्जा तपासण्यात यावा एकाच ठिकाणी ठाण मांडून राहणार्‍या अभियंत्याची देखील चौकशी करण्यात यावी अशी अनेकांची मागणी होत आहे.

# मेहनतीची मयारी ठेवल्यास यश आपल्या भोवती घिरट्या घालते : ज्ञानदा कांबळे

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २६ एप्रिल -**

सकारात्मक विचार, कामाबाबत प्रामाणिकता व मेहनतीची तयारी ठेवल्यास यश निश्चितच आपल्या भोवती घिरट्या घालते असे मत कु. ज्ञानदा चतुरंग कांबळे यांनी व्यक्त केले.

खात्याअंतर्गत परीक्षा देऊन उत्तीर्ण झाल्याने जरूर येथील शाखा डाकपाल कु. ज्ञानदा चतुरंग कांबळे यांची मुंबई येथे पदोन्नतीवर बहुकार्य सेवा कर्मचारी एम.टी. एस. म्हणून बदली झाली त्यांना आज मांडवी उप डाकपाल कार्यालयाकडून निरोप देण्यात आला त्याच्या उत्तरात त्या व्यक्त होत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप डाकपाल सुरेश वाघमारे हे होते.

यावेळी सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने पळशीच्या ज्येष्ठ शाखा डाकपाल सौ. तुळसाबाई पुसनाके यांचे हस्ते ज्ञानदाचा सत्कार करण्यात आला तेव्हा ज्ञानदा मोठी अधिकारी होऊन आपल्या भागात मी सेवानिवृत्त होण्यापूर्वी याव अशी अपेक्षा



त्यानी व्यक्त केली.

अत्यंत कमी कालावधीत व कमी वयात ज्ञानदाने डाक सेवा चोखपणे निभवत अभ्यासात खंड न पडू दिल्याने आज ती अतिदुर्गम जरूर येथून अति विकसित राज्याची राजधानी असलेल्या मुंबईला जात आहे याचा मला सार्थ अभिमान वाटतो वयोमानाप्रमाणे ती नक्कीच अधिकारी होऊन स्वजिल्ह्यात येईल असा आशावाद कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश वाघमारे यांनी व्यक्त केले.

ह्यावेळी दिनेश दासरवार सह सर्व शाखा डाकपाल दरसावंगीचे अस्मित वाघमारे,जवारला रवि दासरवार, कनकी धिरज लखन राठोड, खबाळा नरसय्या पदकंठवार, कोठारी राहुल भुरे, लिंगी पोचन्ना अटलावार, नागापूर धर्मेंद्र ठाकूर,निराळा अनिता सेगेवाड,पळशी तुळसाबाई पुसनाके, पाटोदा गजानन पांडे, पिंपळगाव गोदाजी पोलासवार, रायपूर तांडा रमेश दासरवार, सक्रु नाईक तांडा रामराव पिटलावार, सिगोडा गंगन ना वेडंटी, उमरी करण चव्हाण, उनकदेव संतोष नदीकोंडावार, निवृत्त डाक सेवक स्वामी दासरवार ईत्यादी उपस्थित होते.

## कै. चिद्रावार व्याख्यानमालेत डॉ.लहाने यांचे व्याख्यान

**देगलूर** -नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजातील नेते, देगलूरचे माजी नगराध्यक्ष , अनेक सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक संस्थेचे संस्थापक कै. नारायणराव चिद्रावार यांच्या ४० व्या स्मृतीदिनानिमित्त यावर्षी २ मे २०२६ रोज शनीवारी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात



आले आहे. या व्याख्यानमालेचे यंदाचे पुष्प जागतिक कीर्तीचे प्लास्टिक सर्जन व सुप्रसिद्ध वक्ते हे वैभवशाली भारतीय संस्कृती व राष्ट्र उभारणीत आपले योगदान या विषयावर गुंफणार आहेत, सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून निजामबादचे आमदार धनपाल सूर्यनारायण गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक बालाजी पाटील ख़तगावकर व आमदार जितेश अंतापुरकर (देगलूर विधानसभा मतदारसंघ) या मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या व्याख्यानमालेचे ३९ वर्षे पूर्ण झाले असून यंदाचे ४० वे वर्ष आहे. महाराष्ट्रातील थोर विचारवंत राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यीक यांचे विचार लोकांपर्यंत जावेत व या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य व्हावे या सदहेतूने या व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. आज पर्यंत या व्याख्यानमालेत ना. ग. गोरे, माजी अर्थमंत्री मधु दंडवते, प्रा. राम शेवाळकर, राजीव दीक्षित, बापुसाहेब काळदाते, माजी गृह राज्यमंत्री भाई वैद्य , माजी शिक्षणमंत्री सदानंद वर्दे, माजी न्यायाधीश कोळसे पाटील, गो. रा. खैरनार, मेधाताई पाटकर, सदाशिव अमरापुरकर, निळु फुले, सिंधुताई सपकाळ, डॉ. नरेंद्र दाभोळकर, चचैतन्य महाराज देगलुरकर, प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. कुमार सप्तर्षी, सुरेश द्वादशीवार, डॉ. जगदीश हिरेमठ, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांची व्याख्याने झाली आहेत .या वर्षी ०२ मे २०२६ रोजी सायंकाळी ०७:०० वा. देगलूर येथील नगरेश्वर मंदिर प्रांगण येथे आयोजित केला आहे. सर्व मान्यवरांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे वाहन कै. नारायणराव विद्रावार स्मृती व्याख्यानमालेच्या संयोजकांनी केले आहे.

# उष्णतेपासून कामगार वर्गाचे संरक्षण करणे ही मालकाची प्राथमिक जबाबदारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ एप्रिल -**

सध्या वाढत्या तापमानामुळे (Heat Wave परिस्थिती) दुपारी १२ ते सायं. ४ या वेळेत उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या तसेच कारखान्यातील, दुकानातील, हॉटेल्स मधील, खाद्यागृहे, आय टी कंपन्या, शॉपिंग मॉल्स, किरकोळ विक्रीची दुकाने, एमआयडीसी मधील उद्योगातील कामगार व इतर ठिकाणी काम करण्याऱ्या कामगारांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्व आस्थापनांना याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. उष्णतेपासून कामगार वर्गाचे संरक्षण करणे ही मालकाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने पुढील उपाययोजना तात्काळ राबविणे सर्व आस्थापनांना बंधनकारक आहे.

दुपारी १२ ते ४ यावेळेत कामगारांकडून कष्टाची, शारीरिक श्रमाची कामे करून घेण्यात येऊ नयेत, यास्वरूपाच्या कामाच्या वेळापत्रकात बदल करण्यात यावा किंवा अशी कामे बंद ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. कामगारांसाठी सावली (Shade), विश्रांती कक्ष उपलब्ध करून देण्यात यावा. कामाच्या ठिकाणी स्वच्छ थंड व मुबलक पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता संबंधी सूचना तसेच आपत्कालीन नंबर स्पष्टपणे प्रदर्शित करण्यात यावा. स्थानिक आरोग्य व्यवस्थेशी समन्वय ठेऊन उष्माघात सारखी प्रकरणे आढळल्यास तातडीने उपचार करण्याची सोय करावी.

या सूचनांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापनांवर कडक कारवाई करण्यात येईल. असा इशारा सहायक कामगार आयुक्त आशिष दिलीप ढवळे यांनी दिला आहे.

# टॉवर उभे पण नेटवर्क ठप्प!

## जिओच्या ‘लपंडावा’ने इस्लापूरकर संतप्त

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २६ एप्रिल -**

इस्लापूर परिसरात जिओ रिलायन्स च्या नेटवर्कचा अक्षरशः बोजवारा उडाला असून नागरिकांना रोजच्या रोज नो सिग्नलचा सामना करावा लागत आहे. टॉवर उभे असतानाही नेटवर्क गायब, कॉल लागत नाहीत, इंटरनेट ठप्पया भोंगळ कारभारामुळे इस्लापूरकरांचा संताप आता उफाळून आला आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून जिओ नेटवर्कचा लपंडाव सुरू असून दिवसाढवळ्या सिग्नल गायब होणे, कॉल ड्रॉप, इंटरनेट बंद पडणे हे प्रकार नित्याचे झाले आहेत. आपत्कालीन प्रसंगीही संपर्क होत नसल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. महागडे रिचार्ज करूनही सेवा मिळत नसल्याने ग्राहक संतप्त झाले आहेत. नेटवर्क नाही, पण बिल मात्र वेळेवर! अशी उपरोधिक प्रतिक्रिया सर्वत्र ऐकायला मिळत आहे.

डिजिटल पेमेंट, बँक व्यवहार, ऑनलाइन कामकाज यावर थेट परिणाम होत असून व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. ग्राहकांसमोर गैरसोय होऊन प्रतिष्ठेलाही धक्का बसत आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस सुधारणा दिसत नसल्याने कंपनीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कस्टमर केअर म्हणजे फक्त औपचारिकता, असा आरोप नागरिक करत आहेत.

एकीकडे डिजिटल सेवांचा गाजावाजा आणि दुसरीकडे नेटवर्कच गायबया विरोधाभासी परिस्थितीमुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. एकूणच, जिओ नेटवर्कचा हा भोंगळ कारभार आता नागरिकांच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेला असून तातडीने ठोस कारवाई न झाल्यास परिस्थिती पेट घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## लोणी येथे कन्यका परमेश्वरी वासवी माता जन्मोत्सव उत्साहात साजरा

**हाणेगाव** -देगलूर तालुक्यातील लोणी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कन्यका परमेश्वरी वासवी माता जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात



आला. लोणी येथील आर्य वैश्य समाजाकडून कन्यका परमेश्वरी वासवी माता जन्मोत्सवा निमित्त दिपप्रज्वलन करून कुंकंम-अर्चन पुजा करण्यात आले यावेळी लोणी, हनेगाव,वझर,कुडली, मरखेल, येथील आर्य वैश्य समाज बांधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री बालाजी विठ्ठल पोकलवार, डॉ.आंनद चिद्रावार, बालाजी रामराव पोकलवार, मानसी अर्बन बँकेचे संस्थापक नारायण शिंदे,राम वटटमवार, विलास वटटमवार, सतीश वटटमवार, राहुल गादेवार, अशोक कोमावार, दत्तात्रय वटटमवार, संतोष बलशेटवार, यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश मुक्तावार, संजय धंपलवार, बालाजी कटकमवार, नागनाथ चिद्रावार,लक्ष्मीकांत चिद्रावार, गंगाधर चिद्रावार, दत्तात्रय चिद्रावार, बालाजी चिद्रावार,प्रशांत चिद्रावार, निशांत चिद्रावार, विनायक चिद्रावार,किरण धंपलवार,व सौ.पदमावती कटकमवार, सौ.सुनिता धंपलवार,सौ.रूपा चिद्रावार, रेश्मा चिद्रावार, श्रध्दा चिद्रावार, पुष्पा चिद्रावार, संगीता चिद्रावार,मंजूशा चिद्रावार, आश्विनी चिद्रावार, यांनी परिश्रम घेतले.

# खत टंचाई, लिकींग व काळा बाजार रोखण्यासाठी जिल्हाधीकाऱ्यांची कृषी सेवा केंद्रावर धडक तपासणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ एप्रिल -**

खरीप हंगामच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नवीन मोंढा, नांदेड येथील वसुंधरा फर्टीलायझर्स कृषी निविष्ठा विक्री केंद्रास तसेच गोदामास भेट देवून साठा केलेल्या खताची तपासणी केली तसेच श्री फर्टीलायझर्स कृषी सेवा केंद्र येथे अचानक भेट देऊन बाजारातील खते व बियाणे पुरवठा व विक्री संदर्भात माहिती घेतली. कृषी निविष्ठा विक्रेते यांचे परवाने, साठा रजिस्टर, इ-पॉस मशिनची तपासणी करून प्रत्यक्षात खताचा किती साठा आहे हे तपासले.

याबाबत कृषी निविष्ठा विक्रेते यांना इ-पॉस मशीन शिवाय खत विक्री करू नये तसेच खताची साठेबाजी करू नये अशा सूचना दिल्या. युरिया व डीएपीच्या विक्री बाबत जिल्ह्यातील सर्व कृषि क्रेंदाची खरीप हंगामपूर्व १०० टक्के तपासणी पूर्ण करण्याबाबत कृषि अधिकारी गुणनियत्रण तालुका नांदेड पुनम चातरमल यांना सुचना देण्यात आल्या. तसेच दर्शनी भागात फलक लावण्याबाबत सुचना दिल्या. ई-पॉस वरून खतांचा अहवाल काढून प्रत्यक्ष भौतीक साठ्यासोबत व साठा रजीस्टर सोबत जुळतो किंवा कसे याची पडताळणी केली.



खत विक्रीच्या भौतीक बीलांची तपासणी केली व शेतकरी बांधवांनी प्रत्यक्षात ते खरेदी केल्याची खातरजमा केली.

शेतकऱ्यांना दर्जेदार व योग्य दरात कृषी निविष्ठा उपलब्ध होत आहेत का याची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी खत टंचाई, कृत्रीम साठेबाजी, लिकींग पद्धत व काळा बाजार होणार नाही यासाठी कडक सूचना दिल्या. त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, खतांचा साठा लपून किंवा कृत्रीम टंचाई निर्माण करण्याऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. लिकींग पद्धतीने विक्री केल्यास व शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास तात्काळ परवाने निलंबीत करण्यात येतील असे स्पष्ट निर्देश दिले. ज्यादा दराने खत विक्री केल्यास संबंधीतावर दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत दिले. शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. बनावट व निकृष्ट दर्जाच्या निविष्ठा विरूद्ध शून्य सहनशिलता धोरण राबवीण्याचे स्पष्ट केले. कृषी निविष्टा गुणवत्ता नियंत्रणासाठी सर्वतोपरी उपाययोजना करणेबाबत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विकास अधिकारी अनिल कुमार ऐतवाडे विभागीय तंत्र अधिकारी बालाजी मुंडे, मोहीम अधिकारी सचिन कपाळे, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक अमोल पेकम तालुका गुणनियंत्रण निरीक्षक पुनम चातरमल, आरसीएफ जिल्हा प्रतिनिधी कापसे व इफको जिल्हा प्रतिनिधी घाडगे हजर होते.

# पीक विम्यापासुन इस्लापूर वंचित

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २६ एप्रिल -**

खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे इस्लापूर महसूल मंडळातील शेतीचे मोठे नुकसान झाले. हजारो शेतकऱ्यांचे संसार उद्धस्त झाले असताना, दिलासा म्हणून जाहीर करण्यात आलेली पीक विमा भरपाई अजूनही अनेकांसाठी प्रतीक्षेतच आहे. इस्लापूर महसूल मंडळातील हजारो शेतकरी भरपाईच्या प्रतीक्षेत असल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इस्लापूर महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी मोठ्या विश्वासाने सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग आणि ज्वारी या पिकांसाठी विमा काढला होता. अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

दरम्यान,किनवट तालुक्यातील काही महसूल मंडळांमध्ये सोयाबीन पिकासाठी हेक्टरी २० ते २५ हजार रुपयांपर्यंत भरपाई मंजूर करण्यात आली असून ती रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा सुद्धा झाली आहे.

मात्र, याचवेळी इस्लापूर मंडळ आणि जलधरा मंडळ पूर्णपणे वंचित राहिले आहेत. या मंडळांमध्ये अद्याप विमा लागूच करण्यात आलेला नसल्याने येथील शेतकरी भरपाईपासून दूरच आहेत. त्यामुळे काहींना पैसे आणि काहींना अन्याय असे चित्र स्पष्टपणे समोर आले आहे. इतर पिकांच्या भरपाईबाबतही प्रशासनाकडून कोणतीही ठोस माहिती देण्यात आलेली नसल्याने संभ्रम आणि नाराजी वाढत आहे. काहींना पैसे मिळतात, मग आम्हाला का नाही? असा संतप्त प्रश्न इस्लापूर मंडळातील शेतकरी विचारत आहेत. भरपाई तात्काळ मिळाली नाही तर इस्लापूर महसूल मंडळातील शेतकरी आंदोलनाचा मार्ग स्वीकारणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## डॉ. सिंकुकुमार सिंग असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटीमध्ये जॉईंट सेक्रेटरी पदावर

**नवीन नांदेड** -नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र संकुलाचे माजी संचालक प्रा.डॉ. सिंकुकुमार सिंग यांची नवी दिल्ली येथील असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी ( एआययु) मध्ये जॉईंट सेक्रेटरी क्रीडा या पदावर निवड झालेली आहे. डॉ. सिंकुकुमार सिंग यांना विद्यापीठ प्रशासन आणि क्रीडा क्षेत्रातील व्यापक व दीर्घ अनुभव आहे. त्यांनी शिक्षण शास्त्र संकुलाचे संचालक म्हणून यशस्वीरित्या कारकीर्द पूर्ण केलेली आहे. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी



आपले कार्य यशस्वीरित्या पूर्ण जबाबदारीने केलेले आहे. विविध शैक्षणिक व प्राधिकरणावर काम करत त्यांनी आपल्या कार्य कुशालतेची ठळक छाप उमटवली. असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी ( एआययु) ही देशभरातील विद्यापीठाची प्रमुख संस्था असून. क्रीडा विभागातील जॉईंट सेक्रेटरी या पदावर कार्य करताना डॉ. सिंकुकुमार सिंग यांच्या अनुभवाचा राष्ट्रीय स्तरावर मोठा उपयोग होणार आहे. डॉ.सिकुंकुमार सिंग यांच्या या निवडी बद्दल यशवंतराव मुक्त विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. यशवंत कलेकटवाड, डॉ.राजपाल चिखलीकर संचालक विद्यार्थी कल्याण, डॉ.कुलजीत सिंग राणा, पत्रकार संभाजी सोनकांबळे यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राचे काळबा हानवते, संदिप एडके,प्रदिप बिडला,रामदास खोकले,जनार्धन गोंवदे , शशिकांत लोहबंदे,शेख रशीद पांगरीकर शिवाजी हुंडे,कदम विद्यार्थी,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# अर्थव्यवस्थेला बळ देणारे गोदावरी अर्बनचे कार्य कौतुकास्पद : डॉ.पंकज भोयर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ एप्रिल -**

ग्रामीण भागातील आर्थिक प्रगतीसाठी सहकार क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, गोदावरी अर्बनचे कार्य अर्थव्यवस्थेला बळ देणारे आहे,असे गौरउद्गार सहकार,गृहनिर्माण, शालेय राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

गोदावरी अर्बनच्या वर्धा शाखेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ,अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे,वर्धा अर्बनचे अध्यक्ष सुधाकर साठवणे,मा.जि.प.उपाध्यक्ष संजय कामनापुरे,व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव अँड रविंद्र रगटे, प्रा.सुरेश कटकमवार, अजय देशमुख, नगरसेवक



सचिन होले, उपसरपंच सचिन खोंसे, बाळासाहेब साळवे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

नामदार डॉ.पंकज पाटील भोयर म्हणाले की, ग्रामीण भाग हा सहकाराचा कणा आहे. शेतकरी, कष्टकरी, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक पाठबळ देण्याचे मोठे कार्य गोदावरी अर्बन करीत आहे. संस्थेची भूमिका, उद्दिष्टे आणि भविष्यातील नियोजन दूरदृष्टीचे असून, समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम संस्था प्रभावीपणे करत आहे.तसेच वर्धा परिसरात आणखी शाखा सुरू करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्ष राजश्री पाटील यांनी सांगितले की, ज्यांची पत नाही त्यांची पत निर्माण करण्यासाठी गोदावरी अर्बनची स्थापना करण्यात आली.संस्थेचे सभासद आर्थिक सक्षम होण्याबरोबर आर्थिक साक्षर व्हावेत, यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. ग्राहकांचा विश्वास, कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संस्था सातत्याने प्रगती करत आहे. प्रास्ताविकात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सांगितले की, गोदावरी अर्बनने देशातील सहा राज्यांत आपले कार्यक्षेत्र विस्तारले आहे. फेसलेस कर्ज वितरणासह आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांना जलद व सुलभ सेवा देण्यात येत आहे.

वर्धा शाखेने सर्वाधिक सोनेतारण कर्ज वितरणाचा मान मिळविला असल्याचे नमूद करून शाखा व्यवस्थापक चंद्रशेखर कामडी यांचा गौरव करण्यात आला, यावेळी उत्कृष्ट ठेवीदार सभासदांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये नंदकिशोर भुतडा, यादवराव उमाटे, प्रदीप शर्मा, विनायकराव पावडे, श्रीधर वरटकर , शरदराव चौधरी , नितीन तामगाडगे यांचा समावेश होता. राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्कृष्ट विक्रमी डिपॉझिट ४४९ कोटी ठेवी असलेल्या दत्त चौक शाखा यवतमाळ करता उपसरव्यवस्थापक रवी इंगळे, पुसद शाखेचे वरिष्ठ व्यवस्थापक राहुल कोल्हे २०० कोटी , यवतमाळ मेन लाईन शाखा १८८ कोटी व्यवस्थापक अमित पिंपळकर, वणी शाखा १०६ कोटी व्यवस्थापक विजय मोडक, नागपूर शाखा १०० कोटी व्यवस्थापक प्रज्वल किलोळ, हिंगणघाटचे व्यवस्थापक कुंदन वेल्ले व वरिष्ठ व्यवस्थापक गिरीश अष्टोनकर यांचाही क्रेडिट व्यवस्थापन बाबत गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उप सरव्यवस्थापक रवि इंगळे यांनी केले .

कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता उपसरव्यवस्थापक विजय शिरमेवार,डेप्युटी मॅनेजर प्रशांत कदम, सहाय्यक व्यवस्थापक गजानन सूर्यवंशी, एकनाथ विभुते, वैभव श्रोती, नागनाथ कापसे, नेहा साळवे, जागृती चव्हाण, महेश मांडवकर, धीरज खुणकर, प्रवीण निमसटकर समस्त कर्मचारी, दैनिक व आवर्त ठेव प्रतिनिधी वृंद यांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाला सभासद ठेवीदार हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्लॅस्टिक पिशव्या वापरणाऱ्या ५६ दुकानांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** शहराच्या गांधी चौकासह विवेकानंद चौक, कव्हा नाका, राजीव गांधी चौक, औसा रस्ता, बार्शी रस्ता, गंजगोलाई आदी भागात सलग दोन दिवस करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल २५ किलो प्लॅस्टिक कॅरिबॅगचा साठा जप्त करण्यात आला. यावेळी ५६ दुकानदारांना ३२ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्यावतीने ही कारवाई करण्यात आली.

शहरातील प्रत्येक व्यापाऱ्यासह हातगाडीवरील व्यावसायिकही मोठ्या प्रमाणावर बंदी असलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करताना दिसून येतात. हे प्लॅस्टिक विघटितही होत नाही. त्यामुळे गटारी तुंबतात. त्या वजनाने हलक्या असल्याने वाऱ्याने उडून घाणीचे साम्राज्य पसरते. अशा प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही त्याचा सर्रास वापर होत असल्याचे निदर्शनास आल्याने महापौर जयश्री सोनकांबळे व महापालिका आयुक्त मानसी यांनी प्लॅस्टिक वापरणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार शहरातील ५६ दुकानदारांकडून कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या. त्यांच्याकडून ३२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. यावेळभ २५ किलो कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या.



# वाढत्या उष्णतेचा एसटी प्रवाशांवरही होतोय परिणाम !

## लग्न सोहळ्याचा अपवाद वगळता दुपारच्या दरम्यान बसस्थानकातील गर्दी कमी





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** उन्हाच्या काहिलीचा आबालवृद्धांसह पशु - पक्षी सर्वांना त्रास सहन करावा लागत आहे. पर्यावरणाच्या वाढत्या असमतोलाचा हा परिणाम असल्याचे बोलले जाते. वाढत्या उष्णतेचा व्यवहारावरही प्रतिकूल परिणाम होताना दिसत सून नेहमी प्रवाशांच्या गर्दीने फुलून गेलेल्या एसटी बसच्या प्रवाशांची संख्याही सांगणं सोहळ्यासारख्या प्रसंगाचा अपवाद वगळता दुपारच्या वेळेस लक्षणीय घटल्याचे दिसून येत आहे.

मागच्या काही कालावधीपासून उष्णतेचे प्रमाण खूपच वाढत जात असल्याचे पाहायला मिळते. पर्यावरणाच्या वाढत्या असमतोलामुळे ऋतुचक्रातच अतुलनीय बदल होत गेल्याचे निदर्शनास येते. तिन्ही ऋतूंचे परिमाण मागच्या काही काळापासून सातत्याने बदलत गेल्याचे पाहायला मिळते. कधीही , कोणत्याही ऋतूप्रमाणे वातावरणात बदल होताना दिसतो. मध्यंतरी ऐन उन्हाळ्यात आलेल्या अवकाळी पावसाने अगदी पावसाळ्याप्रमाणे वातावरण निर्माण झाले होते.

आताही राज्याच्या बहुतांश भागात अवकाळीचे सावट असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. बदलत्या ऋतुचक्राचा मानवी जीवनावर जसा प्रतिकूल परिणाम होत आहे, तसाच तो पीक - पाण्यावरही होताना दिसतोय. यासाठी कारणीभूत असणाऱ्या गोष्टींवर स्वतःहून मानव सगळे काही कळूनही निर्बंध आणू शकत नाही, हे खरे दुःख आहे.

सध्या उन्हाळ्याच्या उष्णतेने कहर केला आहे. राज्यात अनेक ठिकाणी तापमानाने चाळीशी केव्हाच ओलांडली आहे. लातूर जिल्ह्यातही तापमान दिवसेंदिवस वाढतच जात आहे. या वाढत्या उष्णतेमुळे दुपारच्या दरम्यान रस्त्यावरील वाहतुकीचे प्रमाणही बऱ्यापैकी कमी झाल्याचे पाहायला मिळते. उन्हाच्या झळांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी जो तो सावलीचा आधार घेताना दिसून येतो. महत्वाचे काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये असे आवाहनही प्रशासनाकडून, आरोग्य विभागाकडून केले जात आहे. खूपच महत्वाचे असेल तर उन्हापासून बचाव करण्याच्या उपाय योजनासह बाहेर पडावे असे सांगितले जात आहे. या वाढत्या उष्म्याचा परिणाम जनजीवनावर होत आहे. तो परिणाम एसटी बसने प्रवास करणाऱ्यांच्या बाबतीतही पाहायला मिळत आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रवासी मोठ्या संख्येने प्रवास करतात. मात्र, प्रवास करतानाही दुपारच्या कडक उन्हात प्रवास करण्याऐवजी प्रवासी सकाळच्या सत्रात प्रवास करण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत. दुपारच्या दरम्यान तीन चार तास बस स्थानकावरही फारशी गर्दी दिसून येत नाही. बस स्थानकात असलेले प्रवाशी मिळेल त्या ठिकाणी सावलीचा आसरा घेऊन शांत बसलेले दिसून येत आहेत. सकाळी आणि ऊन ओसरल्यानंतर एसटी मधील प्रवेशाची संख्या वाढताना पाहायला मिळते. पण, दुपारच्या दरम्यान मात्र ही संख्या कमालीची रोडवल्याचे दिसून येत आहे.

सध्याच्या वाढत्या उष्णतेच्या पार्श्र्वभूमीवर एसटी प्रशासनानेही दुपारच्या वेळेस धावणाऱ्या गाड्यांची संख्या कमी करून सायंकाळच्या सत्रात धावणाऱ्या बसेसची संख्या वाढवावी,असा मतप्रवाहही प्रवाशांतून व्यक्त होताना दिसत आहे.

कारण दुपारी उन्हामुळे प्रवासी संख्या कमी असताना बसेस घेऊन जाणे आर्थिकदृष्ट्याही एसटी महामंडळाला परवडणारे नाही. या बाबींकडे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने पाहावे,अशी अपेक्षाही सुजाण नागरिकांतून व्यक्त होताना दिसत आहे.

## विविध वृत्त...

### महापालिकेत हिवतापदिनी आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जागतिक हिवताप दिनानिमित्त महानगरपालिकेच्या तावरजा कॉलनी येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जनजागृती व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यात शेकडो रुग्णांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले. यावेळी नगरसेवक ॲड. किरण जाधव, सुरेखा ईगे, नसरीन शेख, मंगेश सोनकांबळे, सचिन गायकवाड उपस्थित होते.

यावेळी २०२४ या वर्षात आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शर्वरी महाजन आणि लॅब टेक्निशियन रेशमा डांगे यांचा सन्मान करण्यात आला. आरोग्य निरीक्षक पार्श्र्वनाथ पाटील यांच्या आरोग्य सर्वेक्षणात्मक उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. डेंग्यू, मलेरिया प्रतिबंधासाठी घरोघरी जाऊन उपाययोजनांची अंमलबजावणी करणाऱ्या आशा स्वयंसेविकांचाही सत्कार करण्यात आला.

डॉ. शंकर भारती यांनी प्रास्ताविक करतांना जागतिक हिवताप दिन साजरा करण्यामागची पार्श्र्वभूमी आणि हिवतापाला दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना का महत्त्वाच्या आहेत, याची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी केले.

### कोम्बिंगऑपरेशनमध्ये ६जणांकडून शस्त्र जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जिल्ह्यात अचानकपणे राबविण्यात आलेल्या 'ऑल आऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' मोहिमेत शस्त्र बाळगणारे ६, ११ जणांवर प्रतिबंधात्मक व १२७ सराईत आरोपींची तपासणी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात ही विशेष मोहीम राबविण्यात आली. यात पोलीस दलातील एकूण ३१ अधिकारी, १०६ अंमलदार आणि ८८ होमगार्ड सहभागी झाले होते.

या ऑपरेशनदरम्यान रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांच्या घरांवर अचानक भेटी देऊन त्यांच्या हालचालींची पडताळणी करण्यात आली. ते सध्या कुठे आहेत, कोणत्या प्रकारचा व्यवसाय करतात, त्यांच्या वर्तनात काही संशयास्पद बदल आहे का, याची चौकशी करण्यात आली. मालमत्तेविषयक गुन्हे करण्याची शक्यता असलेल्यांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना समज देण्यात आली. ज्यामुळे संभाव्य गुन्हे रोखण्यास मदत झाली.

या मोहिमेदरम्यान ६ जणांवर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले त्यांच्याकडून अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. मालमत्तेविषयक गुन्हे करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या ११ जणांविरुद्ध कलम १२२ (क) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईमुळे गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यास मदत होणार आहे. यावेळी घरफोडी व इतर गुन्ह्यांतील १२७ सराईत आरोपींच्या घरी भेटी देऊन त्यांच्या हालचालींची माहिती घेण्यात आली. त्यांना भविष्यात कोणतेही समाजविघातक कृत्य न करण्याबाबत समज देण्यात आली. ११० लॉजेस व हॉटेल्सची तपासणी करण्यात आली ३० संवेदनशील (मर्मस्थळ) ठिकाणांना भेटी देण्यात आल्या. जिल्ह्यात विविध ३१ ठिकाणी नाकाबंदी करून ८२७ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीमुळे संशयित हालचालींवर नियंत्रण ठेवण्यास मदत झाली. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या २२ वाहनचालकांविरुद्ध खटले दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी राबविलेल्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये स्पष्ट संदेश गेला आहे. कायदा व सुव्यवस्थेबाबत कोणतीही तडजोड -केली जाणार नाही, अशा 'ऑलआऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' यापुढेही सुरूच राहणार आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून विद्यार्थिनीवर दोन वर्षे अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** लग्नासाठी मुलगी पाहण्यास आला, मुलगी पसंदही पडली, आता आपण विवाह बंधनात अडकायचे आहे, त्यामुळे शरीर संबंध ठेवले तर काय फरक पडणार नाही, असे म्हणून मागील दोन वर्षांपासून एका पीडित विद्यार्थिनीवर घरात आणून बलात्कार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी आशीष अनिल कांबळे (वय २७, रा. भारत सोसायटी, लातूर) जून २०२४ एक मूलगी मध्ये लातूर येथेच लग्नासाठी एक मुलगी पाहायला गेला होता. दोघेही एकमेकांना पसंद झाले होते. आता लग्नच करायचे आहे, असे म्हणून आरोपी आशीष याने पीडितेकडे शरीर सुखाची मागणी केली. विवाहापूर्वीच शरीर संबंध ठेवण्यास पीडितेने विरोध केला तरी आरोपी आशीष याने तिला स्वतःच्या घरी बोलावून तिच्यावर ऑगस्ट २०२४ मध्ये शरीर संबंध ठेवले. त्यानंतर दोघांनी २ एप्रिल २०२६ पर्यंत शरीर संबंध ठेवले. शेवटी आरोपी आशीष याने पीडितेसोबत विवाह करण्यास नकार दिला. तिच्याशी संपर्कही कमी केला. त्याने पीडितेच्या परस्पर विवाह केल्याचे पीडितेने पोलिसांना सांगितले. तिच्या फिर्यादीवरून विवेवकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपी आशीष अनिल कांबळे याच्याविरोधात गुरनं. २८४/२६ कलम ६९ भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक ए. पी. खोडेवाड करीत आहेत. गुन्हा दाखल झाल्याचे माहित होताच आरोपी फरार झाला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### रॉडने मारहाण; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जुन्या भांडणाची कुरापत काढून एका तरुणावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना रेणापूर तालुक्यातील बिटगाव तांडा येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. २२ एप्रिल रोजी सकाळी ७:४५ च्या सुमारास संजय गोपीनाथ राठोड हे आरोपी विष्णू मोतीराम राठोड याच्या घराकडे गेले असता, तु माझ्या घरी का आलास? असे म्हणून विष्णूने शिवीगाळ सुरू केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने लोखंडी रॉडने संजयच्या डोक्यावर प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी रेणापूर पोलिसात गुन्हा नोंद आहे.

## टोल फक्त सर्व सामान्यांनीच भरायचा का?




**तभा वृत्तसेवा प्रमोद सुरवसे**

**लातूर दि .२६ एप्रिल :** नितीन गडकरी यांनी राज्यात असताना फक्त मुंबई एकाचवेळी५५ उड्डाण पुलाची निर्मिती करून एक इतिहास रचला . त्यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था सुरळीत झाली आता गडकरी केंद्रात काम करताना देशातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी म्हणून नवनवीन रस्त्यांची निर्मिती करत आहेत हे अभिनंदनीय आहेच .

पण याठिकाणी टोलनाके निर्माण करून झालेला खर्च वसुल काण्यासाठी त्या टोलनाक्यावर एका संस्थेची नेमणूक करून वसुली करत आहेत या ठिकाणी दोनचाकी वगळता इतर वाहनांना टोल भरावा लागतो.

हे सर्व ठिक पण एक बाब लक्षात आल्याशिवाय राहत नाही ती म्हणजे - मोठे अधिकारी आणि राजकीय मंडळी ज्यात आमदार, खासदार आदी ह्या मंडळींकडे दहा वीस लाखांच्या पुढील किमतीच्या, महागड्या गाड्या असतात . महागड्या गाड्या वापरून सुद्धा साधा दोन तीनशेचा टोल भरू शकत नाहीत का? उलट त्यांनी स्वतः हून टोल भरून एक समाजात आदर्श निर्माण केला पाहिजे पण कित्येक वेळा ही मंडळी टोल नाक्यावर हुज्जत घालताना चे व्हिडीओ वायरल झाल्याचे आपण पाहिले असेल त्यामुळे टोल नाक्यावर सर्वंच वाहनांना टोल बंधनकारक असणे आवश्यक झाले आहे . अँब्युलन्स वगळून इतर वाहनांना टोल लावावा .

यात सर्व सामान्य कधी ही टोल नाक्यावर हुज्जत घालताना दिसून येत नाही . तो टोल भरतोच भरतो त्यामुळे टोल भरणे बंधनकारक व्हावे जेणेकरून तो नाका लवकरात लवकर खुला होऊ शकेल यात राजकीय मंडळीचा सहयोग, मदत करण्यांची त्यांनी इच्छा शक्ती असेल तरच हे शक्य होईल.

## महावितरणकडून दुरुस्तीची कामे सकाळच्या सत्रात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले.

पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. या दरम्यान, पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे देण्यात येणार आहेत.

## सूतमिल रोडवरून वाहतेय घाण पाणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** शहराच्या ट्यूशन एरियातील देशिकेंद्र शाळेच्या समोरील सूतमिल रस्त्यावर गटार तुंबल्याने सर्व पाणी रस्त्यावरच येत आहे. त्या दुर्गंधीयुक्त पाण्यातूनच विद्यार्थ्यांसह पालकांना जावे लागते. वाहनांमुळे तेच पाणी अंगावर उडत असल्याने नागरिक व विद्यार्थी बेजार झाले आहेत. मागील दोन दिवसांपासून ही गटारगंगा वाहत असतानाही महापालिका प्रशासनाने मात्र याकडे डोळेझाक केल्याचेच दिसून येत आहे.

शहराच्या ट्यूशन एरियात अनेक शाळा महाविद्यालयांसह शिकवणी वर्गही मोठ्या संख्येने आहेत. या भागात हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. गांधी चौकातून उमाजी नाईक चौकाकडे जाणाऱ्या या रस्त्यावरील देशिकेंद्र शाळेजवळ एक गटार मागील दोन दिवसांपासून तुंबली आहे. त्या गटारीचे दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावरच येत आहे. या रस्त्याने दररोज शालेय व महाविद्यालयीन हजारो विद्यार्थी या पाण्यातूनच ये-जा करतात. वाहनांमुळे त्यांच्या अंगावरही पाणी उडते. याचा त्रास त्या विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो. दोन होऊन गेले तरी महापालिकेचे कोणीही याकडे फिरकल्याचे दिसून येत नाही. सध्या महापालिकेची मान्सूनपूर्व नालेसफाई मोहीम सुरू असतानाच देशिकेंद्र शाळेजवळ रस्त्यावरच गटारगंगा वाहत असल्याचे विदारक चित्र दिसत आहे. याचा विद्यार्थ्यांसह पालकांना त्रास सहन करावा लागत आहे.

## गोलाईसह फ्रूट मार्केट परिसराची महापौरांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** हातगाडीसह भाजी विक्रेत्यांच्या अतिक्रमणाने बजबजपुरी बनलेल्या गंजगोलाईतील व्यापाऱ्यांना कडेलाच थांबून व्यवसाय करण्याच्या सूचना महापौर जयश्री सोनकांबळे यांनी शनिवारी (दि.२५) केल्या. यावेळी त्यांनी फ्रूट मार्केट परिसराची पाहणी करून अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली. सर्व घाण दूर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

शहराच्या गंजगोलाईत वाढत्या अतिक्रमणामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. हातगाडी व्यापाऱ्यांसह रिक्षाचलकही भर रस्त्यात रांगा लावून थांबतात. येथून जाणारा सामान्य वाहनधारक काही बोलायला गेला तर त्याच्याच अंगावर येणे, मारहाण करणे असे प्रकार यापूर्वी झाले आहेत. गोलाईतील व्यापाऱ्यांनी रस्त्याच्या कडेला थांबूनच आपले व्यवसाय करावेत, अशा सूचना महापौर जयश्री सोनकांबळे यांनी केल्या. यावेळी झोन प्रमुख पवन सुरवसे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## किशोरवयीन मुलांसाठी 'संयम' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ एप्रिल :** जिल्ह्यातील किशोरवयीन मुलामुलींना व्यसनापासून परावृत्त करणे आणि त्यांच्यात जनजागृती करण्यासाठी 'संयम' उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी विशेष प्रशिक्ष एक प्रशिक्षण कार्यक्रमाचे सादरीकरण गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. हा उपक्रम ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था पुणे, रोटरी क्लब लातूर, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि भारतीय स्त्री शक्ती संघटना, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत उपक्रमाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. हा प्रशिक्षण उपक्रम येत्या जून किंवा जुलै महिन्यात आयोजित केला जाणार असून, यात सुमारे १०० शिक्षक आणि स्वयंसेवक सहभागी होतील.

**जाहीर प्रगटन**

मौजे लातूर शहर मनपा हद्दीतील गवळी नगर,गरूड चौक भागातील ता.जि . लातूर येथील तमाम जनतेस या जाहीर जहितर प्रगटन द्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. तायप्पा संतराम कांबळे, रा. गवळी नगर लातूर, ता. जि . लातूर यांनी मला दिलेल्या माहिती वरून व दाखवलेल्या कागदपत्रावरुन तसेच वकील म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेच्या महितीस्तव पुढील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. माझे पक्षकार यांनी श्री. आनंद प्रल्हाद गवळी व श्री विजय प्रल्हाद गवळी हे दोघे रा. बार्शी रोड पाण्याच्या टाकीजवळ, ता. जि . लातूर यांच्या मालकी कब्जे वहीवटीचा प्लॉट जो मौजे लातूर मनपा हद्दीतील गवळी नगर भागातील ज्याचा जमीन सर्व्हे नं . ५२/१/ब पैकी प्लॉट नं . ५४ पुर्ण ज्याची लांबी दक्षीण उत्तर ५० फूट - रुंदी - पूर्व पश्रि्चम ४० एकूण २००० चौरस फूट असून ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे - पूर्वेस सुनीता सुरेश माने यांचा प्लॉट, पश्र्चीमेस विश्र्वनाथ भुजबळ यांचा प्लॉट, दक्षिणेस - २० फूट रुंदीचा रस्ता , उत्तरेस-२० फूट रुंदीचा रस्ता. याप्रमाणे वर्णनीय चतु:सीमेच्या आतील प्लॉट विद्यमान मालक श्री आनंद प्रल्हाद गवळी व श्री विजय प्रल्हाद गवळी यांच्या मालकीचा असून त्यांनी सदर प्लॉट आमचे पक्षकारास कायम विक्री करण्याचा करार केला आहे. सदरील प्लॉट निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी विद्यमान मालकानी माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी सदर प्लॉटवर कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्ज,बोजा, गहान खत, बक्षीस पत्र, कोर्ट डीक्री , मृत्यूतारण, लीज, लोन, शेजाऱ्यांचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज, न्यायालयीन वाद अथवा इतर कसल्याही प्रकारचा वाद असल्यास सदरचे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत माझ्या खालील पत्त्यावर लेखी उजर / आक्षेप दाखल करून रितसर पोचपावती घ्यावी. मुदतीत जर कोणाचा आक्षेप न आल्यास सदरील प्लॉट निर्वी वाद व निर्जोखीम आहे असे समजून माझे पक्षकार सदर प्लॉटचे रजीस्टर्ड खरेदी खत आपल्या हक्कात करून घेतील याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन दि. २७ /०४/२०२६

प्रगटन देणार
तायप्पा संतराम कांबळे,
रा. गवळी नगर, लातूर,
ता. जि. लातूर
मोबाईल नं . ९६६५० ८९९००.

तर्फे
ॲड..महादेव चेवले
रा. सोनवती, ता. जि . लातूर.
मो.नं. ९३७०७ ६२४९४